# डॉ. नितीन मोरे

# प्रीतीची 'प्रेम' कथा



# प्रीतीची 'प्रेम'कथा

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# प्रीतीची 'प्रेम'कथा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# प्रीतीची 'प्रेम'कथा

लेखक  :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com


प्रकाशन : २ फेब्रुवारी २०२०

©esahity Pratishthan®2020

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे यांची ईसाहित्यसंपदा:




1. चक्रमादित्याचा दरबार १(नाटक)
2. चक्रमादित्याचा दरबार २(नाटक)
3. केल्याने शीर्षासन,
4. नाच जमूरे नाच,
5. अहम ब्रह्मास्मि,
6. मच्छर टाईम्स,
7. संवादोनी प्रकटावे
8. या कोल्हटकरांच्या घरात (नाटक )
9. प्रेमातुराणां (नाटक)
10. सांगतो ऐका (एकपात्री)
11. प्रिय पत्रास
12. शिभ्रष्टाचार!
13. आधुनिक कहाण्या
14. अवलोकन..अनुभव..मनोव्यापार
15. राग दरबारी (एकांकिका )
16. वाळूतल्या रेघा
17. संधी साधू (नाटक )
18. न.बा.च्या (प्रेम) कविता
19. व्यक्ती आणि कथा - ठेंग्यादादा.. पेद्रू.. अँड्र्यू इ.
20. प्रीतीची 'प्रेम'कथा

ही सर्व पुस्तके ई साहित्यच्या वेबसाइटवर  विनामूल्य उपलब्ध आहेत.

# डॉ. नितीन मोरे यांच्या पुस्तकांच्या लिंक्स

नाटके

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ragdarabari_nitinmore.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aam_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sangato_aika_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chakramadityacha_darbar__nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chakramaditya_2_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/prematuranam_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ya_kolhatakaranchya_gharat_nitin_more.pdf

विनोदी साहित्य

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/adhunik_kahanya_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/valutil_regha_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bhrashtachar_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/machchhar_times_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/nach_jamure_nach_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aham_brahmasmi_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kelyane_shirshasan_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/samvadoni_prakatave_nitin_more.pdf

इतर

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/letters_nitin_more.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/na_ba_kavita_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/vyaktikatha_nitin_more.pdf


डॉ. नितीन मोरे


राग दरबारी
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
अहम्
ब्रह्मास्मि



डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच



डॉ. नितीन मोरे
वाळूतील
रेघा


डॉ. नितीन मोरे
न.वा.च्या(प्रेम)कविता


डॉ. नितीन मोरे
संधी साधू



डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या



डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार



डॉ. नितीन मोरे
प्रिय पत्रास,



डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I
प्रेमातुराणां



डॉ. नितीन मोरे
अ..अ..म..
अवलोकन.अनुभव.मनोव्यापार



डॉ. नितीन मोरे
मच्छर टाईम्स


डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार
२


डॉ. नितीन मोरे
संवादोनी
प्रकटावे


डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो
ऐका


डॉ. नितीन मोरे
भ्र
शिष्टाचार

# अर्पणपत्रिका

नवप्रेमिकांस

येत्या प्रेमदिनानिमित्त

**डॉ. नितीन मोरे**



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत.

त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली.

सामान्यत: आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे एकोणिसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo. com

# विसाव्या पुस्तकाच्या निमित्ताने ..

अमृताते पैजा जिंकणारी आपली माय मराठी.. तिची सरकार दरबारी उपेक्षा ही आता नवीन बाब राहिली नाही. पण भाषा जगते नि तगते ती सर्वसामान्यांच्या वापरामुळे. ई साहित्य हे काम 'नेटा'ने करत आहे आणि ही भाषेच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाची बाब आहे.

एकूणच पुस्तक व्यवहार हा नव्या लेखकाच्या दृष्टीने एक कठीण भाग असतो. लिहिणे कदाचित सोपे पण ते प्रसिद्ध करून वाचकाच्या हाती ते पोहोचवणे कठीण असा अनुभव सगळयाच होतकरूंना आलेला असणार. हे एखाद्या नोकरी शोधणाऱ्या तरूणासारखे आहे.. अनुभव नाही म्हणून नोकरी नाही नि ती नाही म्हणून अनुभव नाही! प्रथितयश प्रकाशन संस्था नवीन पुस्तकांकडे कुठल्याही कारणाने का होईना कानाडोळा करत असताना अशा लेखकांनी आपले लिखाण कसे प्रसिद्ध करावे? ई साहित्यने हा प्रश्न सोडवला आहे.

पुस्तक प्रकाशन हा महागडा उद्योग आहे. त्यात परत प्रकाशकांचा अपारदर्शक व्यवहार (अर्थातच काही सन्माननीय अपवाद ) .. कागद, छपाई, वितरण, विक्री आणि त्या सगळयांचे हिशेब या सगळयांना फाटा देत नवीन तंत्रज्ञानाचा वापर करत ई पुस्तके प्रकाशित करणे ही भाषा व्यवहाराच्या दृष्टीने एक महत्त्वाची बाब आहे. आणि त्याबद्दल ई साहित्य टीमचे अभिनंदन करायलाच हवे. त्यामुळे कित्येक नव्या लेखकांना वाचकांसमोर येण्यास मदत झाली आहे.

माझी शाळा म्हणजे गोरेगावची अ.भि.गोरेगावकर इंग्लिश स्कूल. शाळेने आम्हाला घडवले हे खरे. दामोदर सामंत सर आम्हांला मराठी शिकवत. त्यांच्या मराठीच्या वर्गामुळेच भाषेचे सौंदर्य समजत गेले. भाषा महत्त्वाची खरीच. तिच्यामुळेच संवाद साधला जातो नि तिच्यामुळेच विसंवाद ही होऊ शकतो. दैनंदिन जीवनातही भाषा सर्व काही व्यापून असते. तीच

भाषा जेव्हा लिखाणात वापरली जाते तेव्हा तिच्या सौंदर्याची भुरळ साहित्य वाचनात पडत राहतेच. मेडिकलच्या पुढील शिक्षणात भाषा एक विषय म्हणून मागे पडला. शास्त्रीय शिक्षणात भाषेचे काम विशेष नसले तरी भाषेचा उपयोग होतोच सगळीकडे. अगदी पेशंट्सच्या हिस्टरी टेकिंगसाठीही. भाषा वेगवेगळ्या पद्धतीने बोलत पेशंट्सकडून माहिती काढणे हे कठीण काम. खरेतर सर्वात कठीण मेडिकल शिक्षणात काही असेल तर हे हिस्टरी टेकिंग. विविध शैक्षणिक पातळीवरील रूग्ण, त्यांची बोलण्याची नि आपले सिम्पट्म्स सांगण्याची पद्धत वेगळी. त्यातून हवी ती माहिती काढून घेणे हे खरे कौशल्याचे काम. येथे भाषेचे बारकावे उपयोगी पडतात. अर्थात साहित्यिक भाषेची गरज नसते त्यासाठी पण संवाद साधला जाणे महत्त्वाचे.

लिखाणाची आवड मला अगदी लहानपणापासूनची. शाळेत भित्तीपत्रके असायची त्यात काही ना काही लिहिलेले आठवते अजूनही. कॉलेजात मराठी वाङमय मंडळाच्या बोर्डावरही मध्ये मध्ये लिखाण चाले. खरेतर वाचनाची प्रचंड हौस होती शाळेत असताना. मे महिन्याच्या सुट्टीत दर दिवशी एक या प्रमाणे पुस्तके वाचल्याची आठवतात मला. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयात तशी हजारो पुस्तके असल्याने ती उपलब्धही व्हायची सहज. त्या वाचनात कादंबऱ्या, कथा, चरित्रे, आत्मचरित्रे, ऐतिहासिक पुस्तके असे सारे काही असायचे. वाचून तसे काहीतरी लिहायचा प्रयत्न व्हायचा. आणि त्या शाळकरी वयात काहीतरी मोठेपणाचा आव आणत गंभीर काही लिहायचा प्रयत्न व्हायचा. मला वाटते नववीत असताना असेल.. गदिमा गेले नि शाळेत त्यांच्यावर निबंध लिहायला सांगितलेला बाईंनी. तो एकेकाने वाचायचा सगळ्यांसमोर. मला आठवतेय, भारी भारी नि कठीण शब्द निवडून लिहिलेला तो निबंध मी. अजून आठवते मला, तो वाचला मी आणि शेवटी माझ्याच लक्षात आले, भाषेचे सौंदर्य तिच्यातल्या कठीण शब्दांत नि वाक्यांत नाही, क्लिष्टपणात तर नाहीच नाही, तर साध्या, सोप्या आणि त्या त्या ठिकाणी बसू शकणाऱ्या चपखल शब्दांत आहे. पुढेही काहीही लिहित असे मी. एका कुठल्याशा क्षणी वीस तीस कवितांचा संग्रह लिहून काढलेला ही आठवतोय. 'मृत्युंजय' वाचल्यावर त्या धर्तीवर चक्क कादंबरी

लिहायला घेतलेली त्या वयात! दोन तीन पानानंतर तो उत्साह मावळला हे खरे.. हे सारे लिखाण पुढे रद्दीत जायचे तसे गेलेच. पण लिहिण्याची 'ऊर्मी' टिकून राहिली .. ऊर्मी म्हटले की कसे भारी वाटते म्हणून तो शब्द, नाहीतर खरेतर लिहिण्याची हौसच म्हणायला हवे!

आधी आधी लिहायचो त्याचे विषय नक्की आठवत नाहीत, पण ते नक्कीच काहीतरी गंभीर भाषेत असायचे. पुढे डॉक्टरकीच्या प्रॅक्टिसमध्ये पंधरा एक वर्षे लिहिणे वगैरे बंदच होते. मेडिकलच्या चरकात पिळून घेताना असे काही सुचणे अशक्यच हे ज्याने असे शिक्षण घेतले त्यास नक्कीच पटावे. पण लिहिण्याची सुप्त इच्छा कदाचित मनात निद्रिस्त असावी. साधारण आठेक वर्षे झाली असतील वसईतल्या प्रॅक्टिसला आणि त्या इच्छेला जाग आली अचानक.. एके दिवशी अचानक सकाळी एक कथा सुचली. रात्री बसून ती लिहून काढली. आणि कौतुकाने स्वतःच वाचून काढली. कालपर्यंत जगात नसलेली पात्रे निर्माण केल्याचा आनंद होता म्हणा किंवा स्वकौतुक वाटत होते म्हणा. आजही ती कथा माझ्याकडे तशीच आहे पडून. आता वाचताना ती अर्धकच्ची असल्याचे जाणवते .. जुन्या साडीचा ड्रेस शिवावा तसे या गोष्टीला नुकतेच एकांकिकेचे स्वरूप दिले आहे मी! ही गोष्ट विनोदी होती. आणि यापुढे विनोदीच लिहावे.. गंभीर लिहावे तर तेही विनोदाच्याच प्रकारात अशा पद्धतीने लिखाण सुरू झाले. ते २००५ चे वर्ष होते. हळूहळू लिहिलेले गोळा होत गेले. 'वाचकाच्या शोधात एक लेखक' या उपर प्रगती नव्हतीच. लिहिलेले पेपर सांभाळणे एक मोठे काम होऊन बसले. पुढे लॅपटॉपवर लिहिणे सुरू झाल्याने ते एक काम सोपे झाले. पण साचणाऱ्या लेखांचे करायचे तरी काय? काही गोष्टी लिहिल्या. दिवाळी अंकांना पाठवल्या. बहुतेकांनी त्या छापल्या नाहीतच. कुणी छापल्या त्यांनी तो अंक देखील कधी पाठवला नाही. त्यामुळे बिन माहितीतल्या अंकांना गोष्ट पाठवणेच बंद केले मी. झाले इतकेच की प्रकाशनाच्या प्रतिक्षेची रांग वाढत चालली. त्यातल्या त्यात लॅपटॉपमुळे कागदाची रद्दी जमत नव्हती इतकेच समाधान! पुढे वसईच्याच दोन दिवाळी अंकांत कथा येऊ लागल्या. आणि एके दिवशी ई साहित्यचा शोध लागला.

लिखाण हा एक माझ्यासाठी विरंगुळा आहे, छंद आहे. एखादी गोष्ट लिहून हातावेगळी झाली की पुढे काही दिवस हुरहुर लागून राहते. नवीन काही सुचले तर ठीक नाहीतर उदासीनता यायला लागते. लक्षणे ही ठीक नाहीत हे खरे, पण गेल्या काही वर्षात तरी न सुचल्याचे दिवस आले नाहीत. आशा आहे, पुढेही न येवोत. लिहिण्याचा हा स्वांत सुखाय उपक्रम म्हणा की उपद्व्याप म्हणा ई साहित्य कृपेने सर्वांपर्यंत पोहोचतोय नि कुणी वाचक मिळेल का वाचक अशी याचना करत फिरावे लागत नाही यातच आनंद आहे!

आधीचेच लिहिलेले माझ्याकडे खूप काही होते. पहिले पुस्तक चक्रमादित्याचा दरबार प्रसिद्ध झाले. पाठोपाठ अजूनही पुस्तके आली. प्रसिद्ध होताहेत म्हटल्यावर लिहिण्याचा उत्साह अजून वाढला. त्यातून एकांकिका नि नाटके लिहून झाली. आजवर न हाताळलेला प्रकार म्हणजे कादंबरी. आता ही पहिलीच कादंबरी प्रसिद्ध होत आहे.

ई साहित्य असे लिखाण प्रसिद्ध करतेय, तेही सुंदर रीतीने आणि कलात्मक मुखपृष्ठासहित. आणि ते पुस्तक जगभरात कुठेही पोहोचते क्षणार्धात. यापेक्षा लिहिणाऱ्याला काय हवे असणार?

ई साहित्यने मराठी भाषेचा झेंडा साता समुद्रापार रोवलेला आहेच. तो झेंडा आणि त्याहूनही महत्त्वाचा  मायमराठी भाषेचा झेंडा असाच डौलाने फडकत राहो हीच इच्छा.

डॉ. नितीन मोरे

# प्रीतीची 'प्रेम'कथा

१

# सांगते ऐका!

# अर्थात

# मी : एक तपस्विनी!

'गुड मॉर्निंग!

स्वप्ने पहायला शिका. स्वप्नांसाठी झोप आवश्यक.. तेव्हा परत झोपी जा.. नवीन स्वप्ने पहा.. सुप्रभात!'

या मोबायल्याची कमाल पहा. त्याने जगच नाही तर दिवसाचे प्रहरदेखील आणलेत जवळ. सकाळसकाळी मी उठली..

रीतसर आळस झटकून. आळोखेपिळोखे दिली मी. समोरच्या मोबाईलात टुणss आवाज आला. हा माझा खास अलार्म म्हणावा.. त्यात आलेला तो गुड मॉर्निंगवाला मेसज! नुसता गुड मॉर्निंग नाही तर ज्ञान वाटप ही त्यात.

परत झोपी जा म्हणे! मला काय, मी झोपते! झटकलेला आळस मी परत गोळा केला. गेलेली झोप परत डोळ्यांत जमा केली. पापण्या घट्ट मिटून ती परत उडून जाऊ नये म्हणून पडून राहिली.. स्वप्ने पहायची आता माझ्यावर जबाबदारी होती. त्यासाठी झोपणे जरूरी होते.

शुभ प्रभातीचा तो संदेश.. संदेश नव्हे तर आदेश होता. प्रेमआदेश! त्या संदेशाने तर रात्रीच्या प्रहरास सकाळी ढकललेले. माझा प्रेम आहेच तसा विनोदी! सुप्रभाती निद्राधीन होण्याचा संदेश! आणि तो मी टाळणार तरी कशी? झोपली झाले. स्वप्न पाहायची तर झोपायला तर हवे.

मीच नाही.. या प्रीतीचे प्रेम.. आणि या प्रीतीचा प्रेम देखील .. हेच तर सांगतोय! म्हणजे मी त्याच्याच बद्दल सांगतेय हे. सांगू म्हटले की काय काय सांगू कळत नाही. प्रीतीचा प्रेम! किती छान वाटते ऐकायला! प्रीतीचे प्रेम आणि प्रीतीचे प्रेम.. दोघेही एकच!

झोपली मी.

स्वप्न पडते कसले? तर तेच! प्रेम आणि प्रीती. स्वप्नात खुद्द बिस्मिल्लाखान सनई वादन करताहेत नि मी सलज्ज का काय म्हणतात त्या वदनाने माळ घालतेय. मध्ये आंतरपाट तसाच! आणि माझ्या प्रेमचा चेहरा पण दिसला नाही नीट. स्वप्नाची फ्रेम बिघडली वाटते. तरी पडले स्वप्न ते चांगलेच झाले. स्वप्नात तर प्रीती प्रेमची झाली. उगाच शंका काढू नका. नीट नाही दिसला चेहरा म्हणून काय झाले.. आतंरपाट तसाच होता.. म्हणून काय झाले.. तो प्रेमच होता. दुसरा कुणी कसा असेल? इतक्या तपस्येनंतर? आणि मी बरी प्रेमला असेच सोडून देईन?

तपस्या म्हटली ना मी तर कुणी तपस्विनी नाहीतर योगिनी झाली असे वाटले मला. तप आणि तपस्या! काय काय नाही केली मी त्या प्रेमसाठी. पार्वतीने म्हणे शंकराला प्रसन्न केले तप करून. मी पण केले तेच. म्हणजे मी पार्वती? म्हणजे प्रेम? भोळा शंकर? भोळा? त्याला मी हल्ली हे बोलली तर म्हणाला, "तू ना, पार्वती.. तुला मी लंकेची पार्वती बनवेन!"

मी आधी तर खूश झाली पण त्या लंकेच्या पार्वतीचा अर्थ कळला.. अशी रागावली ना त्या भोळ्या सांबावर. पण त्याला मिळवण्यासाठी मी काय काय नाही केली. आधी रागावली नसती मी. पण आता काय तो माझा झाला म्हणून रागावली. त्याला मी पण मग बोळा शंकर बोलली. मी पार्वती नि तू बोळा शंकर बोलली. अजून असे चिडवले ना तर पुढच्या वेळी बुळा शंकर म्हणेन त्याला. सोडते का मी? मी पण बसली रूसून. आणि रागावली मी की त्याला आईस्क्रीम द्यावेच लागते मला. त्याशिवाय काय थंड होत नाही मी. मला चिडवतो म्हटले की त्याच्या खिशाला तितकी तर चाट बसायलाच हवी की नाही? तरी पण यावेळी मी दोन आईस्क्रीम शिवाय सोडली नाही त्याला. चांगलाच महागात पडला पाहिजे त्याला हा मला चिडवायचा धंदा. स्ट्रॉबेरी आईस्क्रीम! आजवरच्या गोष्टीत ही स्ट्रॉबेरी नि हे स्ट्रॉबेरी आईस्क्रीम नसते तर?

तर गोष्ट ही त्याचीच. म्हणजे प्रेमची नव्हे. तर त्याला मी कशी शोधून काढली त्याची. त्याला मी भेटली आयती. नशीबवान आहे तो. पण त्यासाठी त्याचे नशीब इतके बलवत्तर असावे की मी जंग जंग पछाडून त्याच्या पर्यंत पोहोचावे.. म्हणजे अगदी मी निगुतीने स्वयंपाक करावा नि ह्याने डायरेक्ट येऊन पाटावर गिळायला बसावे? आणि मी त्याला मिळावी? बिना मेहनतीने? पण माझा प्रेम आहेच तसा! तप करून मिळवण्यासारखा!

२

## सुरूवातीची सुरूवात!

## अर्थात

## प्रथम तुज पाहता

अनंतराव घोरपडे म्हणजे तात्या.. म्हणजे वडील माझे. अनंतराव घोरपडे. रंगढंग प्रकाशनात तात्या सीनियर मॅनेजर आहेत. तात्यांचा मनुष्य संग्रह दांडगा. मनुष्य संग्रह हा शब्द तात्यांचाच! मला गंमत वाटते त्या शब्दाची. प्राणी संग्रहासारखा मनुष्य संग्रह! म्हणजे तात्या ऑफिसात न जाता कुठल्यातरी अशा जागेत जातात जिथे पिंजरेच पिंजरे आहेत.. नि एकेकात एकेक मनुष्यास ठेवण्यात आले आहे.. दोरीस बांधून! आई माझी घर चालवते. तात्यांचा संबंध पुस्तकांशी आहे तसा तिचा नाही. रोजचा पेपर एवढेच तिचे वाचन. आणि मी! पुस्तकांच्या पसाऱ्यात राहूनही चिखलातल्या कमळासारखी अलिप्त मी! अगदी बीए झाली मी पण वाचनाची काही आवड नाही मला. आमचे स्वामी .. म्हणजे अरपितानंद स्वामी म्हणतात, आपल्या अंगाला काही लावून घेऊ नका! संसार असार आहे. त्यात सगळीकडे कर्दम पसरला आहे. तेव्हा कर्दमात रुतून राहू नका. आता सगळीकडे पसरला ही असेल हा कर्दम! कर्दम म्हणजे चिखल हे मला खूप उशीरा कळले. तोवर सगळीकडे काय पसरले नि कशात रुतायचे नाही हेच मला कळले नव्हते! तर मुद्दा चिखलाचा नाही नि त्यात रूतण्याचा नाही! तर कसे दैव, नशीब आणि प्राक्तन आपली गंमत करत असतात तो आहे. हे तिन्ही शब्द स्वामींचे! तर तात्या पुस्तकांचा पसारा घेऊन घरी येत असतात नि मी त्यापासून अलिप्त, कमलदलापरी! आणि एके दिवशी त्याच पुस्तकांच्या कमलदलांत भुंग्यासारखी मी अडकेन असे कधी मला वाटले असेल? पण झाले ते असे झाले!

तात्यांची सवय आहे नेहमीची. येताना कोणालाही घेऊन येतात घरी. थेट जेवायला. आईला कधी आधी फोन करतात.. कधी नाही. आई माझी अन्नपूर्णा. ती सर्वांना पोटभर जेवू घालतेच. त्यादिवशी तसेच झाले. तसेच म्हणजे तात्या कुणाला घरी घेऊन आले. पण तसेच नाही झाले.. म्हणजे यावेळी नेहमीप्रमाणे नाही झाले.. कारण त्यांच्याबरोबर आलेला तो तरूण!

कढईतली गरमागरम पुरी.. टट्ट फुगलेली. तिच्यात बोटाने भोक पाडून हवा बाहेर येते.. हवा म्हणजे वाफ. तोंडाची वाफ दवडण्यापेक्षा ही दवडलेली बरी! आणि नाहीतर भाजायची जीभ. म्हणजे झाले काय.. त्यादिवशी 'तो' म्हणजे प्रेम आलेला घरी. जेवायला. मी उगाच त्याच्याकडे पाहात बसलेली. प्रथम त्यास पाहता.. आई गरम पुऱ्या कढईतून डायरेक्ट वाढतेय. तो आणि तात्या जेवताहेत. प्रेम त्या पुरीत बोटाने छेद करतोय.. त्यातून वाफ बाहेर येतेय. माझे लक्ष अर्थातच प्रेमकडे. इकडे आई ओरडतेय.. "वाढ गं पुरी मने.." मी तोंड उघडून बावळटासारखी त्याच्याकडे पाहतेय. पहिल्यांदाच आलेला घरी तो. तात्या घेऊन आलेले तेव्हा त्यांना नसेल ठाऊक आपल्या जावयाला आणलेय घरी! आणि त्या प्रेमला तरी काय ठाऊक आपले सासर आहे हे! हे सारे पहिल्यांदा हे कळलं कोणाला असेल तर ती म्हणजे मी!

काहीतरी म्हणतात ना, पाहताच ती रम्य बाला कलिजा खलास झाला.. तसा 'पाहताच त्या रम्य ब्वा ला.. हार्टाट्याक आला!' तो मला. हार्टाट्याक म्हणजे नेहमीच्या अर्थाने नाही. म्हणजे हार्ट तर तसेच धडधड धडकत होते. थांबले नाही तर धावायला लागले. काहीतरी सिग्नल गेले इकडून तिकडून.. कलिजा खलास फक्त मुलांचाच होतो की काय? माझा पण झाला. लव्ह ॲट फर्स्ट साईट सिनेमात दाखवतात तसे झाले मला. मी त्याच्या पुढे जाऊन उभी राहिली काय.. त्याला श्रीखंडाचा आग्रह केला काय.. पण त्याचे लक्ष असेल तर शपथ. त्यात चुकून मी त्याला दह्यात साखरेऐवजी दोन चमचे मीठ वाढले. तो बघत राहिला पण बोलला नाही काही. आईच्या

लक्षात आले, तशी ती त्याच्यासमोर म्हणून हळूच ओरडली नि मी निमूटपणे दुसरी वाटी घेतली दह्यासाठी. तो आला नि त्याने पाहिले.. नि तो जिंकला! बस! झाले ते इतकेच. त्याला पाहात बसली मी खरी पण त्या धुंदीत तात्या आणि त्याच्या बोलण्याकडे लक्षच राहिले नाही. त्याचे नाव काय आहे हे ही ऐकले नाही मी.. तो गेल्यावर जाग आल्यासारखे झाले नि तोवर गाडी स्टेशन सोडून गेलीही होती. तो कोण, कुठला नि करतो काय.. कसलाच आगापीछा नाही. मुद्दाम विषय काढू म्हटले तर आई उगाच शंभर शंका काढणार.. मी का एवढे विचारते म्हणून. मी आपली गप्प बसली. कधी न कधी माहिती होईलच.

तो गेला. म्हणजे तात्या त्याच्याबरोबरच गेले त्याला सोडायला. आई कामात मग्न. मी 'स्वप्नात रंगले मी' अशा कुठल्या सिनेमाच्या नायिकेची पोझ घेऊन बसली. स्वप्ने पाहायची सवय पहिल्यापासूनचीच माझी. तशी बसली. झोपली नाही.. नुसतेच डोळे बंद करून पडून राहिली. स्वप्न पडायला झोपावेच लागते काय? मुळीच नाही. मला तर उघड्या डोळ्यानी पण पाहता येतात स्वप्नं. माझ्या प्रेमने आता मोठ्या प्रेमाने पाठवला असेल तो संदेश पण त्याला यातले काय कळते? स्वप्न पहायला झोप म्हणे! मी झोपली आज पण ते त्याचा आदेश समजून! पण मला अशीच बसल्या बसल्या पडतात स्वप्ने! हे त्याला मी अजून सांगितले नाहीए. तसे खूप काही शिकायचे बाकी आहे बिचाऱ्याला. तरी बरे तसा तो माझ्याहून जास्त शिकलेला आहे. तरी पुस्तकी शिक्षण पण काय खरे शिक्षण आहे?

३

# पुढे काय?

# अर्थात

# वो कौन है?

प्रेम म्हणतो शिक्षण आपल्याकडे जीवनाभिमुख नाही. जीवनाभिमुख म्हणे! म्हणजे काय कोणास ठाऊक. त्याला विचारले तर वर्ग घेतल्यासारखा लेक्चर देईल. त्यापेक्षा जाऊ देत. नसेल जीवनाभिमुख तर त्याला मी तरी काय करणार? पण एक आहे, तसे म्हणत ही त्याने घेतलेच ना ते शिक्षण तसे जीवनाभिमुख नसूनही. मग कशाला उगाच बडबडतो कोणाला ठाऊक. मी मात्र ते तसे नाही हे आधीच समजून उमजून जास्त शिक्षणाच्या वाटेलाच गेली नाही. उगाच जीवनाभिमुख की काय नसलेले शिक्षण कशाला? त्यापेक्षा मला व्यवहारी ज्ञान जास्त आहे. जगाच्या पाठीवर कुठेही ते उपयोगी पडेल.. हो की नाही? तर प्रेमला अशा खूप गोष्टी शिकायच्या बाकी आहेत. उगाच उच्चशिक्षित असल्याच्या गमजा मारतो! पण हे सारे नंतरचे. म्हणजे आधी त्यादिवशी त्याला पाहिले आणि आता त्याची नि माझी जोडी.. छे.. लाज वाटते मला.. पण मधल्या काळात कितीतरी काहीतरी घडले.

.. घडले म्हणू की घडवले म्हणू?

त्यादिवशी तो आणि तात्या गेले. कसला आगा न पीछा ठाऊक मला. सुतावरून स्वर्ग गाठायला ते सूत तर हवेच.. आणि त्याच्याशी सूत जुळायला हा कोण नि कोणाचा सुत हे तरी ठाऊक हवे नाही का? पण सगळीच बोंब इथे. तात्या त्यादिवशी उशिरा आले. मी डोळे फाडफाडून

जागी होती काही माहिती मिळेल म्हणून. पण तोवर आईच झोपून गेलेली. तात्या आले नि म्हणाले, "झोप लवकर आता." चोराच्या मनात चांदणे म्हणतात ते मला तेव्हा जाणवलेच. एरव्ही दुसऱ्या कुण्या पाव्हण्याबद्दल काही न काही गप्पा झाल्याच असत्या. पण इकडे 'हम आज कहीं दिल खो बैठे' होऊन बसलेले. त्यात मी मुद्दाम विषय कसा काढणार होते? उगाच संशय. ती रात्र तशीच गेली. उगाच हिंदी सिनेमातली विरहगीते मनात म्हणत पडून राहिली मी.. आजा रे अब मेरा दिल पुकारा.. पासून सुरूवात केली.. अकेले हैं चले आओ.. तुझ बिन जियरा उदास रे.. अशी विरहाग्नीतली की काय म्हणतात ना ती गाणी बोलली मी.. काही वेळात पुढचे गाणे सुचेना.. मग म्हणाली मी..बेदर्दी बालमा तुझको मेरा मन याद करता है.. बालमा? कसला बलम नि बालमा.. निनावी अन् अनोळखी! सिनेमात बरे असते, त्यांना हवी तशी हवी तेव्हा गाणी सुचत राहतात. पाठून म्युझिकसकट! आणि पुढे काहीना काही व्हायची सोय असतेच स्टोरीत. त्यामुळे हिरॉइन टेन्शनमध्ये असली तरी नि विरहगीत गात असली तरी बहुतेक वेळी सुखांत होणार हे ठाऊकच असते. पण आयुष्य म्हणजे सिनेमा नाही! अय्या! आई मला हेच सांगत असते नेहमी. म्हणजे सिनेमाचे वेड आहे मला. मी त्यातली गाणी गुणगुणत असते.. ओ मेरे राजकुमार.. तेरे बिन रहा न जाय वगैरे!

मग आई म्हणते, "अगं आयुष्य म्हणजे सिनेमा नाही.. राजकुमार काय नि राजकन्या काय.. नि त्यांच्या गोष्टी काय.. सिनेमात ठीक. नाहीतर तेच खरे समजून चालशील."

आई म्हणते ते खरेय. पण अर्धेच. म्हणजे बाकी ठीक की सिनेमासारखे सगळे होत नाही, पण राजकुमार? तो तर आलाच ना! अगदी परिकथेतला म्हणावा असा. घोड्यावर नसेल आला पण आज घोडे आहेतच कुठे? अबलख वारू नसतील पण अबलख रिक्शेत बसून आला माझा राजकुमार! आणि स्वप्नात नाही, तर थेट सत्यात! इथे माझ्यासमोर बसून गेला आणि मी वाढलेल्या पुऱ्याही खाऊन गेला! थोडक्यात 'काल रात्री स्वप्नामधे एक राजा आला पुऱ्या खाऊन गेला!' सिनेमात सगळेच काही मनचे दाखवतात असे नाही .. म्हणजे? बाकी त्याची माझी भेट होणारच?

नशिबात तोच असेल तर दुनियाकी कोई ताकद कशी रोक सकेगी? असे म्हणतातच ते सिनेमावाले. खोटे कसे असेल ते?

माझ्या मनाला इतके सांत्वन पुरेसे होते तेव्हा! पहाटे डोळा लागला माझा. स्वप्न पडले. तो आणि मी. धुवांधार पाऊस. एका छत्रीत गाणे म्हणत चाललोय आम्ही. 'एक छतरी और हम दोनों.. फिर क्या हो..' मग छत्रीच उडून गेली. मी भिजत होती. आणि त्या स्वप्नातही शिंकत होती. लहानपणापासून मी तशी नाजूकच. इतक्यात आई आली, ओरडत.. "मने, पावसात नको भिजूस.. सर्दी होईल!"

आई असलीच आहे. नको तेव्हा स्वप्नात पण येते नि असले अरसिक सल्ले देते. या मनीला स्वतःच्या मनचे काही करताच येणार नाही का? आणि सिनेमातल्या आया हल्ली बऱ्या वागतात मुलींशी. मैत्रिणीसारख्या. आईला दाखवायला हवेत ते. नाहीतर माझी आई. सर्दी म्हणे! स्वप्न मोडायला ते पुरेसे होते. अर्धवट जागी झाले तर आई आणि तात्या काहीतरी बोलत होते. स्वर्ग गाठायला काही सूत मिळतेय का वाटून मी टक्क जागी झाली.. आणि कुणाला मी जागीच आहे हे कळू नये म्हणून डोळे गच्च मिटून डोक्यावर पांघरूण घेऊन गाढ झोपण्याचे नाटक करत पडून राहिली. प्रेम म्हटले की चोरटेपणा आपोआप असा येत असेल अशी कल्पना नव्हती मला. पण चोरटेपणा चोरपावलांनी आलाच! आणि चोरटेपणा आला म्हणजे .. 'हे प्रेम नव्हे तर काय आहे मेरे मन!' कुठल्याशा सिनेमातल्या या डायलॉगनी मी स्वतःवरच खुश झाली आणि कान टवकारून ऐकायला लागली..

आईला फाफटपसारा लावायची भलतीच सवय आहे. मूळ मुद्द्यास थेट येईल तर ती आई कसली! गवई लोक असे हळूहळू समेवर येतात म्हणे! तशी आई तात्यांशी भांडताना तर असा

धोबीपछाड घालते! कितीतरी वेळ तर भांडण्याच्या मूळ मुद्द्याला हातच घालत नाही! पण आज भांडणबिंडण काही नव्हते. पण आई इकडतिकडच्या गप्पा मारत बसलेली! अगदी तांदूळ कुठल्या दुकानातला चांगला ते सोन्याचे भाव कडाडताहेत पर्यंत! त्यातल्यात्यात एकदा म्हणाली ती, "मनीच्या लग्नासाठी साठवायला हवे सोने.."

पण तात्या म्हणाले, "लहान आहे अजून!"

आता पुढे त्या अजनबी इन्सान बरोबर जुळेल तेव्हा मला लहान न समजले म्हणजे झाले! काही करून त्या कालच्या राजकुमाराबद्दल काहीच बोलत नाहीत म्हणजे काय? असा राजबिंडा जावई शोधूनही सापडणार नाही आणि उगाच आटे दाल का भाव बघत बसलेत! किती वेळ गेला कुणास ठाऊक पण आवाज बंद झाला यायचा नि मी डोक्यावरून पांघरूण हटवून उठून बसली. वो कौन था? अजूनही सस्पेन्स कायम त्या सिनेमातल्या सारखा! काल त्याच्याकडे पाहताना सारे कान, नाक, डोळे .. नाही डोळे सोडून सारे.. बंद केलेली मी. त्यामुळे त्यातून काही माहिती मिळाली असती.. किमान नावबिव तरी. मनातल्या मनात मी स्वतःवर चिडली. पुढच्या वेळेस सावध रहायला हवे म्हणून मनाशी पक्की खूणगाठ मारून बसली मी. फक्त ती वेळ कधी येईल .. की येणारच नाही कुणास ठाऊक!

इथे मला ते पू.स्वामी अरपितानंद आठवले. ते म्हणतात, 'सकारात्मक विचारांचा प्रभाव मोठा बरे! शोधल्यास भगवान पण मिळतात .. सकारात्मक शोध घ्या. ह्या जगात नामुमकिन काही नाही वत्स!'

अरपितानंद स्वामी म्हणजे डायरेक्ट देवाशी हॉटलाईन असणारे! नाही, तुम्हाला वाटेल मी त्यांचाकडे गेली. ते तसे काही नाही काही. मी फक्त ते विचार मंथन करत बसली. किती ग्रेट वाटले सांगू. मंथन वगैरे म्हटले की काहीतरी मोठे केल्यासारखे वाटते की नाही? तो शब्द

स्वामींचाच! मी आता सकारात्मक विचार करणार .. सकारात्मकच विचार करणार .. सकारात्मक विचारच करणार.. नाही,  सकारात्मक विचार करणारच! म्हणजे काय करावे? स्वप्नातले एक छतरीवाले गाणे म्हणजे सकारात्मक विचारांचा परमोच्च बिंदू नव्हे का? पण तो पुरेसा नसावा. अजून विचार करायला हवा!

मधे काही दिवस असेच गेले.

विचार आणि विचार!

मी अधूनमधून अशी विचारांत गुंग दिसू लागली की आई विचारायची "कसला गं विचार करतेयस मने?"

मी काय ताकास तूर लागू देतेय?

मी कसला विचार करत होती मला माहितीय..

काय ते.. ते काय म्हणतात ना.. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी.. बस तू ही तू! सकारात्मक अगदी!

जय स्वामी अरपितानंदजीकी! जय हो!

४

# तो सापडला?

# अर्थात

# तुंबाऱ्याची गोष्ट!

सकारात्मक विचारांचा सकारात्मक फायदा लवकरच दिसला मला. म्हणजे त्या अजनबी राजकुमाराचे दर्शन वगैरे नाही, पण घरातच काही हिंट मिळाली मला. म्हणजे झाले असे की इतक्या दिवसात मला समोर असून दिसले कसे नाही कुणास ठाऊक! किंवा स्वामीजी म्हणतात तशी वेळ यावी लागते एखाद्या गोष्टीची! त्या दिवशी संध्याकाळी बसले होते बाहेरील झोपाळ्यावर झोके घेत. हवा सुटलेली जोराची. मनातही अर्थातच, तेच विचारांचे झोके! तात्या बाहेरून आले तेच घाईघाईत. घरात शिरले.. समोरच्या कपाटातून त्यांनी एक पुस्तक काढून बाहेर ठेवले आणि आईला म्हणाले, "अगं जातो मी लगेच. ते पुस्तक राहून गेलेय त्यादिवशी. ते देऊन येतो."

माझ्या डोक्यात लख्खन् प्रकाश पडला. तो.. म्हणजे राजकुमार.. आला तेव्हा त्यानेच आणलेले पुस्तक ते. तात्या म्हणालेले त्याला, "देतो लवकरच."

म्हणजे त्या पुस्तकास त्याचा हात लागलाच असला पाहिजे. काय असेल त्या पुस्तकात? कदाचित त्याचे नाव.. किंवा फोटो? तात्या आत गेले तशी मी त्या पुस्तकावर झडप घातली. आणि इतके दिवस मला कसे काय आठवले नाही याची खंत करत बसले. तात्या आले बाहेर.. म्हणाले, "दे देऊन येतो ते पुस्तक."

मी अगदी माझ्या अभिनयक्षमतेची पराकाष्ठा करीत म्हणाली, "कोणाचे हो तात्या पुस्तक? अगदी घाईत आलात नि द्यायला चाललात?"

माझ्या बोलण्यात नक्कीच निरागसपणा असणार. तात्या क्षणभर थांबले नि म्हणाले, "वाचायचेय तुला? मग उद्या नेतो. मला वाटले वेळ आहेतर काम संपवून टाकतो!"

मला जणू पुस्तके वाचण्याचा छंद असावा अशा थाटात म्हणाली मी, "होय तात्या उद्या देते सकाळी. पण कसलेय ते पुस्तक? कोणी लिहिलेय? आणि कुणाला द्यायचे ते परत?"

"वाच की.. कळेलच! आणि मी देतो उद्या ज्याचे आहे त्यास.."

"म्हणजे?"

राजकुमाराला? शेवटचा शब्द अगदी ओठावर आलेला पण त्याला मुश्किलीने आत ढकलला मी.

"तुला कशास उचापती नसत्या .. उद्या मात्र सकाळी पुस्तक दे .."

तात्यांनी विषय असा संपवून टाकला. मी मात्र माझा शोध थोडीच संपवणार होती? हे पुस्तक तर हाती आलेय पण त्याचा राजकुमाराचा शोध घेण्यात उपयोग किती? कोण जाणे. हां.. त्याचे नाव माहिती होईतो त्याला मी राजकुमार म्हणतेय.. तेव्हा अगली सूचना मिलने तक.. राजकुमार म्हणजे, तोच!

पुस्तक घेऊन मी आत गेली.

जणू प्रेमपत्रच असावे असे वाचायला! माझी पुस्तकांशी अशी दोस्ती असती तर बीएला क्लास नसता मिळाला? नसो. कुठले पुस्तक आहे ते, यावर ते अवलंबून.. नाही का? पहिल्याच पानावर दोन नावे होती.. एक लेखकाचे नाव.. 'प्रेमानंद जगदाळे' आणि वर त्याच्या मालकाचे

नाव.. तेही 'प्रेम'! नुसतेच प्रेम. आडनाव वगैरे नाही. त्याखाली तारीख. दोन्ही व्यक्ती एकच असाव्यात की वेगवेगळया? शक्यता मात्र दोघांपैकी एक त्या राजकुमाराचे नाव असायची. आत पत्ता होता तो प्रकाशकाचा. लेखकाची ओळख होती, पण फोटो टाकण्याइतपत आपले मराठी प्रकाशक प्रगत झाले नाहीत अजून. पण त्यामुळे माझ्यासारख्यांची किती अडचण होते याचा त्यांना काहीच अंदाज नसावा! पण सकारात्मक विचारांची सकारात्मक आठवण झाली मला. त्यामुळे पुढे प्रेमानंद म्हणजे प्रेम म्हणजेच माझा राजकुमार.. हे असेच असणार ठरवून मी वाचायला बसली. आणि हे असेच असले तर कमीत कमी हे पुस्तक वाचलेले असायला हवे! 'प्रेमानंद जगदाळे.. एक प्रथितयश विद्रोही लेखक' अशी ओळख होती. उपरोध आणि उपहासपूर्ण शैली आणि सामाजिक विषयांवर घणाघात ही त्यांची व्यवच्छेदक लक्षणे असेही म्हटलेले! व्यवच्छेदक! म्हणजे काय? असेल काहीतरी! पण एकूण लक्षण चांगले दिसत होते. मी प्रीती आणि तो प्रेम! वा! काय जोडी बनेल नाही? रब ने बना दी जोडी आणि काय! बना दी म्हणजे बनवेल! प्रीती प्रेम जगदाळे! वा!

हां.. तुम्ही म्हणाल, मी प्रीती कशी? आई तर मनी म्हणते मला. त्याचे कारण एकच, मी मांजरीसारखी साय खायची लहान असताना, तेही चोरून. तेव्हा मनी नाव पडले. ते दुधाच्या भांड्याला साय चिकटावी तसे चिकटलेच मला. पण माझे नाव.. प्रीती! आणि तो.. प्रेम! पण हा प्रेम चोप्रासारखा तर नाही ना निघणार? नाही.. माझ्या मना हो सकारात्मक! प्रीती आणि प्रेम.. स्वप्ने पाहात मी बसली नि पुस्तक वाचायचेच विसरली. रात्री जाग आली तर आई जेवायला उठवत होती. काय स्वप्ने पडली आठवत नाही पण माझे हे असेच. पुस्तक आले डोळयापुढे की झोप आवरत नाही मला. नाहीतर बीएला क्लास चुकला असता का अवघ्या बारा टक्क्यांनी? रात्री मांडी घालून पुस्तक उघडून बसलीच. एक प्रेमकथा होती ती. सामाजिक काही पार्श्वभूमी. मुलगा दलित आणि अनाथ. मुलगी चांगल्या खात्यापित्या घरची. त्यात मुलगी कमी शिक्षित. मुलगा

मात्र उच्च शिक्षित. नाव होते पुस्तकाचे, 'तुंबाऱ्याची कथा'! प्रेमकथाच ती. त्यात हा मुलगा विनोदी. कथा गंभीर पण हा बिनधास्त मारत सुटलाय विनोद! हाच प्रेमानंदाचा विद्रोह की काय? जहाल शब्द विनोदामागे लपवून आणलेले ते मात्र छान. तरीही व्हायचे तेच झाले. झोप आली आणि झोपी गेलेली जागी झाली तेव्हा पुस्तक घेऊन बाबा निघून गेले होते.

राजकुमार, किंवा कदाचित प्रेमानंद, किंवा नुसताच प्रेम येऊन गेल्याला आता चांगले दोन आठवडे होऊन गेलेत. सकारात्मक विचार म्हटले तरी किती करणार? काहीतरी करायला पाहिजेच. पण करणार तरी काय? सिनेमात कशा अशा वेळी नायिकेच्या मैत्रिणी मदतीला येतात. काही नाहीतर तिला चिडवतात तरी आणि ती लाजून चूर बिर होते. मला मदत करायला कोण येणार होते आता? तरीही चोरून लपून मी आरशासमोर लाजून चूर होतच होती! का कुणी यावे याबद्दल ही करू विचार .. सकारात्मक अगदी? पंधरावीस दिवसांत ते पुस्तक सोडून काहीच हाती नाही लागले .. पण स्वामी म्हणतात, सबुरी! ती ठेवलीच पाहिजे. नाहीतरी दुसरे करण्यासारखे काय होते माझ्याकडे? पण काहीतरी हातपाय हलवायला हवेत..

हलवीनही. पण कुठल्या दिशेने?

उगाच दिशा चुकली तर आग सोमेश्वरी नि बंब रामेश्वरी पोहोचायचा!

५

## सकारात्मक!

## अर्थात

## प्रेमाकडे पहिले पाऊल!

विचार केला तर वाटते आतापर्यंत झालेच काय माझ्या गोष्टीत? एकदा मी तो जो कुणी होता त्याला पाहिले आणि आवडला मला तो. तो कोण कुठला.. कशाचा पत्ता नाही! यापेक्षा जास्त काहीच घडले नाही. पुढे तरी काही व्हावे की नाही? अर्थातच. काय आहे आपल्याकडे कधी आपण अशा अर्धवट गोष्टी सांगतो का? म्हणजे ज्यात काहीच घडले नाही अशा? अशा गोष्टी घडतातच, पण कुणी सांगत बसत नाही त्या. एखादी शोकांतिका असतेही पण तिच्यातही दु:खद का होईना, अंत असतोच. त्यामुळे मी सांगतेय ही गोष्ट म्हणजे तिला काही न काही शेवट असायचाच! 'दे लिव्हड हॅपिली एव्हर आफ्टर.' हा शेवट! त्याच्या मध्येमध्ये काय काय घडले हे मात्र सांगितलेच पाहिजे. तेच नाही सांगितले तर निम्म्याहून अधिक सिनेमे बनलेच नसते! त्यामुळे शेवट माहिती असला तरी गोष्ट सांगायलाच हवी. फक्त एक आहे.. हा असला शेवट हे मला कुठे आधी माहिती होते? माझीतर सुरूवातच 'वो कौन था' पासून झालेली. एक आता मला लक्षात आले त्यानंतर .. कुछ तो करना पडेगा. त्या पुस्तकातून हिंट मिळाली असती का? कुणास ठाऊक!

पण माझ्या स्वामींच्या महिम्याची प्रचीती लवकरच आली मला! होय अशा गोष्टींना अनुभव नाही तर 'प्रचीती' म्हणतात! अशा म्हणजे साधुपुरूषांकडून येणाऱ्या! तर माझ्या या शोधात अचानक एक क्ल्यू मिळाला. तात्या रात्री बोलत बसलेले आईशी. अचानक प्रेमानंद

जगदाळेचा उल्लेख आला. नेहमीप्रमाणे आधी लक्ष नव्हते माझे. त्यामुळे कुठून ते संभाषण सुरू झाले कळले नाही.

"बराय मुलगा!" आई म्हणाली आणि मी कान टवकारलेच!

"अगं नोकरीत असले लोक टिकत नाहीत. त्यामुळे थोडे सांभाळून घ्यायला लागते. पण जगदाळे थोडा गरम डोक्याचा आहे."

"प्रेमानंद? दिसतो शांत अगदी."

"मला विचार. त्याला पुस्तक दिले परत. वाचले की नाही विचारत होता. अगं लिहितो चांगला पण थोडासा एक टोकावर जाऊन लिहितो."

या क्षणी ते पुस्तक पूर्ण न वाचल्याचा पश्चात्ताप झाला मला. तरीपण आता पुढे यातूनच काही माहिती मिळेल इतके जाणवून मी बोललीच,

"त्या पुस्तकाबद्दल बोलताय? तुम्ही ओळखता त्याला? म्हणजे तोच लेखक आहे?"

"अगं त्यादिवशी नाही का आलेला तो?"

"श्रीखंडपुरी खाऊन गेला तो?"

"हं.. मने तोच. अगं लिहितो तो. त्याचे पहिलेच पुस्तक. मला म्हणाला वाचून सांगा.. आमच्या ऑफिसात येत जात असतो कधीकधी. तुला आवडले का ते?"

आता खरे सांगावे तर पंचाईत. नाही वाचले म्हणावे आणि कधी तात्यांना तो भेटला तर.. बोलता बोलता तात्या सांगतील.. 'काय तुमचे पुस्तक.. आमची मनी झोपून गेली वाचता वाचता!'

मी म्हटले प्यार दीवाना होता है तसाच चोरटा पण होता है. आणि खोटा पण बोलता है जरूर पडल्यास! त्यामुळे मी खोटे बोलणे पत्करले. आणि दिमागकी बत्ती जल गयी! म्हटले,

"तात्या.. मला तर आवडले पुस्तक .. हाती घेतले ते वाचल्यावाचून सोडवेना. रात्रभर जागून वाचले मी! तुम्ही सांगा हां त्यांना नक्की मला आवडल्याचे!"

मुद्दाम आदरार्थीवचन वापरत बोलली मी. आणि मी मोठा नि:श्वास टाकला. प्रेमकी ओर बढनेवाले मेरे प्रेमके पहिले चिमुकले कदम!

माझा विश्वास बसेना. इतक्या चुटकीसरशी त्याचा ठावठिकाणा कळावा! मी ठरवले.. लोहा गरम है तब तक ठोको उसको.. मंगता है इतका!

मी इतक्या झरकन सारे ठरवू शकते हे मला कधीच पटले नसते एरवी. पण मी इमर्जन्सी निर्णय घेतले. पुस्तक वाचल्याचे एक खोटे.. मग त्यापुढे अजून खोटे का बोलू नये? 'एक खून को भी फांसी और दो को भी फांसीहीच!' आठवला तो फेमस डायलॉग मला. एका खोट्याचे ते पाप नि दुसऱ्याचे पण..  पापच! मग का नाही दामटावे घोडे पुढे?

म्हणून मी पुढे बोलली, "वाटत नाही पहिलेच पुस्तक असेलसे. सराईत लेखक असावा असे वाटते! आणि मी तर त्या पुस्तकातली काही वाक्ये पण लिहून काढलीत! छान आहेत."

एवढी मेहनत केली असती तर.. परत तेच.. बीएला क्लास नसता मिळाला?  मी हळूच आई आणि तात्यांच्या तोंडाकडे पाहून घेतले. बहुधा तात्या त्या पुस्तकाच्याच विचारात असावेत. आणि आईचे लक्ष नसावे. नाही तर मी सांगते त्यावर विश्वास नसता बसला त्यांचा. आपल्या बीए झालेल्या मुलीस आवडले म्हणजे पुस्तक चांगले असावे इतपत मला वाटते त्यांना समजले असावे. कारण त्यांचा चेहऱ्यावरचे भाव बदलले.

"असं म्हणतेस? मग मी सांगतो आमच्या साहेबाला.. दुसरी एडिशन आपण काढू! नाहीतर नवीनच काढू त्याचे पुस्तक."

तात्या 'रंगढंग प्रकाशना'त आणि त्यांचे काम हेच.. होतकरू लेखक शोधणे! त्यामुळेच त्यांनी प्रेमला बोलावले असणार घरी! ही संगती मला इतक्या उशीरा लागावी? याआधी ही एक

दोनदा कुणाला आणलेले घरी. इतक्यात विसरले मी? हा सारा प्रेमाच्या प्रेमाचा प्रताप .. आणि काय! पण आता या नव्या पुस्तक प्रकाशनात मला आशेचा किरण दिसला. काहीतरी होईल आता. कुठे न कुठे काहीतरी चक्रे फिरवीनच मी! फक्त हलवून खुंटा बळकट करावा तसे म्हणाली मी, "होय तात्या, एकदम बेस्ट सेलर! काय भाषा.. आणि विचार आणि विनोद!" एवढे बोलून थांबली नाही मी.. उचललीच होती जीभ तर टाळूला लावून बोलली, "तात्या एकदा भेटायला हवे या लेखकाला!"

माझ्या या साहसाचे मलाच कौतुक वाटले. बहुधा कोण तो खुदा, प्यार देता है तो आयडिया पण अपनेआप आ ही जाती हैं. एकतर मी पुस्तकाची तारीफ केली, त्यावर नोट्स काढल्याचे सांगितले .. आणि आता वर 'लेखक तुमच्या भेटी'ला याची पण सोय करून घेतली! इतक्या दिवसांतल्या सकारात्मक विचारांचा सकारात्मक परिणाम असावा! असावा कसला, असावाच! स्वामीजी म्हणतात ते खोटे कसे असेल?

जय स्वामी अरपितानंदजी की!

६

# टर्निंग पॉईंट !?

# अर्थात

# प्रेम की ओर?

विचार केला मी तर वाटले प्रीतीच्या प्रेमकथेतला हा सगळयात मोठा टर्निंग पॉइंट म्हणावा! खरेतर इतके दिवस मी असेच घालवले. आता पुढे काहीतरी व्हायलाच हवे! तात्या त्याला भेटतील.. माझ्या मुलीला तुमचे पुस्तक इतके आवडले म्हणून सांगतील .. तो आपल्या या कदाचित एकुलत्या एक फॅनी ला भेटायची इच्छा व्यक्त करेल.. मी त्याला मग भेटेन.. इथवर तरी गोष्ट पुढे सरकायला हरकत नाही.. असा विचार करत मी 'प्रीती जगदाळे' अशी सही कशी करायची त्याची प्रॅक्टिस करायला लागले. ते कुठले गाणे आहे ना ते आठवत.. 'समझो हो ही गया!' आता तात्या काय खबर आणतात ते पाहू!

पण हाय! पुढच्या आठवड्याभरात तात्या काहीच बोलले नाहीत. त्यांनी बोलावे असे काही नव्हते खरे. पण मला वाटले तसे त्यांनी मला येऊन सांगायला तरी हवे होते की नाही? त्यांच्या ऑफिसच्या कामात मी इतकी मदत केली तर? पण ते काहीच बोलले नाहीत आणि परत एकदा विषय कसा काढावा ते कळले नाही मला. पण शेवटी एकदा म्हटलेच मी त्यांना, "तात्या त्या लेखकांना सांगितलेत का मला पुस्तक आवडल्याचे?"

मुद्दाम मी नाव घेतले नाही त्याचे. परत बहुवचनी उल्लेख! आपल्याकडे नवऱ्याचे नाव घ्यायची पद्धत नाही म्हणे! तो नवरा नसला झाला अजून तरी काय झाले! संस्कार म्हणून काही असतात ना.. ते असे दिसत असतात!

तर तात्या म्हणाले, "सांगितले असते त्याला, पण विद्रोही ना तो. म्हणाला, पुस्तकामुळे कुणाच्या विचारात बदल होईल तर ते खरे. मग मीही पुढे म्हणालो, पुढचे पुस्तक घेतो आम्ही.

त्यावर काही बोलला नाही तो. बघू म्हणे. अगं असा प्रकाशक स्वतःहून कुणाचे पुस्तक प्रकाशित करतो का? ते आमचे एक मालक आहेत.. तरूण होतकरूंना मदत करणारे म्हणून आणि हा बघू म्हणतो!"

"म्हणजे? म्हणजे काय?"

"म्हणजे एवढेच .. थोडा भाव खातोय दिसतोय.."

"पण त्यांना भेटून पुस्तकावर चर्चा करायची म्हणावे मला.. भेटू शकते का मी? त्यात तुमच्याकडे दुसरे पुस्तक द्यायला पण सांगेनच मी.."

प्रत्यक्ष स्वतःच्या वडलांना असे मधाचे बोट लावावे मी! हे प्रेम.. आणि हा प्रेमसुद्धा.. काय काय करायला लावेल कुणास ठाऊक! पण युद्धात नि प्रेमात सारे क्षम्य असते म्हणे. आणि तसेही माझे प्रयत्न त्यांना जावई मिळवून द्यावा म्हणूनच तर होते. त्यामुळे मोठया मनाने मी स्वतःलाच माफ करून टाकली.

"तू म्हणतेस ते ठीक आहे मने. काही लेखक उगाच भाव खातात. तू बोललीस तर मानेलही तो. मी बघतो.."

तात्या इतक्या सहजपणे मानतील अशी अपेक्षा नव्हती माझी. पण त्यांनी मानले आणि एकाच वेळी मी खूशही झाली नि चिंतित ही! त्याने पुस्तकाबद्दल काही विचारले तर मी काय बोलणार होती? आणि त्यात मलातरी कुठे इंटरेस्ट होता? पण नावापुरते तरी बोलावे लागणार होतेच. त्याहूनही मोठे टेन्शन होते ते तात्यांचे. त्यांच्यासमोर झाली भेट तर सगळेच मुसळ केरात.

एकवेळ त्या प्रेमला मी माझ्या प्रेमाने करीनही गारद, पण प्रत्यक्ष तात्यांसमोर? माझी झोप उडाली असे नाही म्हणणार मी. कारण सकारात्मक विचार! स्वामी म्हणतात तसे! उगाच इकडतिकडचा विचार कशाला? त्यापेक्षा मस्त झोपावे.. स्वप्न पहावे आणि जे होईल ते ते ही पहावे. आजवरच्या सब्रची फळे तरी गोडच दिसताहेत! सारी कृपा स्वामींचीच!

दोनच दिवसांत तात्यांनी त्यांच्या ऑफिसात प्रेमला बोलावणे धाडले. म्हणजे मला तसे आगाऊ सांगितले, "ये जरा त्याला भेटायला. बघ लेखकराव कसा मानतो की नाही!"

म्हटले तर ही संधी होती, म्हटले तर संकट! संकटात संधी शोधणारेच इतिहास घडवतात म्हणे! पण संकट की संधी.. काही असो, त्यास तोंड देण्याशिवाय दुसरा उपायदेखील नव्हता. दोन दिवस हाताशी होते. काहीतरी उपाय करावा लागेलच. पण तो काय नि कसा? आजवर साऱ्या संकटांत रस्ता मी शोधला होता. खरेतर ह्या सगळ्यांना संकट म्हणणे हेच चुकीचे. पण कोणी मदतीस नसताना निव्वळ नशिबाच्या साथीने आजवर ही मजल मारलेली मी. अजून दिल्ली दूर आहे पण त्यादिशेने थोडीफार मजल तर मारावीच लागणार आहे मला.

आता मी काय करणार?

एकतर त्याला भेटणेच टाळणे. पण याचसाठी केला होता अट्टाहास! नाहीतर भेटण्याची जागा बदलणे .. जेथे तात्या नसतील! हे कसे व्हावे?

कॉलेजात जाण्याचे फायदे काही असतील इतर पण मुख्य म्हणजे आपल्याला हवे ते मित्र मैत्रीणी भेटतात. त्यांच्याशी आपल्याला हवे ते बोलता येते. आता मला माझ्या मैत्रिणीची आठवण आली. तिच्या लग्नासाठी आम्ही सगळ्यांनी फार मेहनत घेतलेली एका वर्षापूर्वी. आता परतफेड

करण्याची वेळ आली समजा! तिच्याशी बोलले काय.. पुढे झाले काय.. आणि काय काय.. सारेच तसे गंमतीदार. म्हणजे आता तसे वाटते. प्रत्यक्ष तसे घडताना ठाऊक नाही कसे वाटायचे ते!

७

## पहिली लढाई

## अर्थात

## प्रथम भेट!

दोन दिवस गेले. भेटण्याची हुरहुर एकीकडे आणि काय होणार त्याचे टेन्शन दुसरीकडे. काय होणार पेक्षा सारे नीट होणार की नाही याचे टेन्शन! प्रेमने पुस्तकाबद्दल विचारले तर? मी त्याची फक्त प्रस्तावना वाचलेली तिच्या जोरावर काय काय बोलणार? अगदी परिसंवादात विचारल्यासारखे प्रश्न विचारले त्याने तर पुढे काय बोलणार मी? काय करावे नि कसे करावे?

सकाळी स्वामीजींचे नाव घेतले नि म्हटले, आता होऊन जाऊ देत. ऑफिसात पोहोचली तर तिथे तात्या वाटच पाहात होते. मोठे टेबल. समोर दोन खुर्च्या. बाजूला फोन त्यांच्या. त्याच्याकडे पाहात बोलली मी, "तात्या, ते आलेत का?"

अजून त्याला यायला एक तास होता अवकाश. मीच लवकर येऊन बसलेली. तात्यांच्या ऑफिसात त्यांची स्वतःची केबिन. त्यात तात्या बसलेले. समोर मी. प्रेम येण्याची वाट पाहात.

तात्या म्हणाले, "तू त्या नोट्स काढलेल्या म्हणालीस त्या आणल्यास ना?"

"नोटा?"

मी ते तेव्हा सांगितलेले खोटे इतक्या लवकर विसरली की काय? स्वामी म्हणतात ते खरे, सत्य बोलणे सर्वात सोपे. पण सोप्या गोष्टी कोणीही करेल.. हो की नाही? पण मी दचकून जागी

झाली. आधी सांगितलेल्या गोष्टी इतक्यात विसरून कसे चालेल. थोडे जास्तच जागरूक राहायला हवे. सावरून म्हणाली मी, "नोट्स ना? त्यांची काय गरज. सारे काही डोक्यात आहे माझ्या!"

हे खोटे नव्हते खरेतर! सारे डोक्यात होते. फक्त त्यातले डिटेल्स वेगळे होते! त्यांचा त्या पुस्तकाशी काहीच संबंध नव्हता एवढेच!

इतक्यात प्रेम आत शिरला केबिनमध्ये.

तसाच होता तो. मी डोळे फाडून एकटक पाहात राहिली त्याच्याकडे. हाच तो क्षण.. हाच ज्याची वाट पाहिली मी! आता पुढचा एखादा तास प्रेम आणि मी! बस, तो फोन वाजला की तात्यांना जावेच लागेल. मग मी हवे ते बोलायला मोकळी!

"या! या! प्रेमानंद. लवकर पोहोचलात?"

"नमस्कार. हो जरा लवकर जायचे एकीकडे म्हणून. तुम्हाला चालेल ना?"

"हो.. हो. ही माझी कन्या. प्रीती.. आणि प्रीती.. हे प्रेमानंद!"

मी बावचळून उभी राहिली. प्रेम इतक्यात म्हणाला, "खरेतर येणार नव्हतो.. फोन करून सांगू म्हटले तर.."

"अहो, फोन डेड आहे! दोन दिवस झाले!"

फोन डेड! माझी आता डेड होण्याची पाळी होती! माझी ती मैत्रीण आणि तिचा नवरा, कालिंदी आणि मिलिंदा.. दोघांनी प्लॅन बनवलेला. ठीक बारा वाजता फोन. तात्यांना. माझे काका राहतात तिकडे डोंबिवलीत त्यांच्याकडून फोन. तब्येत बरी नसल्याचा. तात्या थांबतात कसले. तडक निघतील धडक डोंबिवलीला जायला. आणि इथे मी आणि प्रेम .. प्रेमाच्या मारू गप्पा! म्हणजे मी तसा करीन प्रयत्न. पण फोन गप्प म्हणजे मीही गप्प होणार आता! तात्या समोर

असताना पुस्तकाशिवाय दुसरे काय बोलणार बिचारी मी? तरी मनातल्या मनात मी स्वामींचे नाव घेतले. मनाशी म्हणाली, आज नाही तर कधीच नाही. आता पुढे काहीतरी चांगलेच व्हायला पाहिजे. बी पॉझिटीव्ह!

तात्यांनी सुरूवात केली, "तर प्रेमानंद, तुमचे पुस्तक हिला आवडले खूप. ही सांगेलच. बोल गं."

मी काय बोलणार? एकाएकी मी ठरवले, त्या पुस्तकाबद्दल बोलायचेच नाही त्या! दुसऱ्या पुस्तकाबद्दलच बोलायचे! ते लिहून झाले असो की नसो, मी वाचण्याचा तर प्रश्न नाही! पण प्रेमनेच सुरूवात केली,

"तुम्हाला काय आवडले त्या पुस्तकात?"

हाच तो क्षण! या इथे चुकून चालायचे नाही. त्या पुस्तकात अडकायचे नाही!

मी एकाएकी माझ्या वाचन आणि आकलनशक्तीची परीक्षा आहे समजून बोलली, "आवडले ते सारेच.. पण मुख्य म्हणजे तुमचे पुढचे पुस्तक वाचायला आवडेल मला!"

"नाही, पण त्या शरणकुमार आणि शारदा साठे यांचे .."

कुठे तरी समीक्षेत वाचलेली भाषा आठवली, नि मी म्हणाली,

"ते ठीक आहे.." मी वाक्य तोडत बोलली. "दोघांबद्दल आपण जास्त खोलात आता नको बोलायला.." ह्या दोन पात्रांची नावे वाचलेलीही मला काही आठवेनात.. म्हणून पुढे ती टाळत म्हणाली, "पण तुमच्या भाषेत नि लिखाणात साहित्यिक आणि असाहित्यिक कोंडी फोडण्याची एक ताकद आणि क्षमता आहे. तुमची लेखणी कुणाच्या आवडीनिवडीची मोहताज नाही! मिंधेपणा तिला मंजूर नाही! तिला इतरही आयाम आहेत.. तिच्यात साहित्य निर्मितीची जी ऊर्मी दिसते

ती आजकालच्या युवा आणि नवीनतम लेखकांत क्वचितच आढळून येते.. तुमच्या लिखाणातून कुणी स्फूर्ती घेतली असेल तर ती मी!"

पुढे काय स्फूर्ती घेतली विचारले तर? पण मी बिनधास्त होती. इथवर मी कितीतरी काहीतरी समीक्षेच्या भाषेत बोलून टाकलेली! एकूण माझ्या भाषेने प्रेम गार पडलेला दिसत होता! कारण त्याच्या चेहऱ्यावर एक समाधानाची भावना होती. कदाचित अशी कोंडीबिंडी फोडण्याचा विचारही नसावा आला मनात त्याच्या. माझ्या बोलण्याने तात्यापण इंप्रेस झाले असावेत. मूळ विषयाबद्दल काही माहिती नसताना डिस्टिंक्शन मिळवल्यासारखे वाटले मला. अर्थात अजून धोका टळला नव्हताच.

"तुम्ही म्हणता ते खरे आहे. म्हणजे शरणकुमारच्या आई नि मामाच्या भूमिकेबद्दल काय वाटते तुम्हाला?"

आली पंचाईत! मुदलात शरणकुमारच माहित नसताना त्याचे मातुल घराणे कुठून माहिती असावे मला? माझ्या समीक्षक भाषेतल्या शब्दांची अस्त्रे संपत आलेली. कोंडी फोडून झाली एकदा.. आता काय फोडू.. एकाएकी आठवले, वाचा! मनातल्या मनात मी युरेक्का ओरडली आणि म्हणाली, "काय आहे विद्रोही लेखकाच्या शब्दाशब्दातून विद्रोह डोकावत असतो. तुम्ही विद्रोहास वाचा फोडण्याचे काम केलेय यातून. पुढच्या पुस्तकात यापुढे काय याची उत्सुकता चाळवण्याचे काम केलेय ह्या पुस्तकाने. तुमच्या पुढच्या पुस्तकाबद्दल सांगा ना.."

मी परत सुटकेचा निश्वास टाकत विषय दुसऱ्या पुस्तकाकडे वळवण्याचा प्रयत्न केला. तात्या माझ्या बोलण्याने खूश दिसत होते. एकाएकी उठले नि म्हणाले, "मी येतोच.. तुम्ही बसा बोलत!"

मी मनातल्या मनात खूश झाले! आता काही कार्यभाग साधणे शक्य आहे..

"दुसरी माझी कथा आहे ना त्यातही शरणकुमारच असेल. एखाद्या मानसपुत्रासारखे ते पात्र घडवण्याचा विचार आहे माझा. ही कथा शहरी भागात घडेल नि त्याच नायक नि नायिकेच्या मार्गात काटे असतील ते शहरी दुर्बलांच्या समस्यांचे!"

"दुर्बलता शहरी भागात अधिक तीव्रतेने जाणवू शकते! त्यात शहरी भागातील मला काय त्याचे या अलिप्ततेने नवीन कंगोरे फुटू शकतात!"

माझ्या या बोलण्याचे मला चांगलेच नवल वाटले. असे शब्द मला येत असतील हे मलाच ठाऊक नव्हते!

"तुमचे म्हणणे खरेच आहे! मला वाटते माझ्या पुस्तकाचा एकेक भाग लिहून झाला की मी तो तुम्हाला देत जाईन.. तुमच्या वडलांबरोबर पाठवत जाईन. तुमचे मत जाणून घेतल्यावरच.."

"तात्यांबरोबर..? नको नको.. "

मी जवळजवळ ओरडलीच! त्याच्या त्या सूचनेत पुढे भेटी घडण्याची शक्यता होती. पण त्यात तात्या कशाला? ते शेवटी अक्षता टाकायला आले तरी चालेल!

"का हो? म्हणजे तुमच्या कामात अडचण होत असेल तर राहिले.. पण आजकाल असे विचक्षण वाचक मिळतात कुठे?"

विचक्षण! म्हणजे काय असेल. तसा शब्द विलक्षण आहे! पण ही संधी सोडून चालायचे नाही!

"कामात अडचण नाही हो. पण प्रत्यक्ष भेटण्यात लेखकाच्या मनातल्या भावना जाणून घेता येतात. आणि आपण तोंडी बोलतो ते लिहिताना काही निसटून जाते ना चिमटीतल्या वाळूसारखे!"

"असे म्हणता? ठीक आपण इथेच भेटू नंतर .."

"इथे?" मी माझा ओरडण्याचा टोन मुश्किलीने बदलून म्हणाली, "नाही म्हणजे तात्यांच्या ऑफिसच्या कामात आपला खाजगी व्यत्यय कशाला?"

यातला 'खाजगी' शब्द मी विचार करून पेरला होता!

"मला वाटते मला एक महिना तरी लागेल पहिल्या प्रकरणाला! मग ठरवू कुठे भेटायचे ते!"

प्रकरण! हा शब्द अगदी योग्य होताच! माझेही पहिलेच प्रकरण हे! प्रेमला माझा मोबाईल नंबर देण्याची हीच ती वेळ. तात्या परत येण्याच्या आत हे प्रकरण संपवायला हवे! झटकन मी बोलली, "मला माझ्या या नंबरवर फोन करा! नाहीतर मीच करते. आणि अख्खे प्रकरण लिहून होईतोवर कशास थांबायचे? प्रकरण त्याआधीही घडवता येईल .."

"काय? ह्या नंबर तुमचा! नाही म्हणजे लिहिण्याच्या आधीच्या स्टेजमध्ये चर्चा करून लिहिले म्हणजे.."

"खरंय तुमचे.."

प्रेमच्या चेहऱ्यावर निरागस भाव होते. खूप वेळाने आठवले मला, हाच तो चेहरा ज्याने उडवली झोप माझी. आज मोठा किल्ला लढवला मी. जिंकेन ही लढाई.. इतक्यात तात्या आत शिरले, म्हणाले, "काय.. प्रेमानंद जगदाळे, आता काय म्हणणे आहे तुमचे?"

"म्हणणे काय.. घरचेच समीक्षक असताना काय!"

घरचेच! प्रेमच्या बोलण्याचा अर्थ तसा नसणार .. खरेतर नसणारच! पण तरीही हवा तो अर्थ काढायला काय हरकत आहे?

"दुसरे पुस्तक देतो तुम्हाला! लिहायला घेतलेय. फक्त तुमच्या प्रीतीची मदत लागेल जरा.."

प्रीती!

प्रेमच्या तोंडून हे शब्द ऐकायला किती छान वाटले! फक्त 'तुमच्या' प्रीतीचे 'माझी' प्रीती झाली की झाले.. परत तेच वाटले, 'समझो हो ही गया!'

आजची लढाई तर जिंकली मी. तात्यांच्याच ऑफिसात बसून त्यांच्या नकळत! त्यांचा जावई समोर बसलाय नि त्यांना पत्ता देखील नाही! आणि प्रेमला तरी कुठे कशाचा पत्ता? तो आपला आपल्याच विद्रोहात दंग झालेला दिसतोय!

८

# काकुची मशाल

# अर्थात

# वन्ही तो चेतलाचि!

हे सगळे झाले म्हणजे पुढे सारे पटपट घडले असे वाटत असेल तर तसे नाही ते. तसा मला त्यादिवशी प्रेमचा नंबर, म्हणजे फोन नंबर मिळाला. माझा नंबर मी त्याला दिला. आमचे भेटून त्याच्या पुस्तकातील प्रकरणाबद्दल चर्चा करण्याचे ठरले. तात्यांच्या ऑफिसातून निघाले मी.. मला जणू गगनच ठेंगणे झाले. आता फक्त तीन चारदा भेटलो की काम तमाम!

घरी आली मी ती तरंगतच. हवेतच उडत आली मी जणू.. आज मैं उपर .. आसमां नीचे गात! तात्या पण माझ्यावर खूश होते.

.. पण आम्हा दोघांच्या खूश होण्याची कारणे मात्र वेगळी होती..

दोनचार दिवस गेले. मी त्याच्या फोनची वाट पाहायला लागली. हाती फोन घेऊनच बसायची मी. आता येईल तेव्हा येईल फोन.. पण छे! फोनचा पत्ता नाही! मी कंटाळली. अजून दोन तीन दिवसांत मात्र माझा संयम संपला. मी त्याला फोन लावलाच! त्याच्या फोनची रिंग वाज वाज वाजली नि वाजतच राहिली. कितीही वेळा फोन केला तरीही. आता पुढे काय? काय करणार मी? आजवर मार्ग निघाला तसा आताही निघेल! खरेतर तो एका महिन्यानी पहिले प्रकरण लिहून फोन करेन म्हणालेला. त्यानंतर झालेत फक्त चार दिवस. पण नंतर ही फोन केलाच नाही त्याने तर?

स्वामीजींची आठवण काढत बसली मी. आजवर इथपर्यंत पोचली आता पुढेही दाखवा मार्ग म्हणून! त्याचा फक्त नंबर घेतलेला मी. पत्ता नाही. त्याच्यापर्यंत पोहोचायचा आता कुठला शोधू मार्ग? उदास नि निराश व्हायला हे कारण पुरेसे होते. पण मला ती शिकवण आठवली.. जो चोच देतो तोच चाराही देईल! तर ज्याने त्याला भेटवले.. तोच पुढचाही मार्ग दाखवेल. नियतीचा संकेत हाच असावा की नाही? त्यानुसारच सारे होते तसे हे देखील होईलच.

कितीही मनाची समजूत घातली ना तरीही हे असेच होईल याची खात्री नसते ते होईस्तोवर. आता आठवून गंमत वाटत असेल भलेही पण प्रत्यक्षात एकेक क्षण जीवघेणा.. तात्यांना विचारायचे ठरवले मी. पण तात्या काय म्हणणार..? आधीच तात्यांना तो जास्तच भावखाऊ वाटत होता. त्यावर आता हे कळले तर? त्यांचे इंप्रेशन खराब झाले तर पुढे मागे ते नाही म्हणायचे. त्यापेक्षा त्यांना सध्या न विचारणेच योग्य. झाकली मूठ सव्वा लाखाची राहिल. अगदीच जर नाही जमले काही तर इमर्जन्सी प्लॅन म्हणून रिझर्व्ह ठेवू त्यांना आणि काय!

काय दिवस होते सांगू. हुरहुर मनात. भेटण्याची ओढ दुसरीकडे. परत परत डोळ्यासमोर त्यादिवशी समोर बसलेला प्रेम. आणि अनिमीष का काय म्हणतात मराठी गोष्टींत तशा नजरेने पाहात बसलेली मी! आणि त्यानंतर? पुढे कशाचा कशाला पत्ता नाही! कसे पोहोचावे त्याच्यापर्यंत? असे किती दिवस गेले सांगू? कंटाळली मी. कंटाळली म्हणण्यापेक्षा अधांतरी भविष्याने चिंतीत झाली. स्वामीजी झाले तरी प्रत्येक सिच्युएशनसाठी कुठून आणणार नवनवीन उपदेश? शेवटी तूच आहेस तुझ्या चिंतेला जबाबदार हे समजून मी स्वामींवर भार टाकणे सोडून दिले. आणि जे जे होईल ते ते पहावेच्या तयारीला लागली.

एवढी मानसिक तयारी मात्र एकाच दिवसात वाया गेली. माझी ती मैत्रीण .. तीच तात्यांना फोन करणार होती ती.. काकु.. आता काफा! कालिंदी कुरतडकर! लग्नानंतर कालिंदी फातर्फेकर! तिला अजूनही आम्ही काकुच म्हणतो.. तर ही काकु माझ्यासमोर येऊन उभी ठाकली!

काकु माझ्यासमोर उभी ठाकली तेव्हा मी डोक्यावर हात लावून बसलेली. काकुचा फोन तात्यांना लागला नाही त्यादिवशी हे खरे, पण त्यातून मी सहीसलामत निभावून गेलेली. काकु त्यानंतर शंभरदा फोनवर 'सॉरी' बोललेली. तेव्हा फोन बंद असण्यात काकुचा दोष तो काय? पण तरीही तिला वाईट वाटायचे ते

वाटलेच. अर्थात तिच्या आयुष्यातला 'योग्य जोड्या जुळवा' हा प्रश्न ज्या शिताफीने नि चातुर्याने सोडवलेला मी, ते पाहून तिला खात्री होती, यातून पण मी काहीतरी आयडिया काढेनच!

काकु आली आणि पहिल्यांदा तिने माझा डोक्यावरचा हात हटवला. नि गदागदा हलवत म्हणाली,

"प्री, तू ही अशी? इश्कने निकम्मा किया.. पर हाय गालिब.. नहीं तो तुमभी थी कुछ काम की!"

काकु असलीच बोलते भाषा. तरी बरे असली भाषा असूनही ती आणि मिलिंदा, म्हणजे आता तिचा नवरा, दोघांची जोडी जमवायला मी आणि अजून एक दोघी 'अकाव्य' जणीच मदतीस धावून आलेलो. अकाव्य म्हणजे असली काव्यमय भाषा न बोलणाऱ्या! नाहीतर काही खरे नव्हते तिचे! ती कथा सांगत नाही आता नाहीतर मूळ माझी गोष्ट मागे पडायची!

"अगं, आपले ते इंग्रजीचे भाटिया सर म्हणायचे ते आठवते.. देअर इज नो लाइट अ‍ॅट द दंड ऑफ द टनेल! अंध:कारमय जीवन माझे! माझ्या जीवनाच्या सुरनळीच्या टोकाला अंधारच अंधार!"

मी टनेलचे सुरनळी म्हणून भाषांतर केलेले पाहून एरव्ही काकु खो खो हसली असती. पण प्रसंगाचे गांभीर्य पाहून ती गप्प राहिली असावी.

"अगं, हिंमत जिसने हारी समझो वो खत्म हुवा .. कोणी म्हटलेय ते.. माहिती नाही बुवा! असे गाळशील हातपाय तर हाती तुझ्या लागेल काय? तेव्हा झाडून टाक तो निरूत्साह! आणि लाग कामाला. आठव ते दिवस जेव्हा तू न मी मिळूनी बनवलेल्या योजना कॉलेजच्या कट्ट्यावर बसून. तू अन तुझा गनिमी कावा.. पकडले मिलिंदा तेव्हा वाजवीत होता पावा. प्रीतीराणीचे काय ते योजना बनवणे, प्रीतीराणीचा आठवावा प्रताप.. आठवावे रूप! कैसे ते धारिष्ट प्रीतीचे असे! आणि असली ती प्रीती उभी गाळून हात न पाय! अरे हे चाललेय काय?"

"काकु.. तुला ठाऊक नसेल माझ्या मनची व्यथा अन वेदना.. जी मजला सहन होईना. अगं आठवडा उलटून गेला गं. तो भेटला.. आता फोनही उचलत नाही तो माझा. कसे होईल गं. मला त काहीच सुचत नाही."

"सुचत नाही? तुझ्या सुपीक डोक्यातल्या सर्व कल्पना वाळून का गेल्यात गं? की उडून गेल्या कापरासारख्या? अशा आपत्तीप्रसंगी उपयोगी न येई ते शहाणपण काय बरे कामाचे? अशी बसू नकोस उदास अन् निराश.. लेंगे हम तुम्हारे प्रेम को तलाश!

आता जरा हंस दे तू.. लब्ज खुशी के बोल दे तू.."

"हसली असती गं.. एक त्याचा पत्ता मिळाला तर पुढे काहीही करता येईल! मग मी हसेन.. तू म्हणशील ते करेन! त्याचे नाव शोधण्यापासून सुरूवात झालीय.. आता ते माहितीय तर गाव शोधावे लागेल त्याचे! गाव शोधल्यावर अजून काय शोधावे लागेल कुणास ठाऊक!"

"कुळ! कुळ शोध त्याचे! तो काय ऋषी नाही, कुळ शोधू शकतो आपण! पण मी काय म्हणते, बघ हां पटतंय तर.. एवढी शोधाशोध करण्यापेक्षा.. म्हणजे तसा चांगलाच असणार तो. पण आता नाही समजत कोण कुठला तो दादू तर चल आता दुसरा कुणी शोधू.."

"वा गं! विसरलीस वाटते स्वतःचे ते दिवस? मिलिंदाऐवजी चालला असता गोविंदा.. नगास नग? हा नसेल तर रिप्लेसमेंट? कसे बोलवते तुला हे?"

"अगं गंमत.. मला माहितीय एक बार दी गई वस्तू किसीभी हालत में परत नहीं घेते तुम लोग.. तर दिलकी बात तर काय! काहीतरी मार्ग काढू आपण. फक्त त्याचा हवाय पत्ता! अॅड्रेस! शोधून आणू घालून कुठलाही ड्रेस! फिक्र नाॅट.. म्हणजे वरी नाॅट!"

काकुच्या असल्या बोलण्याने तो प्रेमाग्नी परत न चेतता तर नवल! मोठ्या कष्टाने मी त्या निखाऱ्यांना राखेने झाकून टाकलेले आणि ही फुंकर मारून तो वन्ही तो चेतवावा करतेय? काकु ने आपल्या मशालीने परत दिलमें आग लगाई आणि त्या खाईत लोटली गेली मी पुन्हा! कुणी म्हटले ना म्हणे.. ये इश्क नहीं आसान.. इतना तो समझ लीजे.. एक आग का दरिया है.. और डूबते जाना है.. समजलीच मी आता!

माझा तसा गोरा नि काळा अशा रंगांवर विश्वास नाही. गोरेपण यावे म्हणून काही चोपडावे असले काही पटत नाही मला. तर मी तशी गोऱ्या जणींत मोडली जाते. तरीही स्वतःला बोलली मी, 'अब तेरा क्या होगा कालिये?' आणि ही गोरी कालिया अंगअंग शहारली. पुन्हा पेटलेला तो प्रेमाग्नी अन् त्या प्रेमात प्रेमचा अभाव.. त्यामुळे माझ्या चेहऱ्यावर उमटलेले भाव. तात्या म्हणाले ही एकदा, "मने, लक्ष नाही दिसत तुझे कुठे आजकाल?" अन् आई त्यांची री ओढत म्हणाली, "लक्ष नाही .. लक्षण ठीक नाही हिचे!"

मला वाटले कुठे यांना सगळे कळले की काय? प्रेम आणि चोरटेपणा एकाच नाण्याच्या दोन बाजू असाव्यात. कल्पना करा हां.. सारे काही उघड बोलण्याची व्यवस्था आहे.. तो.. त्यादिवशी आलाय घरी. मला तो आवडला! मी पुरी वाढता वाढता

त्याला म्हणतेय.. "अय्या! ऐका ना गडे.. माझे तुझ्यावर प्रथम दर्शनीच बसले प्रेम! तुझे कळेल का नाव माझ्या प्रेमा? अगदी ह्या श्रीखंडासारखा आहेस तू. तुझे नाव सांगितलंस तर बरे होईल नाहीतर मी फुगेन या पुरीसारखी."

आई नि तात्या समोर आहेत.. माझ्या स्पष्टवक्तेपणावर खूश आहेत!

आई म्हणते, "आमची मनी अशीच आहे.. मनात काही ठेवत नाही. आवडला तुला हा ना? घेऊन टाक!"

मग प्रेम म्हणाला असता, "वा! आवडली मला ही ह्या कोशिंबीरीसारखी! आम्ही लग्न करू. आम्हाला आशीर्वाद द्या!"

मग तसाच उठेल तो. खरकट्या हातानी.. मी देखील एका हातात पुरीचे ताट घेऊन.. दोघे वाकून नमस्कार करू! किती सोपे सारे. उगाच चोरटेपणामुळे किती मुश्किल करून ठेवलेय हे काम आपणच आपल्यासाठी! पण नाही. जालीम दुनियेची हीच रीत. 'जालीम' शब्द माझा नाही .. काकुचा! कुठल्या तरी काव्यमय बोलण्यात आलेला. थोडक्यात काय तर असे काही होणे नाही अन् विरहाग्नीत जळणे टळणे नाही!

९

# प्रेमाचा शोध

# अर्थात

# प्रेप्रीप्रीबंस!

आता पुढे काय करायचे यासाठी आमची 'प्रेमप्रीती प्रीतिबंध समिती' स्थापन झाली! ही मूळ कल्पना माझीच. मागे काकुच्या वेळेस 'कांंकुजोजुस' म्हणजे 'कालिंदीकुंद जोडी जुळणी समिती' स्थापन केलेली मी. त्याची अध्यक्षा मीच होते! रीतसर बैठका घेऊन सारे घडवून आणलेले आम्ही. समिती तर स्थापन झाली परत. बातम्यांच्या भाषेत गठन झाली! बातम्यांची भाषा.. कारण मुकुंदा! तो'ज्वालाग्राही सर्वदा' चॅनेलमध्ये बातमीदार आहे. तर अशी बातम्यांची भाषा बोलतो तो. तो समितीचा अध्यक्ष आणि काकु कार्यवाह! ही समिती ही बाकी समित्यांसारखी! बैठका घेते नि निर्णय घेते..

मुकुंदाने सुरूवात केली, "आपल्या या 'प्रेप्रीप्रीबंस'च्या पहिल्या बैठकीत आपले स्वागत आहे. आज आपल्याकडे प्रीतीरंगाचा गहन प्रश्न उपस्थित झालेला आहे. प्रेम आणि प्रीती जुळणी करण्यास काय काय करावे याची उजळणी करण्यास आपण येथे जमलो आहोत. आपल्या सोबत आहेत कार्यवाह कालिंदी आणि प्रत्यक्ष प्रीती. तर कालिंदीताई.."

"क्काय? ताई तुझी मी?"

"न.. नाही .. कालिंदीबाई.. तुमचे काय मत आहे?"

"माझे मत स्पष्ट आहे.. मियाबीबी राजी तो क्या करेगा काजी? पण त्यात जर फक्त बीबी राजी तर काय करेल आजी? एखाद्यास मिया कसे बनवावे याचा आपल्यास अनुभव आहे. तेव्हा तो वापरून पुढे जावे!"

"याचा अर्थ काकु, या मिलिंदास आपली सिक्रेट्स सांगावी लागतील?"

"काय हरकत आहे? आता?"

"कालिंदीबाई, आपल्याला यापुढे पाहणे आहे. यानंतर काय.. जे झाले ते होऊन गेले. विसरून जावे.. आणि एक.."

"काय?"

"एखादा भूतकाळात गाढव निघाला नि फसला म्हणजे पुढचा फसेलच असे नाही!"

"काय म्हणालास?"

"अगं काही नाही.. आमच्या चॅनेल वर जाहिरात येते ना.. म्युच्युअल फंडातील past performance is not a guarantee in present .. तोच नियम बरे!"

"हुं.. घरी ये बघते! गर्दभ!"

"तर तो संदर्भ नंतर बघू. आजचा आपला विषय आहे.. प्रेम का बंधन. थोडक्यात त्या प्रेम नामक इसमास कसे बंधनात अडकवावे.."

"इसम? मिलिंदा.. तुला कुठल्या इसमाच्या मागे ही .. ही प्रीती पडेल असे वाटते?"

"आमच्या बातमीत असतात असेच शब्द! तर प्रेम नामक व्यक्तीस.. कसे बंधनात अडकवावे.. याच्या बद्दल विचार करण्याचा विचार आपल्या मनात आला त्याबद्दल विचार करण्यास आपण जमलो आहोत. तर प्रीती ताई, तुला ताई म्हणू शकतो.. तर तुझा हा प्रेम करतो काय? काय आहे योजना आखताना सारे ठाऊक असल्यास उत्तम!"

"प्रेम.. प्रेमानंद जगदाळे त्याचे नाव. आणि त्याने एक पुस्तक लिहिले आहे.. दुसरे लिहिण्याचे प्रा ॅमिस दिले आहे! त्याच्या संपादनात मी त्यास मदत करणार असे ठरले आहे!"

"मग घोडे अडले ते कुठे?"

"अडले? मुदलात घोडे कुठे तेच ठाऊक नाही हिला!" काकु म्हणाली नि मी रूमालाने डोळे पुसले. चॅनेलच्या चर्चेत अशाने चांगला टीआरपी मिळतो म्हणे! क्षणभर ही खरी चर्चा नाही हे मिलिंद विसरला  असावा कारण मी डोळे पुसल्याचे पाहून त्याच्या चेहऱ्यावर अतीव समाधान दिसू लागले! लगेच सावरत म्हणाला, "याचा अर्थ तो लेखक आहे.."

"होय. विनोदी विद्रोही!"

"हा कुठला नवीन जा ॅनर? ते असो. तर त्याचा पत्ता लागत नाही. गुगलवर सापडावा इतका तो फेमस नाही. बरे फेसबुक अकाउंट त्याचा?"

"माहिती नाही!"

"एवढी तरी प्राथमिक माहिती हवीच. कालिंदी लवकर सर्च मार.."

कालिंदी तिच्या फेसबुकात फेस घालून बसली. नि मी माझ्या तोंडाला फेस आणणाऱ्या प्रेमबद्दल विचार करत बसली. म्हटले हा विद्रोही.. हा असल्या भानगडीत कसला पडतोय! आणि ते खरेच होते. मागे वाचलेला शब्द आठवला, त्याला हे सारे बूर्ज्वा वाटत असणार! विद्रोहीच तो!

मिलिंदाची ट्यूब पेटल्यासारखा तो एकाएकी ओरडला, "सापडला!"

"माझा प्रेम?"

मी ज्या सुरात विचारले ते ऐकून मिलिंदाला हसू आलेले त्याने कष्टाने दाबून धरलेले मला स्पष्ट दिसले. प्रेमिकांवर ही दुनिया अशीच हसते.. उगाच नाही सिनेमात तिला बेरहम दुनिया म्हणत!

"अगं त्याला शोधण्याचा मार्ग सापडला! ऐक कालिंदी तू देखील .."

"बोल."

"तू आणि ही प्रीती दोघे माझ्या ज्वालाग्राही चॅनेलचे जर्नलिस्ट."

"आम्ही?"

"यस्स! मी तुम्हाला खोटे आयडी देतो. तुम्ही जाऊन त्या पुस्तकवाल्याला भेटा!"

"कोण? प्रेम? तो कुठेय माहिती असते तर..?"

"इतके मलाही ठाऊक आहे. त्या प्रकाशकाला भेटा!"

"आणि?"

"नीट ऐका. तुम्ही टीव्ही पत्रकार म्हटले की तुमचा भाव आपोआप वधारेल.."

"ॲहा रे! जसा काही तुझा वाढतो भाव.."

कालिंदीला गप्प बसवले नसावे! पण सराईतपणे दुर्लक्ष करीत मिलिंद बोलत राहिला ..

"प्रकाशकाला सांगा, त्या पुस्तकाबद्दल चर्चा करायची आहे.."

"मग?"

"त्याला लेखकाशी बोलायचे म्हणून सांगा!"

"मग?"

"मग काय? त्याला लेखकाला बोलवावेच लागेल .. तो स्वतःहून बोलावून घेईल.."

"मग?"

"किती वेळा मग? आता मूग गिळा.. लेखक महाशय आले की पुढे काय करायचे ते.."

"अरे पण तो हिला भेटलाय.. त्याला ठाऊकै ही पत्रकार नाही ते.."

"नाहीतर आम्ही त्याचा पत्ता घेतो.. आणि जातो.."

"तुम्हाला तो देईल असे वाटते? टीव्हीवर यायला लोक काय काय नाही करत? एकवेळ त्या प्रेमला नाही बोलवणार तो पण फक्त त्याला टीव्हीवर येऊ द्यायला तो मदत करेल? इंपॉसिबल! मला विचार!"

"ओके. म्हणजे त्या प्रकाशकाचा पत्ता मिळवावा लागेल .."

"हं.. त्यात काय! जस्ट गुगल इट! आणि जा त्याच्याकडे."

"ह्या प्रीतीचे काय?"

"ती तर मुख्य आहे की नाही.. एक मिनिट .. प्रीती कॅमेरा मन.. सॉरी कॅमेरावुमन.. ती फिल्म बनवेल.."

"मी नाही.. मी बोलणार .. त्याच्याशी!"

"तू उतावळी नवरी बनून बाशिंग बांधू नकोस डायरेक्ट डोक्याला उगाच. एकदा सावज टप्प्यात आले की शिकारी तूच! आणि तुझे नाव या ऑपरेशन प्रेम मध्ये असेल सुलताना! बुरखा घालून जाशील तू!"

"मी?"

"नाही गं.. मी!"

"तू त्याची खरी फिल्म बनवलीस की किती उपयोगी पडेल बघ. विरहगीत गाताना हाती तसबीर असली की त्यात दर्द भरतो!"

फिल्म! ही गोष्ट उपयोगी खरीच! आणि एकदा तो भेटला की पुढे काय करायचे ते पाहता येईल. घोड्यावर बसायला मुदलात तो घोडा हवा ना समोर!

मी म्हणाली, "कधी जायचेय?"

"लगेच .. तू बुरखा आणलास की लगेच!"

"शुभ कार्य में देर किसलिए! वो कहते है बेकरार है दिल.. हम कहते थे कौन भरेगा बिल!"

"कालिंदी.. काय पण तुझे. तुझे काव्य ऐकून बिलातून.. आय मीन बिळातून उंदीर येईल बाहेर!"

१०

# भिंगारदिवे!

# अर्थात

# प्रेमानंदाचा अर्धा शोध!

प्रकाशक भिंगारदिवे. साहित्य दिवे प्रकाशन! यांनी कसले लावलेले दिसतात दिवे? आम्ही त्या अंधाऱ्या ऑफिसात पोहोचलो तेव्हा भिंगारदिवे बिझी होते म्हणे. म्हणजे बाहेर फक्त सांगितले आम्ही, "भिंगारदिवे साहेबांना भेटायचेय!"

त्यावर उत्तर, "साहेब बिझी आहेत मिटींगीत. थांबावे लागेल."

"आम्ही ज्वालाग्राही सर्वदाच्या रिपोर्टर.. मी मिस कालिंदी कुरतडकर आणि ही कॅमेरावुमन सुलताना पठाण. साइझवरून वाटत नसेल पठाण पण लग्नानंतर नाव बदलते त्यांच्यात पण.. होय की नाही गं."

"सच कहा आपने मोहतरमा. पर लगता नहीं हमारा नसीब अच्छा है.. लगता नहीं साब हमें इंटरव्ह्यू देंगे."

टीव्ही चॅनेल आणि इंटरव्ह्यू म्हटल्यावर तो बाहेरचा तीन ताड उडाला. मी कॅमेरावरून हात फिरवला तसा टुणकन् आत गेला आणि बाहेर आला तो बत्तीशी दाखवतच! म्हणाला, "साहेब बोलावताहेत!"

मिलिंदाचे निरीक्षण खरेच होते. टीव्हीचे कॅमेरावाले आले म्हटले की वजन पडतेच! कितीही प्रत्यक्षात आपण लाईटवेट असलो तरी.

आत भिंगारदिवे बसलेले. खुर्चीत गच्च भरून राहिल असा देह. तेवढेच भव्य टक्कलही. काकु पुढे होत म्हणाली, "नमस्कार सर. आम्ही ज्वालाग्राही सर्वदा चॅनेलच्या व्हिडीओ जर्नालिस्टस. मी कालिंदी कुरतडतकर आणि ही कॅमेरावुमन सुलताना पठाण. आम्ही तुमची एका पुस्तकासंबंधात मुलाखत घेण्यासाठी आलोय."

मुलाखत, ती ही टीव्हीवरची. हे ऐकून कुठले पुस्तक वगैरे न विचारता भिंगारदिवा उठला. शर्टबिट सरळ केला. डोक्यावर होते तेवढे केस सरळ केल हाताने. माझ्या कॅमेरात त्याचे टक्कल नक्कीच चमकले असते! तो परत येऊन बसला. म्हणाला, "करा सुरू!"

काकु म्हणाली, "तुमचे ते नवे पुस्तक विद्रोही लेखक प्रेमानंद जगदाळे यांचे आहे ना ते.. त्याबद्दल."

"हो! हो! फार उत्तम!  जगदाळे उत्तम लिहितो."

"सर, तुमच्या बरोबर लेखकाची पण मुलाखत झाली असती तर.."

"हां.. एक लेखककी अपनी ओळखच क्या है? उसका लिखा प्रकाशमें लाता कौन है? वो प्रकाशकच की नै? म्हणूनच उस्को प्रकाशक म्हणते हैं! ये रेकॉर्ड मत करना हा. पण काय है प्रकाशक कोही हीरेकी ओळख होती है."

एकाएकी भिंगारदिवा आपल्या दिव्य हिंदीचे दिवे का लावायला लागला कुणास ठाऊक! नाही.. माझ्या म्हणजे सुलतानाच्या हातातल्या कॅमेरामुळे असणार. सुलतानाला मराठी कळते कुठे! आणि कॅमेरा सगळ्यात महत्त्वाचा!

"तर बोलवू शकाल तुम्ही त्यांना?"

"नाही.. कसे बोलावणार?"

"कसे म्हणजे?"

"कसे बोलवणार?"

"कसे काय? फोन करा त्यांना! बोलावून घ्या. आम्ही थांबतो तोवर. हो की नाही प्री.. सुलताना?"

"प्रि. सुलताना म्हणजे?"

"अहो, आम्ही तिला प्रिन्सेस सुलताना म्हणतो. राजकन्येसारखी सुंदर आहेना म्हणून.. बुरख्यात अंदाज नाही येणार कुणाला.. "

"कुछभी हां.. कालिंदी. हमें बहुत लाज वाट.. आती है. उतना लेखक भी आ जाते तो जरा इंटरव्ह्यू पुरा हो जाता.."

"अरे.. मै समजता हूं.. पण आए हो तर मेरा भाग तो रेकॉर्ड कर लो.."

"पर जगदाळेजी.."

"अरे वो कैसा आएगा? वो ठैरा बाहेरगावका आदमी. कधी इधर कधी उधर. उसका क्या एक ठिकाणा है क्या. जळगाव गया है वो."

माझा धीर सुटत चालला. हातापायांना घाम सुटला माझ्या. कॅमेरा हातातून सुटतो की काय असे झालेले. काकु म्हणाली तितक्यात, "चालेल सर.. तुम्ही तुमचा इंटरव्ह्यू द्या. फक्त त्या जगदाळेंचा पत्ता द्या. इकडचा नि तिकडचाही. आम्ही तिकडे जाऊन करू रेकॉर्ड! हो की नाही प्री.. सुलताना? जळगाव काय दूर थोडीच आहे?"

"हुं. करेंगे हम. बस पता मिल जाय!"

मग काय! इंटरव्ह्यू झाला. भिंगारदिवा खूश झाला. प्रेमानंद जगदाळे या उदयोन्मुख लेखकाबद्दल चार बरे शब्द बोलताना भिंगारदिव्याचे डोळे चमकले. बरा दिसतोय ॲक्टर.

इंटरव्ह्यू दाखवू तेव्हा नक्की कळवतो असले आश्वासन देऊन आम्ही निघालो.  भिंगारदिव्याकडून प्रेमचा नंबर नि दोन पत्ते मिळाले. माझ्याकडचा नंबर पाहिला मी पडताळून तर तो दुसराच कुठलातरी होता!  त्याने जाणूनबुजून दिला की काय चुकीचा नंबर? बघून घेईन मी ही. नावाची प्रीती आहे म्हटले बच्चमजी.

काही असो.. प्रेमके प्रेमकी ओर पुढचे चिमुकले कदम आणि काय!

तिकडून निघालो आणि घरी आलो कालिंदीच्या. मिलिंदा वाटच पाहात होता. सगळी कहाणी ऐकून म्हणाला, "म्हणजे अर्धा प्रेमानंद सापडला. आनंद आहे! आता ही पाहिल सारे!"

"अरे.. नाही. त्याने मला दिलेला नंबर चुकीचा होता. मुद्दाम दिला असणार तो. पण तो एक असेल तर मी शंभर आहे. सोडते का अशी!"

"म्हणजे आता मिशन प्रेमानंद जगदाळे? ॲट जळगाव?"

"आधी फोन कर नव्या नंबरावर.."

"मी?"

"मग काय मी?"

"नको. तूच आधी बोल. बघ उचलतोय का फोन."

मिलिंदाने लावला फोन. पण तो उचलेल तर शपथ! म्हणजे आता डायरेक्ट अटॅक करणे आले. इकडचा पत्ता कुठेतरी डोंगरीतला. तो विभाग जरा कठीण म्हणून मिलिंद स्वतः येणार.. उद्या! आज का नाही? मी अधीर होते पण असे गुडघ्याला बांधलेले बाशिंग पाहून परत थट्टा केली असती त्याने. आता वाट पाहाणे आलेच.

घरी आले तर टेबलावर 'ते' पुस्तक समोर पडलेले! तात्या बसलेले. त्या पुस्तकाकडे पाहून न पाहिल्यासारखे केले प्रथम. मग म्हणाली मी, "तात्या हे पुस्तक?"

"हो. जगदाळे आला होता आज."

"आज? जळगावला गेला होता ना?" शेवटचे मी अजाणता बोलून गेली.

"तुला गं काय खबर?"

"मला? मला कसे माहिती असणार? जळगावला तो मनीषाचा नवरा गेला होता.."

"पण तू म्हणाली जगदाळेबद्दल.."

"नाही मी गोंधळली थोडीशी. दुसऱ्या पुस्तकाबद्दल तात्या?"

"छे गं. असंच आलेला. म्हणजे पुस्तकासाठीच असेल."

माझ्याबद्दल विचारत होता का विचारावेसे वाटले मला. पण कसे विचारणार? म्हणून गप्प बसली.

"तो लिहून देणार होता त्याबद्दल काय झाले तात्या?"

विषय निघालेला तो हातचा सोडू नये म्हणून मी म्हणाली.

"ते नाही माहित पण अगं तुला गंमत माहितीय? कुठल्या तरी टीव्ही चॅनेलचे लोक आलेले त्याच्या प्रकाशकाकडे. जगदाळेच्या पुस्तकाबद्दल इंटरव्ह्यू घ्यायला."

"खरंच? मग त्याचा पण घेतला असेल ना?"

"छे गं. त्याला काय ठाऊकच नाही त्याबद्दल. मला त्या प्रकाशकाने सांगितले. म्हणाला जगदाळेचा नंबर दिलाय त्याने पण हा बेटा कुणाला दाद देणाऱ्यातला नाही! म्हणून तो

जळगावला गेल्याची थाप मारली.. म्हणून मी विचारले तुला.. तो जळगावला गेल्याची काय बातमीबितमी छापून आली की काय?"

"नाही हो. जळगावला तो मंगलाचा नवरा गेला..

मंगला.. हो.. आम्ही तिला मनीषाच म्हणतो. मंगला किती आऊटडेटेड वाटते ना? तिचाच नवरा.. तुम्ही नाही ओळखत त्याला. मग पुढे त्या पुस्तकाबद्दल काही बोलणे झाले?"

"नाही गं. तो ही एक कॉपी देऊन गेला. माझ्यासाठी. म्हणाला दुसऱ्या पुस्तकाबद्दल मात्र काही नाही."

मला संशय आला. हा ही माझ्यासारखाच तर नाही? मी त्याला शोधतेय नि तो मला? पण शक्य नाही ते. नाहीतर स्वतःहून फोन केला असता. आणि त्याने दिलेला नंबर पण चुकीचा! या प्रेमचे कोडे काही सुटेनासे दिसत होते. पण हा तात्यांकडे का आला परत? आला तर दुसऱ्या पुस्तकाबद्दल आळीमिळी गुपचिळी? परत हा इंटरव्ह्यूपासून दूर पळेल म्हणतात! मग टीव्ही चॅनेलवाले बनून जावे की न जावे?

परत एकदा प्रेमप्रीती प्रेमबंध समितीची मिटिंग भरली. मी सगळयांना हे लेटेस्ट अपडेट्स दिले. आमच्या समितीने काढलेले निष्कर्ष असे:

१. प्रेमानंद थोडा चक्रम असला पाहिजे. या निष्कर्षावर मी विरोधी मत नोंदवले. बिचाऱ्या प्रेमला त्याची बाजू न मांडताच चक्रम का ठरवावे?

२. तो सध्या नि नेहमीसाठीही इथेच असतो. जळगाव वगैरे सारे झूठ आहे

३. त्याला प्रत्यक्ष त्या तिथे पाहिल्याशिवाय त्याचा पत्ता खरा आहे हे मानू नये.

४. त्याच्या फोनचे गूढ त्याला भेटूनच सोडवावे लागेल

५. टीव्ही चॅनेलवाले बनून जाण्याचा फायदा असा की त्याने मुलाखत दिली तर त्याची अधिक माहिती काढता येईल. इथे काकुने त्याच्या बायकोबद्दल म्हणजे आधीच लग्न झाले आहे का याबद्दल माहिती काढता येईल हा फायदा सांगितला! दुष्ट आहे ती. मी विरोधी मत नोंदवले.

६. टीव्हीसाठी अरेंजमेंट मागच्या वेळेसारखीच राहिल. म्हणजे माझा बुरखा परत वापरावा लागेल मला. काकु येण्यास कांकू करीत होती. तिचे मत असे की पुढे प्रेमला ती नकली पत्रकार असल्याचे कळेल तेव्हा मुश्किल होईल. मी तिला तिच्या वेळी मी काय काय केले .. हे मिलिंदाला माहिती असूनही फरक न पडल्याचे सांगितले आणि वर 'हो की नाही मिलिंदा' अशी साक्ष ही काढली त्याची!

७. आता यावेळी तरी त्याचा परफेक्ट छडा लावणे. तो कुठे राहतो पासून सगळी कुंडली मांडणे.

अशा साऱ्या निर्णयानंतर आम्ही त्या डोंगरीच्या डोंगरावर गिर्यारोहण करायला निघालो. फरक इतकाच की मिलिंदा पण होता आमच्याबरोबर. तेही एक कामावर सुट्टी टाकून. 'दास डोंगरी राहतो' म्हणत मीही बुरख्यात निघाली. मागच्या वेळेमुळे बुरख्याची सवय झालेली मला. हातातल्या कॅमेराच्या धुडाची पण आणि मुख्य म्हणजे हिंदीची सुद्धा! त्याच्याशी काय बोलावे याचे आडाखे बांधत चाललेली मी. आजूबाजूस माझे ध्यान नव्हते. आता एकच लक्ष्य.. प्रेमानंद!

डोंगरीतल्या घरी पोहोचलो दिलेल्या पत्त्यावर विचारत विचारत. लोक म्हणाले, "नाम नहीं मालूम पर वो रूम उधर है.." तसे आम्ही गेलो उधर! तर भले मोठे टाळे. आजूबाजूला चौकशी केली तर गेल्या आठवड्यापासून घर बंदच होते ते! आणि तिथे आधी कुणी नवरा बायको राहात होते! माझी अवस्था अगदीच केविलवाणी झाली. पत्ता बरोबर असेल तर पंचाईत.. तर तो

चुकीचाच असायला हवा! नवरा बायको म्हणे! छे! अशक्य! आणि कालच तो भेटलाय तात्यांना. म्हणजे जळगाव प्रमाणे हाही पत्ता चुकीचाच. आणि कोण जाणे.. फोन नंबरही चुकीचाच असणार! थोडक्यात पत्ता चुकीचा असल्याचा मला तरी आनंदच झाला!

आम्ही परत आलो. आता पुढे काय? स्वामी म्हणतात तसे.. सकारात्मक विचार! मी बसून तेच करायला लागली. आजवरच्या सकारात्मक गोष्टी लिहून काढल्या.. मग नकारात्मकचा हिशेब मांडला. होऊन जाऊ दे जमाखर्च आणि काय!

सकारात्मक

१. इतक्या वर्षांनी लव्ह ॲट फर्स्ट साईट व्हावे असा कुणी दिसला. नाहीतर कॉलेजची इतकी वर्षे गेली.. भाकड!

२. तो आला.. त्याने पाहिले .. आणि जिंकले!

३. काहीच ठाऊक नसताना त्याचे नाव तरी शोधून काढले मी.

४. एकदा भेट झाली प्रत्यक्ष! नैन लडे न लडे.. म्हणजे लडे नैन पण एकतर्फी..

५. काहीच ठाऊक नसताना मी त्याच्या पुस्तकावर केली चर्चा

६. काही नाहीतर तात्यांकडूनच काढताच येईल माग त्याचा. माग? तो शिकारी काढतो ना म्हणे.. सावजाचा?

७. आणि माझा माझ्या स्वतःवर आहे विश्वास. फक्त येऊ तर दे समोर. जरा सामने तो आओ छलिए.. छलिए म्हणजे जो छळतो तो का?

नकारात्मक

१. त्याने दिलेला नंबर चुकीचा.

२. त्याचे मिळालेले पत्ते चुकीचे.

३. त्याने केला नाही फोन.

४. पुस्तकाच्या दुसऱ्या भागाचा नाही पत्ता.

५. तो आला.. त्याने जिंकले पण पाहिले मात्र नाही मला.

जमा ७ नि खर्च ५! हा हिशेब जमा खात्यातलाच. त्यात आजवर नफा झालाय. मी विचार करत बसली. डोके खाजवत म्हटले असते पण ना माझ्या डोक्यात उवा आहेत ना कोंडा. मग कशाला खाजवावे डोके? पुढे कायतरी व्हायला पाहिजे .. पण ते काय?

रात्री मिलिंदाचा फोन आला. म्हणाला, उद्या तो भिंगारदिवेला करेल फोन आणि विचारेल परत नंबर. नाहीतरी त्याची मुलाखत अडकलेलीच राहिल.. किंवा थेट त्याला प्रेमला तिकडेच बोलावून घ्यायला सांगतो!

मला आता जीवनाच्या सुरनळीच्या टोकाला थोडासा म्हणजे अंधुक प्रकाश दिसला!

११

## परत भिंगारदिवे!

## अर्थात

## ऑपरेशन प्रेम!

सकाळी मिलिंदा, काकु नि बुरख्यातली मी तिघेही गेलो, त्या साहित्य दिवे प्रकाशनातल्या भिंगारदिव्याला भेटायला. आज भिंगारदिवेचा उशीरा येण्याचा बेत होता. बाहेरचा तो माणूस म्हणाला तसा नि माझ्याकडे पाहून म्हणाला, "बोलवून घेऊ ना त्यांना. सांगतो चॅनेलचे लोक आलेत."

मिलिंदा म्हणाला, "ठीक. आम्ही थांबतो थोडा वेळ."

तो फोन करायला आत गेला. कालिंदी म्हणाली, "हमे है बेसब्रीसे इंतजार की आएंगो वो.. पण इधर भटके उधर भटके.. वो देते हैं खो!"

"आता खो खो हसते मी.."

"सुलताना.. तमीजसे बात करो! पठाणसाहिबा!"

मी चपापून गप्प झाली. न जाणो भिंगारदिवा उगवला अचानक तर.

तो आतला माणूस येताना दिसताच कालिंदी सूर बदलत बोलली, "सर सांगत हे होते मी, बरंका आपल्या चॅनेलवर उद्याच्या स्लाॅट मध्ये हा इंटरव्ह्यू टाकायचाच सर."

"हो पण मिस कालिंदी, आय वोंट ॲक्सेप्ट इनकम्पलीट वन. अर्धवट काम करून आले तुम्ही..

काय साहेब येताहेत ना?"

"होय साहेब. येताहेत. थोडे थांबा म्हणाले सर."

"ओके.."

आम्ही बसून वाट पाहायला लागलो. तो माणूस समोर बसल्याने आमची बोलती बंद करून!

भिंगारदिवे आलाच आपकी तुंदिलतनू सावरत. करंजीत ठासून सारण भरल्यासारखा खुर्चीभर बसला. येतानाच तयारीत आलेला दिसत होता. होते नव्हते ते केस चापूनचोपून बसवून आलेला.

तो आत बसताच आम्ही शिरलोच आत.

"यस कम इन.. वा ॅन्ट मोअर बाईट्स?"

तिकडे दुर्लक्ष करत कालिंदी मिलिंदाकडे पाहात म्हणाली,

"सर, ही गेव्ह अस द इंटरव्ह्यू .. बट ऑल रॉंग ॲड्रेसेस सर. आणि नंबर सुद्धा चुकीचे."

"मि. भिंगारदिवे, तुम्ही चुकीचे नंबर नि पत्ते दिल्याने

ते रेकॉर्डिंग अर्धवट राहिले आहे. आय ॲम आन्सरेबल टू सीनियर्स. तुम्ही त्या लेखकाला इथे बोलवा.. नाहीतर तो इंटरव्ह्यू आम्हाला कॅन्सल करावा लागेल."

"अहो, तुम्हाला मी चुकीचे दिले पत्ते आणि नंबर .. पण खरे दिले असते तरी हेच झाले असते. जगदाळे माणूस चांगला आहे पण त्याला कुणी बोलवू शकत नाही.. आणि बोलायला ही लावू शकत नाही. तर त्याचा इंटरव्ह्यू ही दूरची बात."

"म्हणजे?"

"त्याच्या मागे लागलात तर तुम्ही माझाही इंटरव्ह्यू दाखवणार नाहीत.. आणि तो खरेच भेटला तर तुम्ही आहे तोही कट करून टाकाल. विद्रोही मटेरियल आहे जगदाळे. कुणाशी बोलेल? त्याला मनात येईल तरच तो येईल! नाहीतर नाही. याबाबत मी मदत करावी असे काही नाही."

"पण साहेब तुम्ही पत्ता तर द्या खरा. आम्ही करतो प्रयत्न. मला खात्री आहे या सलमाला तो नाही नाही म्हणणार.."

मी हळूच मिलिंदाला चिमटा काढला. तो सुलतानाला सलमा बनवून बसला! पण भिंगारदिवा स्वतःतच मग्न होता.. त्याला सलमा नि सुलतानातला फरक कळला नाहीच!

"साहेब, एक काम करू, तुम्ही त्याचा पत्ता द्या. बाकी आम्ही पाहतो. आणि उद्या दुपारी पहायला विसरू नका.. ज्वालाग्राही सर्वदा.. तीन वाजून तीन मिनिटांनी .." आणि त्यानंतर त्याने तोंडाने त्या प्रोग्राम आधीचे म्युझिक ही म्हटले!

भिंगारदिव्याला जास्त ऑप्शन न देता मिलिंदा बोलला आणि टीव्ही स्टार भिंगारदिवे संमोहित झाल्यासारखा पत्ता नि नंबर देऊन बसला. म्हणाला, "त्याला कळू देऊ नका.. मी दिलाय नंबर.

नाही हो! तुम्हाला कशाला मध्ये घालू आम्ही?"

मी चुकून मराठीत बोलून गेले. पण बुरख्याआडून बोलल्याने मी बोलल्याचे लक्षात आले नसावे. कालिंदीने हळूच पाठीमागून टोचले मला नि माझ्यातली सुलताना जागी झाली..

"बहुत शुक्रिया, आपकी बडी मेहरबानी सर."

आमचे एक काम झाले होते! थोडक्यात प्रेम प्रकरण जरा विक्षिप्त असणार की सणकी? पण मी भाळलेले त्याच्यावर. आता माघार घेणे नाही. आता मिशन जगदाळे! हा पत्ता खरा असावा.. फोन तो उचलण्याची शक्यता नाहीच.. तरी फिरवला. अपेक्षेप्रमाणे त्याने उचलला नाहीच.

पुढे जाण्याआधी मी आमच्या प्रेप्रीप्रेबंसची इमर्जन्सी मीटिंग बोलावली. जे ऐकले त्यातून ही टीव्हीची आयडिया काढून टाकावीसे वाटले मला त्यासाठी. हा प्रेमाचा किल्ला मलाच लढवावा लागणार होता असे दिसत होते.

आम्ही रस्त्यातल्याच एक हॉटेलात बसलो. इमर्जन्सी मीटिंग ना!

"घेणार?"

मिलिंदा कालिंदीला विचारतोय नि ती काळवेळ विसरून लाजतेय! लग्नाला एकच वर्ष झालेय. पण एक वर्ष तरी झालेय ना? अजून लाजतेय ती!

"चहा की कॉफी विचारतोय तो.."

मी बुरखा काढत धर्मांतर करत म्हणाली, "तुला काय वाटले?"

मिलिंदाने मीटिंगची सूत्रे हाती घेतली.. म्हणाला, "वेटर, तीन मसाला डोसा.. कडक भाजना जरा! मग आमच्याकडे वळत म्हणाला, अगं डोशाला वेळ लागतो यायला. आपल्याला मीटिंग संपवायची तर थोडा वेळखाऊ पदार्थच हवा!"

"म्हणून तुम्ही त्या उडप्याकडे डोसे खायचात? मी पाहिलेय.."

"हुं.. लवकरच तू ही खाशील.. डोसे मोहब्बतके! त्यात मसाला प्यार का! आणि प्रीतीसांबार!"

"आणि चटणी प्रेम की! बाकी होवो न होवो हे शेवटचे रिॲलिस्टिक एकदम! अनुभवाचे बोल!"

कालिंदीने लटक्या रागात त्याच्याकडे पाहिले. मी होते म्हणून नाहीतर अजूनही काही केले असते तिने.

डोसा येईतोवर मिलिंदाने मीटिंग सुरू केलीही.

"तर आता पुढे काय?"

"पुढे हेच. सुलताना बेगम कॅमेरा घेऊन.. इंटरव्ह्यू विथ जगदाळे! होप त्याच्या घरास नाही टाळे!"

"कहने को तो ढूंढते हैं हम उनको तनहाईमें.. नहीं मिले लेकिन वो अबतक .. हम भी है घाईमें!"

"अग तसे नाही काही. भिंदि काय म्हणाला?"

"बिंदी? कोण?"

"बि नव्हे.. भि.. भिंदि बोले तो भिंगारदिवे! तर भिंदी म्हणाला, प्रेम इंटरव्ह्यू देणार नाही बहुधा." "आपल्याला तो नकोच आहे.."

"कोण? प्रेम?" काकु!

मी रागाने तिच्याकडे पाहात जोरात म्हणाली, "इंटरव्ह्यू. कदाचित टीव्हीवाले आलेत पाहून आपल्याला तो हाकलून देईल. त्याऐवजी मीच जाऊन पाहते त्या पत्त्यावर. पुढे काय करायचे ते तिथे काय होते यावर अवलंबून."

"म्हणजे.. वुई आर बोन्स इन कबाब?" मिलिंदा म्हणाला.

"आम्ही नको आता.. कामापुरती मामी?" कालिंदी!

"नाही, पण ती म्हणते ते ठीकच आहे. दिव्य दिवे म्हणतो तसा असेल जगदाळे तर.."

"आपल्या प्लॅनला लागेल टाळे! प्री.. तू जा.. तूच जा!"

"किंवा तू जाच!"

"तर डोसा येण्याच्या आत मीटिंग संपली देखील. तू जा. बाकी डिटेल्स एडिट केले तरी चालतील पण तुझ्या भेटीचा वृत्तांत पाठव आम्हाला."

वेटरनी आणलेल्या तीन डोशांकडे पाहात तो म्हणाला.. आम्ही डोसे खाताना फक्त त्या चमच्यांचा नि तोंडाचा आवाज येत राहिला. डोसे संपवून बिल घेऊन वेटर आला आणि तितक्यात त्याच हॉटेलात तात्या आणि भिंगारदिवे प्रवेशले! मी हळूच कालिंदीला इशारा केला. तात्यांना ती ओळखतेच. एकाएकी आमचा आवाज बंद झाला.

दोघे बसले एका ठिकाणी. आमच्यापासून लांब होते. आम्हाला दिसत होते, पण त्यांनी मुद्दाम पाहिले नाही तर दिसलो नसतो आम्ही. आता डोसा नाही समोर. बिल हातात आलेले. कामाशिवाय उडप्या बसू देईल? बाहेर पडणार कसे? माझा बुरखा काढलेला मी. पण गळ्यात आयकार्ड लटकत होते. ते काढून पर्समध्ये टाकले. कॅमेरा मिलिंदाकडे दिला.

"स्पेअर बुरखे आहेत का तुझ्याकडे?" काकु म्हणाली.

"बुरखा आणि स्पेअर?" मी.

इतक्यात मिलिंदाच्या डोक्यात झटकन विचार आला असावा.. म्हणाला,

"थांबा. अजून एकेक डोसा खाऊ.. ते जाईपर्यंत बाहेर जाणे धोक्याचे आहे."

"मी? मला अजून एक डोसा नाही जाणार.."

"मला पण!" कालिंदी म्हणाली.

"ठीक. एक डोसा.. तुम्ही हळूहळू चहा प्या!"

"पण मी चहा नाही पीत.. आणि कॉफीपण!"

"तुला प्रेम हवा ना?" लहान मुलीला विचारावे तशी काकु म्हणाली. मीही लहान मुलीसारखी मान हलवली.

"मग चहा प्यावाच लागेल.. वेळ घालवायला." काकु म्हणाली.

वेटरला बिल परत देत मिलिंद म्हणाला, "हमने हमारे पेटमें वापस चेक किया. अजून भूक बाकी है. एक डोसा और लाव. वैसा ही कडक भाजके!"

वेटर निघून गेला.

"अरे आमचा चहा? उशीर होईल नंतर.."

"आपल्याला तोच करायचाय.. बसा."

वेटर डोसा आणेपर्यंत आम्ही खाली मुंडी घालून बसलो. तात्या नि भिंदि दूरवर होते त्यामुळे काय बोलतात ते कळत नव्हते. पण त्याचा फायदा इतकाच की आमचा आवाजही जात नव्हता त्यांच्या पर्यंत. तरीही ते प्रेमबद्दल काही बोलत असतील तर? पण त्यांच्या जवळ जाण्याची रिस्क घेणेच रिस्की होते! आमचे भांडे फुटले तर? तात्या कालिंदीला ओळखतात .. मिलिंदाला ही. दोघांना वेटरने पटापट ऑर्डर द्यावी आणि आम्हाला हळूहळू अशी प्रार्थना करण्याहून वेगळे मी काय करणार होती? पण नेमके उलट झाले. त्यांचे टेबल रिकामे नि आमच्या

टेबलावर मसाला डोसा येऊन बसला लगेच! हळूहळू खाण्याशिवाय पर्याय नव्हताच मिलिंदाला. 'आॅपरेशन प्रेम' ऐवजी आमचा अॅजेंडा आता 'ऑपरेशन हॉटेलातून सुटका' झाला होता! आम्ही जणू त्या उडप्याकडे स्थानबद्ध झालेलो. थोड्यावेळात 'त्या' टेबलावरची ऑर्डर आली. मिलिंदाचा डोसा संपवून आम्ही चहा मागवला. माझ्या आयुष्यातला पहिला चहाचा घोट या उडप्याच्या हॉटेलात लिहिला असावा! चहा तसा बरा आहे. पण तात्या नि भिंदि उठले नाहीत तर कदाचित कॉफीपण प्यावी लागेल! एकदाचे तात्या नि भिंदि उठले. ते निघेतोवर कालिंदीला दोन कप चहा प्यावा लागला! प्रेम माणसाला काय काय करायला लावते नाही! हे खरे तर कालिंदीला लागू नाही होत आता, पण हे सारे माझ्या प्रेमखातर!

तात्या गेले निघून नि आम्ही निघालो. मी घरी जाऊन दुपारी निघेन.. ऑपरेशन प्रेमवर. कालिंदी नि मुकुंदा दोघे निघून गेले. काही अंतरावर आले तर पाठून तात्यांची हाक! नशीब कॅमेरा नव्हता हाती! इथून आमचे कॉलेज जवळच आहे. ती थाप पचून जाईल! मी क्षणार्धात विचार केला!

"काय गं मनी.. इथे कशी? कॉलेजात का?"

"अं.. हो. जरा रेफरन्स पाहिजे होता!"

रेफरन्स! हे काही खोटे नव्हतेच! फक्त रेफरन्स प्रेम नि प्रेमाचा होता एवढेच!

तेवढयात तात्या म्हणाले, "सकाळी लवकर निघालीस.. न खाता. भूक लागली असेल. चल डोसा खातेस?"

मला भरल्यापोटी परत डोसा खाण्याची कल्पनाच करवेना. घाईघाईत म्हणाली, "नाही. घरी जाऊन जेवते. उगाच बाहेर कशाला खायचे. आणि तुम्ही इथे?"

"अगं ते प्रकाशक आहेत ना भिंगारदिवे त्यांना भेटायला आलेलो."

"भिंगारदिवे म्हणजे .. ते पुस्तक आपल्याकडे आहे त्याचे प्रकाशक ना?"

"हो. चल निघतो. तू घरी जा. लगेच जा. मी येतोच चार वाजेपर्यंत."

"लवकर तात्या?"

"हो. कुणी येणार आहेत. तू थांब हा घरी."

"मी? मला जायचेय बाहेर."

"हे काय.. हे बाहेरच तर आहे. अजून किती जाशील बाहेर. जा."

"पण माझे काम?"

"अगं त्याहून महत्त्वाचे काम आहे.. तू जा मी आलोच.."

"पण ते भिंगारदिवे.. काय म्हणाले?"

"काय नाही.. मी निघतो. लवकर येतो. तू तयार रहा."

भिंगारदिव्याच्या निमित्ताने काही माहिती मिळते का पहायचा माझा प्लॅन फोल ठरवत तात्या निघून गेले. आणि मी घराकडे निघावेच लागले. जाता जाता वाटले, इथूनच सरळ त्या पत्त्यावर जावे. घरून परत निघता येईल की नाही कुणास ठाऊक. पण नेमका बुरख्याच्या आतला ड्रेस माझ्या लकी रंगाचा नव्हता! पाहिलंत एवढा फरक पडतो लकी रंग नसल्याने. तो असता तर हा सारा गोंधळ झालाच नसता. काही होवो.. तो लकी ड्रेस घालूनच जाणार मी. स्वामींनी स्पष्ट सांगितलेय.. कुठल्याही महत्त्वाच्या कामासाठी मरून रंगाचाच ड्रेस घाल मुली. आणि ही मुलगी नेमकी आज ते विसरली. होणार नाही तर काय हा असला गोंधळ?

१२

# जगदाळे..

# अर्थात

# कांदेपोहे!

घरी आली तर आई वाटच बघितल्यासारखी उभी होती. म्हणाली, "बरं झाले बाई तू आलीस. तुझीच वाट पाहात होते."

"जेवायला?"

"नाही. तुझ्या तात्यांचा फोन होता. कुणीतरी येणार आहेत पाहुणे."

"हुं.. परत कुणी लेखक असेल. खाईल श्रीखंड पुरी आणि होईल बेपत्ता!"

मी प्रेमवरचा राग असा काढेन असे मलाही वाटले नव्हते! पण तो आपोआप निघाला!

"पण आई येणार आहे कोण?"

"अगं कुणी आहेत पाव्हणे. तुला बघायला येणार आहेत."

"मला? आणि बघायला? मी काय शोकेसमधली बाहुली आहे?"

"अगं, तुझ्या वयातल्या पोरी लग्न होऊन सासरी गेल्या आणि तुझा कशाचाच पत्ता नाही!"

आहे! पत्ता आहे! आणि माझ्याजवळ त्याचा पत्ताही आहे! हे सारे मनातल्या मनातच. मी बाहेर पडायची संधी शोधत होती आणि आईची बडबड सुरूच होती!

"तुझ्या वयातल्या पोरींना दोन दोन पोरं झाली आणि तू अजून मागेच!"

हे खरेय.. मी आहेच मागे.. माझ्या प्रेमच्या! माझा प्रेम? अजून कशाचा पत्ता नाही. नसो! पण सकारात्मक विचार! माझा आणि माझाच तो! अर्थातच मनातल्या मनाचे म्हणजे अंतर्मनातले विचार! आता बाहेर पडते. ते गाणेय ना.. आपके पहलू में आके रो दिए! पहलू म्हणजे काय? कोणास ठाऊक. पण तिकडे जाऊन रो दिए! नाही. मी नाही रडणार! आणि मला आता मरून ड्रेस घालायला हवा! मी आत जाणार तर आई म्हणाली, "साडीच नेस मने. पोहे भिजवून ठेव नंतर. कांदे चिरून ठेवू नाहीतर ऐनवेळी डोळयांत पाणी येईल."

"मी नाही कुणाला बघणार नि दाखवून घेणार!"

हे मी प्रकट म्हणायला नि आई पुढचे वाक्य बोलायला एकच गाठ पडली!..

"अगं जळगावहून यायचेत पाहुणे. मोठा मुलगा त्यांचा. कुणी जगदाळे आहेत!"

जगदाळे! मी रणांगणात सारी शस्त्रे खाली टाकून अर्जुनाने उभे रहावे तशी उभी राहिली. जळगाव.. जगदाळे.. भिंगारदिवे.. आणि आज त्यांच्याबरोबर तात्या! काही साखळी जरूर जोडली जात होती. म्हणजे हा जगदाळे तो जगदाळे तर नव्हे? नाहीतर एकाएकी त्या भिंगारदिव्यास जळगाव कुठून सुचले असते? असणार. असेल माझा हरी.. तर देईल खाटल्यावरी! अगदी होम डिलिव्हरीने येणार माझा प्रेम! असले योगायोग तर हिंदी सिनेमात पण नाही होत! मरून ड्रेसचे नुसते नाव काढताच नशीब फळले की काय माझे? असणार. स्वामींची कृपा आणि काय!

आता मी बाहेर जायचे विसरून मनापासून तयारीला लागली. कांदेपोहे बनवायचा पहिलाच प्रसंग हा! म्हणजे अशा कामासाठी. आधी कांदे चिरून ठेवू. आई म्हणते ते खोटे नाही काही. कां शेवटच्या क्षणी डोळयांत दाटून यावे पाणी? वा! अशा ओळी सुचतात.. कविता सुचायला लागलीय.. म्हणजे काही संकेत चांगलाच दिसतोय. मनही मन में लड्डू फुटे म्हणजे

काय ते मला आता समजत होते. पण जुन्या पुस्तकात असते तसे माझे दुसरे मन एकाएकी समोर येऊन म्हणायला लागले, 'प्रीती, थांब. एकतर हा तोच आहे हे तुला ठाऊक नाही. एकाच नावाचे दोन काय शंभर निघू शकतात! आणि तो आला की त्याने पसंत करावे असा नियम नाही. आणि अशा ठरवून लग्नात आपल्याला स्कोप कमीच. त्याने नाहीच म्हटले तर? पुढचा मार्गच बंद!' पण पहिले मन लगेच म्हणाले, 'पण अशा परिस्थितीत दुसरा रस्ता तरी आहे का तुला? त्यापेक्षा आहे त्याचा फायदा घे. कुणी सांगावे.. हा तोच असेल. दैवी संकेत वेगळे असतात नि तुझ्या सकारात्मक विचारांचे फळ मिळणारच एक दिवस तुला!'

अशा दोन मनांच्या द्वंद्वात अडकली मी. आणि समोर नुसता कांदा घेऊन बसली. आई ओरडली, लक्ष कुठेय तुझे, तेव्हा एकाएकी जागी झाली. दोन्ही मनांना त्यांच्या जागी परत पाठवून कामाला लागली. मन लावून चिरले कांदे अगदी जणू मोजून.. एक सेंटीमीटर बाय एक सेंटीमीटर नि मग गेली मी साडी नेसायला.. मरून रंगाची! जे जे होईल ते ते पहावे आणि काय! सकारात्मक स्वामी देतीलही फळ!

तात्या आले दुपारी आणि त्यांच्या बरोबर कोण यावे? तर भिंगारदिवे! बोलता बोलता कळले ते इतके की जगदाळे आजच्या दिवस आहेत इकडे. संध्याकाळी जाण्याआधी नजरेखालून घालावी मुलगी म्हणून येणारेत. सारे घडवून आणलेय ते भिंगारदिव्यांनी! म्हणून आज येणार नव्हते की उशीरा येणार होते की काय भिंदि ऑफिसात? जगदाळे येण्याची वाट पाहत बसले दोघे. बोलण्यात कुठे प्रेमचा विषय निघतो का.. असा विचार करे पर्यंतच भिंदिनी उद्याच्या टीव्हीवरच्या कार्यक्रमाचा विषय काढला आणि मी कान टवकारले! अधिक काही माहिती मिळते का ते ऐकायला! पण स्वत:बद्दल झाले तेवढेच सांगत होता भिंदि! त्यात प्रेमच्या मुलाखतीचा उल्लेखही नाही! फक्त त्या तुंबाऱ्याची गोष्ट बद्दल दोन शब्द! तात्याही म्हणाले, आमच्या प्रीतीने वाचलेय ते पुस्तक. आवडले तिला. पुढे काही बोलणार ते तोच जगदाळे आत शिरले!

जगदाळे बसले. आता साठीतला कोणी आणि ऐन तारूण्यातला कोणी सख्खा मुलगा.. कितपत साम्य त्यांच्यातले ध्यानी येणार? त्यामुळे माझ्या आठवणीतला काही आठवड्यांपूर्वी पाहिलेला प्रेम आणि हे जगदाळे यांच्यात कुठल्या कोनातून साम्य आहे का हे पाहण्याचा माझा प्रयत्न फसला. तिघांच्या गप्पा सुरू झाल्या. माझे नसलेले गुण वर्णन करून झाले.. तात्या म्हणाले, "ही प्रीती आमची. एकुलती एक. स्वयंपाकात नंबर वन. बीएला क्लास थोडक्यात चुकला. शिवण टिपणात तरबेज.. आणि गाते सुद्धा छान!"

आजवर बाथरूम सोडून कुठेच गायलेली नाही मी. आणि शिवण म्हणजे दोनचार टाके घालणे! आजचे पोहे पण केलेले आईनेच .. म्हणजे माझ्या सुगरणपणाचा अंदाज यावा! तरी हे असे सांगावे लागतेच! जगदाळेंचा मुलगा मुंबईत असतो. आता त्यांना एकूण मुले किती आणि हा मुंबईतला लेखक प्रेम तो तोच की नाही .. याबाबतीत काहीच माहिती मिळायला तयार नाही! आणि जगदाळे म्हणे असेच आलेले.. म्हणजे तयारीने नाहीत.. त्यामुळे मुलाचा ना फोटो ना गुणवर्णन! फोटो ठीक, नसेल त्यांच्याकडे. पण मुलाचे सत्य नि काल्पनिक गुणही नसावेत ठाऊक? की मुलाचे मुलगा असणेच पुरेसे? तात्यांनी कसा इतक्या शॉर्ट नोटिसवर माझा बायोडेटा बनवला! बनवाबनवीसाठी बनावट बायोडेटाच बनवावा! नाहीतर सर्वगुणसंपन्न, गुणांची पुतळी नसेल तर कुठून खपणार मुली लग्नाच्या बाजारात?

सगळे बसलेले हातात पोह्यांच्या प्लेटी घेऊन आणि तितक्यात दरवाजावरची घंटी वाजली. तात्या झटकन् उठले दरवाजा उघडायला तर समोर उभी कालिंदी!

"प्रीती आहे का? माझी एक गोष्ट राहिलीय तिच्याकडे!"

तिचा आवाज ऐकून माझे काळजाचे ठोके चुकले. पटकन मी पुढे आली. दरवाजाबाहेर जात तिला हळूच म्हणाली, "तुला यायला हीच वेळ मिळाली की काय? पटकन जा.. मग फोन कर!"

ती आ वासून बघेतोवर मी आत येऊन दरवाजा बंद केला. अशा वेळी तोंडावर साळसूदपणाचे भाव आणायला बऱ्यापैकी ॲक्टिंग येत असायला हवी. पण त्या भिंदिने त्याच आपले तोंड उघडलेच!

"ती मुलगी? बरं का घोरपडे.. तीच आली होती आज रेकॉर्डिंगला. मला आवाज पक्का ओळखू येतो!"

"आमच्या मनीची मैत्रीण हो. कॉलेजची. का गं कशाला आली होती?"

"काही नाही उद्या तिला काहीतरी हवे ते सांगायला! नंतर बोलते मी!"

पोहे खाऊन जगदाळे गेले. नि भिंदि त्यांना सोडायला. तसे नाही म्हणायला भिंदिशी माझे थोडेसे झाले बोलणे. फक्त एकदाच भिंदि म्हणाला, "घोरपडे, तुमच्या मुलीचा आवाज कुठेतरी ऐकल्यासारखा वाटतो!"

मला वाटले तात्या म्हणतील, 'हो ना, रेडिओवर एकदा झाला होता गाण्याचा कार्यक्रम तिचा!' नशीब इतकेही कल्पनाशक्तीस नाही ताणले त्यांनी! पण बिन बुरख्यातल्या माझे बुरख्यातल्या माझ्याशी साम्य त्याला कसे लक्षात येणार होते?

थोडक्यात काय, मुलगी बघण्याचा पहिलावहिला कार्यक्रम पार पडला. सगळे निघून गेले तोवर संध्याकाळ झालेली. आता त्या प्रेमच्या मागावर आता जाण्यात अर्थ नव्हता. त्यापेक्षा जे झाले त्याच्यावर नीट विचार करावा! किंवा नुसतेच पडून राहावे! पण आई तसे करू देईल तर

ना. थोड्याच वेळात ती ओरडलीच, "मने, स्वयंपाकखोली आवरून घे. उद्या लग्न होऊन गेलीस तर सासू म्हणेल, माहेरी आईने काहीच शिकवले नाही की काय? उगाच माझा उद्धार!"

सासू! ही या लग्नाच्या पॅकेज डील मध्ये मिळतेच वाटते! मी लगोलग लागली कामाला. तसा विचार तर काम करतानाही करता येतोच हो की नाही? तर एकीकडे हात चालवत होती तर दुसरीकडे डोके.

आज काय घडले त्याचा हिशेब मांडायला हवा. झाले ते काय? सकाळी प्रेमचा पत्ता लागला. नि दुपारी कदाचित त्याच्या घरच्यांचा! इतक्यात परत ते दुसरे मन बाहेर येऊन उभे राहिले! 'प्रीती, चुकतेस तू. एखाद्या बापाचा पोरगा लेखक असेल तर तो ते मिरवणारच की लपवून ठेवणार? त्या जगदाळेच्या बोलण्यात त्याचा उल्लेख ही नाही! हा जगदाळे तो जगदाळे नाहीच. उगाच नसती आशा ठेवू नकोस' प्रीती! पहिले मन मात्र उसळून म्हणाले, 'नाही. स्वामी म्हणतात, फक्त सकारात्मक विचार! तर फक्त सकारात्मकच विचार!'

डोक्याने विचार करता करता मी काय करत होते हाताने.. माझेच मला कळत नव्हते. त्या पोह्यांच्या प्लेटी मी बाथरूममध्ये नेऊन ठेवल्या तर कांद्याची साले भांडी घासण्याच्या सिंकात. आई ओरडली, लक्ष कुठेय तुझे गं मनी? मनीच्या मनी काय सुरू होते ते मनी काय सांगणार होती आईला?

रात्री मी थकून पडली अंथरूणात. म्हटले आज फक्त प्रेमगाणीच आठवत पडते. प्रेम आणि गाणे! उद्या सकाळी ऑपरेशन प्रेमचा द्वितीय अध्याय! दिवसा भेटेल तो की गेला असेल कुठे? सकारात्मक .. अर्थातच असेल! मग मी गाईन गाणे.. मैं तेरी तू मेरा.. दुनियासे क्या डरना! किंवा मग तो म्हणेल, तुम आ गए हो.. तो नूर आ गया है! मी लाजून तोंड झाकून घेतले तर तो म्हणेल,

घे झाकून मुख ते चंद्रमुखी! मी म्हणेन त्याला, उडे जब जब जुल्फे तेरी.. अय्या! किती खरेय हे गाणे! प्रेम आणि त्याची उडणारी जुल्फे! अशी कितीतरी गाणी मनात आठवत पडली.. मग डोळयात झोप दाटून आली तर म्हणाली त्याला, एक बात कहो गर मानो तुम.. सपनों मे न आना जानो तुम.. मग माझा डोळा कसा लागला तेच कळले नाही!

आणि खरे सांगू, त्या बदमाष प्रेमने माझे ऐकलेच नाही.. आणि आलाच स्वप्नात!

१३

# शोधू कुठे तुला?

# अर्थात

# पुनश्च शोध!

पहाटे पहाटे मला जाग आली.. तुझी रेशमाची मिठी सैल झाली.. मला जाग आली तेव्हा स्वप्नात हे गाणे सुरू होते! मी उठली तीच लाजत. आज आता लवकरच निघावयास हवे. प्रेमच्या शोधात आणि प्रेमाच्याही शोधात! लवकर घराबाहेर पडणे गरजेचे, नाहीतर नवीन काही काम काढले आईने तर अडकून पडेन मी. मी तयारीला लागली. पत्ता थोडा दूरचा होता. पण प्रेमासाठी कुणी सात समुद्रापार पण जाऊ शकतात तर हे अंतर तर काहीच नाही! परत आल्यावर म्हणण्याचे गाणे पण निवडून ठेवले मी.. 'इतना तो याद है मुझे की उनसे मुलाकात हुई..'

'सात समुंदर पार मैं तेरे पीछे पीछे आ गई..' गात मी निघाली. अर्थातच मरून ड्रेस घालून! लकी साडी कालची. आजचा लकी ड्रेस. आणि मरून पर्स, मरून सॅंडल्स! कुठला भाग लकी निघेल कुणास ठाऊक, म्हणून सारे काही मरून! घरातून निघाली मी. रस्त्यात कालिंदीला भेटायला गेली. काल काहीतरी काम असणार तिचे. आणि तिच्या तोंडावर दरवाजा लावला मी. रागावली असेल तर तिचा राग घालवायला हवा. मी तिच्या घरी पोचली तर मिलिंदा निघून गेलेला. काकु होती. मी पहिले 'सॉरी' बोलली तिला नि म्हणाली, "काल घरी कोण होते माहितीय? भिंदि!"

"क्काय?"

"अगं त्याने ऐकला तुझा आवाज! ओळखला पण. जंगली प्राण्यांना आवाजाची समज जास्त असते म्हणतात! इमॅजिन तू आली असतीस आत तर?"

"अगं पण व्हा◌ॅट वा◌ॅज भिंदि डुईंग देअर?"

"काय सांगू तुला रामकहाणी?"

"रामकहाणी सोड.. प्रेमकहाणी ऐकव!"

"तीच तर स्टोरी आहे. कदाचित काल आलेले जगदाळे .. आणि त्यांचा मुलगा.. तोच असू शकेल! म्हणून मी मन लावून खायला दिले कांदेपोहे!"

"हुं. आणि मन लावून हाकलवलेस मला."

"मग काय भिंदिसमोर बसवून पोहे खाऊ घालणार होती तुला? विचार कर.. तू घरात आलीस.. भिंदि समोर.. तुला प्रश्न विचारणार.. कसा काय झालाय इंटरव्ह्यू.."

"अगं, ते जाऊ देत. आज भिंदि तीन वाजता वैतागणार.. त्याचा इंटरव्ह्यू टीव्हीवर येण्याची स्वप्ने पाहात असणार.. बिचारा!"

"हुं. पण या गडबडीत मी आता चाललीय प्रेमला शोधायला. भेटला पाहिजे .."

"भेटेल. मग गा गाणे, दिसला गं बाई दिसला मला बघून गालात हसला!"

"तुझ्या तोंडात तूपसाखर.. श्रीखंडपुरी.. जिलबी मालपुआ.. नाहीतर आमरसपुरी पडो. नाहीतर अमिताभ म्हणतो तसे कॅडबरी चॉकलेट पडो.."

"अय्या.. किती गोड..!"

"कोण? अमिताभ?"

"होच.. तोही आणि ते ही!"

"ते कोण?"

"अगं चॉकलेट!"

तो दिसेल ना.. दिसला तर हसेल ना? या विचारात निघाली मी. मनात स्वामींचे सकारात्मक स्मरण करत. स्वामी अरपितानंदांना भक्ती अर्पण केली की फळ मिळाल्यावाचून राहात नाही म्हणतात. ते फळ आता मिळेलच. स्वामींची लीला अगाध आहे! त्यामुळे महाराष्ट्र राज्य ला ॅटरीसारखे ते फळ आज नाहीतर उद्या मिळेलच! रस्त्याने चाललेली मी. 'पाऊले चालती प्रेमाचीच वाट' म्हणत!

अर्धा रस्ता आली असेन मी नि समोर आला तो भिंदि! कुठूनही पाठ सोडत नाही हा! मी खाली मान घालून निघणार तर त्यानेच मारली हाक, "शुक शुक.. अहो मिस घोरपडे.."

माझ्रा दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न फसेल की काय? फसलाच तो. भिंदिकडे पाहात मी बोलली, "काका, तुम्ही इकडे?"

"मी जवळच राहतो इकडे. तुम्ही इकडे?"

"हो.. मैत्रिणीकडे आलेली."

"हां.. काल ती आलेली तुमची मैत्रीण .. ती कालिंदी .. टीव्हीत असते?"

"कोण कालिंदी?"

"अहो काल आलेली घरी ती? ती मंदाकिनी .. कालिंदीची जुळी बहीण .. तुम्हाला पण तीच वाटली ना? कालिंदीला नाही ओळखत मी. पण का?"

"नाही, माझा इंटरव्ह्यू घ्यायला आलेली ती. तिचा नंबर असेल तर हवा होता हो."

"नाही काका, ती कालिंदी नाही. मालिनी .."

"मालिनी? तुम्ही आताच मंदाकिनी म्हणालात

हां.. ते आम्ही ठेवलेय.. ती स्वतःला हेमामालिनी समजते ना.. म्हणून आम्ही तिला मालिनी म्हणतो .. आणि गंमत म्हणजे तिचे लग्न ठरलेय त्या मुलाचे नाव आहे धर्मेंद्र!"

"असेल. तिला विचारा ना कालिंदीचा नंबर .."

"मालिनीला? अहो दोघी एकमेकांचे तोंड पण नाही पाहात. जुळया आहेत पण भांडतात खूप. एक नंबर भांडकुदळ! काय आहे ना तो धर्मेंद्र आवडायचा कालिंदीला. पण त्याला कळलेच नाही दोहोंपैकी मालिनी कोण नि कालिंदी कोण. त्याने एकीला निवडले ती निघाली मालिनी! कालिंदीने बोलणेच टाकले त्यानंतर तिच्याशी! आता तिला कालिंदीचा नंबर विचारला तर ती भडकेल."

"असे का? पण त्या कालिंदीचा नंबर खरेच नाही तुमच्याकडे?"

"नाही हो काका. ती नकचढी.. टीव्हीवर काय कामाला लागली, स्वतः ला ग्रेट समजते!"

"हो ना. मला पण वाटली ती शिष्ट. आणि तिची ती मुसलमान सहकारी.. तुम्ही ओळखत असाल?"

"मी? कालिंदीलाच नाही ओळखत तर.."

"ते ही खरंच. का कोण जाणे.. तिचा नि तुमचा आवाज एकसारखा वाटतो!"

"काय आहे काका, एकासारख्या एक दिसणाऱ्या दोन जणी असू शकतात.. आवाजाचे काय?"

"हं.. हे ही खरेच!"

"मी निघू काका.. घाईत आहे."

"ठीक. कालचे ते जगदाळे आले होते ना त्यांच्याबद्दल.. जाऊ देत तुम्ही घाईत आहात. मी बोलतो घोरपड्यांशी!"

इतके सारे ऐकून घेतले त्या भिंदिचे.. आणि जे ऐकायचे ते न ऐकताच निघावे लागले मला. घाईत होती ना मी! नको तेव्हा ते मी घाईत आहे वाले वाक्य बोलली मी.

मी निघाली पुढे. प्रेम माणसाला असला खोटेपणा करायला लावते? चोरटेपणा ठीक. आता खोटेपणादेखील? तरी बरे प्रेमचा अजून पत्ता नाही!

पुढे काय काय होईल? कालिंदी म्हणते तसे, आगे आगे देखिए होता है क्या! बस स्टाॅपवर बसची वाट पाहात उभी होती मी. उशीर झालेला बऱ्यापैकी. सगळे त्या भिंदिमुळे! बस आली. इंग्रजीत नाॅट टू मिस द बस असे काहीतरी म्हणतात ना तशी बस नाही झाली मिस माझी!

त्या प्रेमच्या पत्त्यावर पोचले. माझ्या छातीत खरे सांगते, धडधडत होते. मी काय बोलणार नि मी आली ती कशासाठी .. काही ठरवून आली नव्हती मी. काय होईल ते होईल. तशी मी याबाबतीत स्मार्ट आहे. वेळ सावरून घेणे जमते मला चांगले. तिसऱ्या मजल्यावर.. 'त्या तिथे पलिकडे तिकडे माझिया प्रियेचे झोपडे..' म्हणत चढली मी! आणि मला दिसले ते त्या झोपड्याला लटकलेले मोठे टाळे! माझा अपेक्षाभंग झाला म्हणणार नाही मी कारण विशेष अपेक्षा नव्हतीच माझी. फक्त एक झाले, तो पत्ता त्याचाच एवढे तरी नक्की झाले शेजाऱ्या पाजाऱ्यां कडून! तो कधी भेटेल वगैरे कुणालाच पत्ता नव्हता तिथे.

परत माझी वरात परत निघाली. पुढचा ॲक्शन प्लॅन ठरवायला हवा! काकुला फोन केला तर म्हणाली, "ये घरी. विचार करूयात!"

विचार करायला माझी कधीच ना नसते! सगळ्यात सोपे ते विचार करणे! हो की नाही?

आज मीटिंग झाली परत प्रेप्रीप्रेबंस ची! मिलिंदा नसल्याने काकुनेच सुरूवात केली. मी तिला आजवरची कथा थोडक्यात सांगितली परत. एखाद्या डिटेक्टीवप्रमाणे तिने ती ऐकली. त्यातले काही डिटेल्स तिला ठाऊक नव्हते तर काही होते. माझी गोष्ट अर्धवट झाली असतानाच ती म्हणाली, "सापडला!"

"कोण?"

"कोण नाही .. काय विचार!"

"विचारते.. काय?"

"उपाय!"

"कशावर?"

"कशावर काय? उपाय असतो तो समस्येवर. क्या है इम समस्या का हल .. भेजा चलाओ तो समजेल आज नहीं तो कल!"

"सांग!"

"ऐक. आताच ऐकले मी. तुझ्या बाबांना मुलाखतीबद्दल ठाऊक आहे.."

"आहे.."

"ते भिंदिला ओळखतात?"

"चांगलेच!"

"त्यांना त्या पुस्तकाबद्दल हे आहे ते ठाऊक आहे?"

"आहे."

"ते तुझ्या प्रेमला ओळखतात?"

"ओळखतात."

"तर मुली, हे बघ.. त्यासाठी आपल्याला तुझ्या बाबांना सांगावे लागेल.. त्याला बोलावून घ्या. आपण जाऊ तिकडे कॅमेरा घेऊन!"

"पण मी बुरखा घालून येऊ?"

"नाही. मिलिंदा येईल. तू तशीच ये. स्वतःच्या बाबांकडे यायला काय प्राॅब्लेम?"

"काहीच नाही!"

"पण बाबांनी भिंदिला सांगितले तर?"

"हे खरेय. पण तू इकडे बुरखा घालून आलीस तर प्रेमशी प्रेमाने कोण बोलणार?"

"हे ही खरेच. एक चान्स तर घ्यायलाच हवा!"

"नाही गं.. मिलिंदाला मी सांगितलेय इतक्यात नको.. एकच तर वर्ष झालेय.."

"काकु.. मी कशाबद्दल बोलतेय .. तू कसला विचार करतेयस?"

काकु लाजली.. गोरीमोरी होऊन गप्प झाली आणि काहीच न झाल्यासारखे विषय बदलत म्हणाली,

"ठरले तर.. तू फक्त टाईम कळव. आम्ही येतोच. बघू पुढचे पुढे. आगे आगे देखिए होता है क्या!"

आता त्यासाठी तात्यांच्या ऑफिसात जाणे आले. शुभस्य शीघ्रम म्हणत मी निघाली. परत भिंदि न दिसो म्हणजे झाले! हे इंटरव्ह्यूच्या निमित्ताने त्याला बोलवायचे आधी सुचायला हवे होते. पण स्वामी म्हणतात ते खरे, 'प्रत्येक गोष्टीची वेळ यावी लागते!' समय से पहले कुछ नहीं होता. आणि 'जब होता है वोही समय होता है..' हे शेवटचे वाक्य .. माझ्या पदरचे.. नाही .. साडी नाही नेसली मी.. तर माझ्या ओढणीचे!

१४

# सापडला एकदाचा

# अर्थात

# दिवस मुलाखतीचा!

मी निघाली. तोच काकुची मागून हाक आली.

"प्री थांब!"

मी थबकली तशी म्हणाली, "मी पण येतेय काकांकडे. तू त्यांना काय सांगशील? मीच बोलते."

"ठीक. पण भिंदि आला तर तिकडे?"

"तो काय संताजी धनाजी आहे इतिहासातला की तो राक्षस आहे खायला? मी बोलते काकांशी. बघू मग. आणि काय तो भिंदि सर्व संचारी ईश्वर आहे की काय?"

"बरे चल."

"आलेच. तयार होऊन."

तात्यांच्या ऑफिसात आलो तर तात्या चकित झाले. त्यात कालिंदीला पाहून तर अजूनच!

"काय इकडे कुठे स्वारी?"

"स्वारी नाही, सॉरी तात्या.. हिचे काही काम होते. काल आलेली ना.. तिला म्हटले मी.. ऑफिसचे काम ऑफिसात. हो की नाही हो तात्या?"

त्यांचीच साक्ष काढत बोलली मी.

काकुने सुरू केले, "आमच्या चॅनेलला एका लेखकाची मुलाखत घ्यायचीय. त्याच्या पुस्तकासंदर्भात. त्यासाठी मदत हवीय.."

"बोल बेटा.. काय मदत हवीय?"

"ते तुंबाऱ्याची गोष्ट पुस्तकाचे लेखक .."

"प्रेमानंद जगदाळे. त्यांची मुलाखत हवीय."

"पण ते तर साहित्य दिवे प्रकाशनाचे पुस्तक .."

"हो ना काका. तिकडचे भिंगारदिवेसाहेब म्हणतात.."

"ते जाऊ देत. तर तुला त्या लेखकाची मुलाखत हवीय.. भिंगारदिवे म्हणाले मला, त्यांची मुलाखत घेतलीय कुणीतरी .."

"काका, चॅनेलवाल्यांनी सांगितलेय, लेखकाची मुलाखत तर हवीच. आणि हा लेखक सापडत नाहीये .. माझ्या नोकरीचा प्रश्न आहे.."

काकु काकुळतीला येत डोळयात न आलेले पाणी पुसत म्हणाली..

.. आणि तात्यांनी प्रेमानंद जगदाळेला डायरेक्ट फोन लावला ..

"तो उचलत नाहीये .." बेसावधपणे म्हणाली मी पण तात्यांच्या एका फोन कॉल मध्ये उचलला फोन त्याने आणि तात्यांच्या लक्षात आलेच नाही मी बोलली ते म्हणून बरे.

तात्या बोलत होते. तिकडून प्रेम काय बोलत होता याचा अंदाज येत होता .. आणि भिंदिने दिलेल्या अंदाजासारखाच होता तो..

"नमस्कार .. गाजतेय तुमची तुंबाऱ्याची गोष्ट .. नवीन लेखकाची .. चांगलीच असणार.. प्रमोशन पाहिजे.. टीव्हीवाले मुलाखत घेऊ इच्छितात.. अहो पण.. तुमचे ठीक आहे.. तरी पण.. लोकांना माहित झाले तर.. नाही मला काय वाटतेय.."

प्रेमचे आढेवेढे लक्षात येत होते फोनवर. म्हटले येथे काम माझेच. माझ्या बोलण्यावर नाही म्हणूच शकणार नाही तो..

तात्यांना खूण केली मी.. मी बोलते म्हणून आणि

"ही प्रीती बोलतेय तुमच्याशी" म्हणून तात्यांनी फोन माझ्या हाती दिला.

एक क्षण माझ्या काळजात धडधड झाली पण आता बावचळून कसे चालेल? आणि वर मला माझ्याच अशा प्रसंगात अगदी बिनधास्त बोलण्याचा अभिमान! तो व्यर्थ ठरवून कसा चालेल? क्षणात सावरली मी आणि म्हणाली, "हॅलो, प्रीती बोलतेय!" माझ्या मंजूळ आवाजातच तो निम्मा गारद व्हायला पाहिजे!

पण पलिकडे तो त्याच आवाजात बोलतोय .. माझे मिशन एकच.. त्याला वेगळ्या पद्धतीने बोलावयास भाग पाडणे..

"अभिनंदन .. गाजतेय तुमचे पुस्तक!"

"त्याने काय होतेय हो? त्यातला आशय महत्त्वाचा!"

"अगदी बरोबर. म्हणूनच हे टीव्हीवाले.."

"तेवढे सोडून बोला! माझा या माध्यमांवर नाही विश्वास!"

"हे एक खरेय तुमचे. विश्वास टाकावा असे लोक फार दुर्मिळ झालेत नाही आजकाल? पण ते इंटरव्ह्यूचे एक राहू देत.. मी मनापासून सांगते, अशा पुस्तकाच्या लेखकाशी मी बोलली.. मला अभिमान वाटतो त्याबद्दल! का नाही वाटणार? जगाच्या विपरित नि प्रवाहाविरूद्ध पोहणारे तसे संख्येने कमीच असतात. बाकी सारे महाजनो येन गत: स पंथ: असे काय म्हणतात त्यातले. सॉरी हां.. विद्रोही लेखकास अशी गुळमुळीत गोग्गोड भाषा सोसायची नाही. पण आशय लक्षात घ्या हां. उद्या तुमच्या लेखणीच्या एकेक फटकाऱ्यातून उगवेल संघर्षाच्या तरवारीचे पाते. आणि

बदलेल ही निर्दयी दुनिया. फुंकून टाका तुम्ही असे लाखो हजारो टीव्हीचे उकिरडे. प्रस्थापित जगाला मारा लाथ आणि पुढे व्हा.." इथे मी 'तुम्ही नाथ' म्हणून यमक जुळवणार होते! समोर काकु नि तात्या आ वासून माझे बोलणे ऐकत होते!

माझ्या बोलण्याने पैलतीरावरचा प्रेम चेकाळला. विद्रोही निखाऱ्यावर फुंकर मारून त्याची ज्वाला भडकवलेली मी!

"खरेय तुम्ही म्हणता ते. मला समजून घेणाऱ्या फक्त तुम्हीच आहात हो. नाहीतर सारे म्हणतात, हा प्रेम म्हणजे खोपडी सटकलीय याची. खरेय. अरे या दुनियेतल्या अन्यायाने खोपडी सटकेल नाहीतर काय? पण मी म्हणतो बोलणाऱ्याची उपडी खोपडी आणि काय?"

मला ही संधी चांगली वाटली. तशी मी काही अभिनय वगैरे नाही करत पण इथे मी हसत सुटली. इतकी की पलिकडून प्रेम गोंधळला! मग हसतच मी म्हणाली, "तुम्हाला विनोदी विद्रोही म्हणतात ना ते खरेच आहे. कित्ती कित्ती विनोदी बोलता तुम्ही! माझ्या तर हसून हसून डोळयांत पाणी आले!"

खरेतर खोपडी नि उपडीत हसण्यासारखे काय होते? पण हसली मी.

प्रेम त्यामुळे अजून चेकाळला, "त्याचे काय आहे ना, माझी फिलॉसॉफी आहे.. अस्वलाला गुदगुल्या करूनच मारावे!"

"म्हणजे? मी अस्वल?"

"नाही हो.. तुम्हाला नाही अस्वल म्हणत मी.. ही जनरीत आहे ना.. ओबडधोबड ती!"

"अय्या! मला बघा हां एक कल्पना सुचलीय.. मला सांगा विद्रोह म्हणजे काय?"

"काय?"

"तुम्हीच सांगा.. प्रत्यक्ष विद्रोही लेखकाकडून ऐकणे म्हणजे कृष्णाच्या तोंडून गीता ऐकणे!"

"हुं.. तुम्ही बोलण्यात हार जाणाऱ्या नाहीत हां.. विद्रोह म्हणजे एल्गार.. विद्रोह म्हणजे लढाई, विद्रोह म्हणजे यःकश्चित दुनियेच्या छाताडावर पाय ठेऊन उभे राहणे.. विद्रोह म्हणजे लाथ मारून पाणी काढणे.. विद्रोह म्हणजे आपल्याला जे पटते त्याच्याही विरूद्ध उभे राहणे.. म्हणजे सर्वोच्च विद्रोह!"

"तुम्ही म्हणता ते पटतय मला! पण एकच सांगू.. तुम्ही जे शेवटचे सांगितलेत ना.. जे पटते मला. मला काय वाटते सांगू.. तुम्हाला टीव्ही वगैरे मिथ्या वाटतात ना.."

"अर्थातच.."

"तर त्याविरूद्ध विद्रोह कराच तुम्ही आणि याच टीव्हीवर. सर्वोच्च विद्रोह होईल तो!"

"असे म्हणता?"

"खरेच!"

"तुम्ही म्हणता तर विचार करायला हरकत नाही. समानधर्मी कुणी भेटले ना की बरे वाटते."

"वाटते ना? मग या की! नुसतेच फोनवर कशाला .. प्रत्यक्ष या. इथे आपण भेटूदेखील नि तुमची मुलाखतही होऊन जाईल.. कामात काम.. काय? कधी येताय?"

"येतोच लगेच" म्हणत त्याने फोन ठेवला.

कालिंदीने तात्यांच्या नकळत डोळा मारला मला. तात्यांनी चक्क टाळी दिली मला! एक गड तर सर झाला. आता पुढे बघू. मी म्हणाली ना, एकदा तो भेटलाना की पुढे मी सारे बघून घेईन!

प्रेम थोड्याच वेळात पोहोचला. किती दिवसांनी पाहात होती त्याला मी. माझ्या काळजाचा ठोका चुकल्यावाचून राहिला नाही. त्या ठोक्याला जागच्या जागी बसवत मी म्हणाली,

'ही कालिंदी! कालिंदी कुरतडकर. मी हिला काकु म्हणते. ही त्या टीव्ही चॅनेलवर असते. हिला घ्यायचाय तुमचा मुलाखत .. नाही तुमची इंटरव्ह्यू .. नाही तुमची मुलाखत!"

"नमस्ते. मी कालिंदी. सदासर्वदा चॅनेलवर आपले स्वागत आहे."

कालिंदी चक्क चॅनेलचे नाव चुकली! पण विद्रोहात मग्न प्रेमला कुठल्याच चॅनेल्सची नावे ठाऊक नसल्याने काहीच बिघडले नाही. इतक्यात तात्या म्हणाले, "तुम्ही संपवा तुमचे काम. झाले की बोलवा!"

वा! तात्या तर काहीच न करता गेले. कालिंदी आहे .. मी आहे आणि तो! कॅमेरा? तो आणायला आम्ही विसरलोच! मिलिंदा नसल्याने ही गडबड झालीय! तात्पुरता मोबाईलमध्ये रेकॉर्ड करता येईल .. मी इमर्जन्सी प्लॅन बनवला मनातल्या मनात. कालिंदीला बाहेर बोलावले.. म्हटले, "कॅमेरा कुठे? आपण मोबाईलमध्ये करू रेकॉर्ड. नावापुरता तरी करायलाच लागेल!"

हे बोलत असतानाच प्रेम उठून आमच्या मागे येऊन उभा राहिला, म्हणाला, "काय नावापुरता करताय?"

"काही नाही. चला इंटरव्ह्यू घेऊ!"

"नावापुरता?" तो हसत म्हणाला .. विनोदी विद्रोही ना तो!

कालिंदी बसली. मी मोबाईलचा कॅमेरा ऑन करून बसली. कालिंदीने सराईतपणे प्रश्न सुरू केले.. बाकीचे सांगत नाही पण महत्त्वाचे सांगते ..

कालिंदी : तुमची भूमिका नेहमीच आक्रमक राहिली आहे. तर तुमच्या घरी.. तुमच्या पत्नीस ही भूमिका पटते का?

मी टवकारले कान.

एक क्षण विचार करत प्रेम म्हणाला, "विद्रोही लेखकास असले काही पटत नाही नि परवडतही नाही .."

"म्हणजे?"

"समाजसंस्थेचे बेगडी नियम उधळून लावतो आम्ही. आमच्या प्रत्येक श्वासात असतो तो द्रोह.. आम्ही क्षणोक्षणी जगतो तो विद्रोह!"

"पण तुमच्या पत्नीला पटते ते सारे?"

"पत्नी? लग्नसंस्थेतील नियमांत मी स्वत:ला कुठेच बसवू शकत नाही. त्यामुळे न रहेगी पत्नी न बजेगी उसकी बीन!"

बापरे! इतकेच नाही, तर अजून काही काही विचारले तिने, पण ते पुस्तकाबद्दल.माझे लक्ष उडाले! एक चांगली गोष्ट म्हणजे याचे लग्न झालेले नाही .. आणि वाईट गोष्ट .. हा म्हणतो याचा लग्नसंस्थेवर विश्वास नाही! ज्या गोष्टीवर विश्वास नाही तीच करून पाहण्याचा विद्रोह करण्यास याला भाग पाडणे हे टीव्हीवरच्या मुलाखतीवर बोलावण्याइतके सोपे नाही! पण ते सिनेमात काहीतरी म्हणतात तसे, हमने भी कच्ची गोलियां नहीं खाई की खेली है! मी म्हटले, अब आएगा मजा. जितके कठीण काम तितके मोठे आव्हान.. आणि हा चॅलेंज मला!

मुलाखत संपली. कालिंदी म्हणाली, "मी जरा फोन करून सांगते चॅनेलवाल्यांना".. म्हणून समंजसपणे बाहेर गेली. मी आणि प्रेम उरलो केबिनमध्ये. मी पुढची स्ट्रॅटेजी ठरवण्याआधी महत्त्वाचे हेच की प्रेमशी भेट होत राहणे. त्याशिवाय त्याच्या वाकड्या शेपटास सरळ करणे शक्य नाही! तेव्हा आता फक्त पुढच्या भेटीची तजवीज करणे!

"तुमचा फोन नाही आला. ते दुसरे पुस्तक.. पहिले प्रकरण?"

"हो ना! राहिले."

"आणि मी फोन केलेला .."

"ओह.. माझा नंबर बदलला. काय आहे जग बदलण्याची गोष्ट करणाऱ्याने कमीतकमी फोन नंबर तरी बदलत राहायला हवा की नाही? आणि जळगावहून माझे आबा म्हणजे वडील आलेले. कालच गावी गेले. थोडा बिझी होतो मी!"

"पण तात्यांचा फोन तुम्ही झटक्यात उचललात?"

मी त्याच्या शेपटावर पाय देते की काय असे वाटून मी सावरून घेत बोलली, "त्यामुळे बरे झाले. आजची मुलाखत झाली!"

मी हिंदीतला मुलाकात शब्द वापरायला हवा होता पण मुलाखतच बोलली.

"हो. त्यांचा फोन न उचलून कसे चालेल. माझे पुढचे प्रकाशक आहेत ते!"

चला. याबाबतीत तरी विद्रोह नाही म्हणून निःश्वास टाकत बोलली मी, "तात्या त्यांच्या ऑफिसची कामे सांगतात मला. त्यांचे फोन मी करते ना.. कितीतरी. एकटे तात्या बिचारे किती काम करणार? तुमचा तो नंबर द्या ना.. जो तुम्ही उचलता.. आणि माझा नंबर सेव्ह करा.. केअर ऑफ रंगढंग प्रकाशन.. " आणि एकाएकी सूर बदलत म्हणाली मी, "कराल ना प्लीज?"

एखादा तरूण कितीही विद्रोही म्हणत असला स्वतःला तरी त्याच्यासमोरच्या तरूण मुलीच्या अशा आर्जवी बोलण्याला टाळू शकेल? अर्थातच नाही! त्याने आपला तो खास नंबर दिला. माझा नंबर पण नीट सेव्ह करून घेतला. एक मोठे काम झाले म्हणत मी खुश झाली. तात्यांना भेटून प्रेम निघून गेला.

आणि हळूच डोकावत कालिंदी आत आली.. आणि पाठोपाठ .. तात्या.. आणि भिंदि! कालिंदीच्या त्या मालिनी अवताराबद्दल सांगायचं मी विसरलीच होती तिला. आणि आता समोर कालिंदी आहे! आणि भिंदिसुद्धा! काय होणार आता? माझ्या छातीचे ठोके जोरात पडायला

लागले! तात्या समोर बसलेले. कालिंदी आपली बॅग उचलत म्हणाली, "मला निघायला हवे प्रीती. कामे खूप आहेत."

"ठीक मालिनी. निघ तू." मी म्हणाली.

कालिंदी इकडे तिकडे मालिनी कोण म्हणून बघायला लागली.

"प्रीती, अगं ती कालिंदी .." तात्या म्हणाले.

"बऱ्या भेटलात तुम्ही.. तुमचाच नंबर मागत होतो तर या म्हणतात त्या ओळखत नाही तुम्हाला .."

"अहो ओळखत नाही कसली.  घरी आली."

"तात्या ती मालिनी.. हिची जुळी बहीण!"

"जुळी? कधी झाली?"

"काय तात्या .. जुळी हिच्या बरोबरच नाही का जन्मणार? ही मालिनी. कालिंदीऐवजी हीच आली."

"का हो.. तुम्ही तर म्हणाल्यात त्या एकमेकींचे तोंडही पाहात नाहीत."

कालिंदी तशी हुशार आहे. 'त' वरून ताकभात कळेल अशी. ही माझीच काही तिकडमबाजी हे तिला लगेच कळले. सावरून म्हणाली,

"काय आहे काका, कालिंदी नि मी म्हणजे तुझं माझं जमेना नि तुझ्यावाचून करमेना.. पण बिचारी तापाने फणफणलीय. सख्खी बहीण माझी, भांडली तरी रक्त एकच ना? मी म्हणाले, मीच जाते तुझ्या ऐवजी, कुणाला कळणारही नाही!"

"पण धर्मेंद्रला तर कळत असेलच ना?"

"हेमा.. मालिनी आणि धर्मेंद्र! काका तुम्हाला बरे माहिती हिच्या होणाऱ्या नवऱ्याचे नाव?" काकुला हिंट मिळावी अशा बेताने बोलली मी.

"अहो, मला कसे माहिती असणार? तुम्हीच सांगितले ना सकाळी?"

भिंदि बोलून गेला नि काकुला आपोआप उलगडा झाला..

"काय आहे साहेब, कालिंदीला सारे लगेच पोचवायचे आहे.. मी निघते. आणि आज धर्मू पण येणार आहे घरी.."

"अहो पण माझा इंटरव्ह्यू ..?"

भिंदि बोलेतोवर ती निघालीच.. मी म्हटले, "नीट जपून जा. कालिंदीची काळजी घे. तापात आहे बिचारी."

काकु निघून गेली. भिंदि डोके खाजवीत बसला. तात्यांना त्याला जगदाळे न्यूज द्यायची असावी, कारण तात्याच म्हणाले, "मने, तूही निघ आता."

पडत्या फळाची आज्ञा घेऊन मी बाहेर पडली. जगदाळेंच्या बातमीपेक्षा भिंदिपासून वाचणे सध्या  गरजेचे होते. भिंदिचा एक किल्ला आज दुसऱ्यांदा लढवलेला मी. भिंदि जास्त स्मार्ट असता तर तिथेच पकडले असते मला. त्या धर्मेंद्राच्या गडबडीत तो काकुचा नंबर घ्यायला ही विसरला. आता भिंदिला टाळणे हेच एक पथ्य!

हळूहळू चालता चालता माझ्या डोक्याची चक्रे जलद चालायला लागली. थोडा गोंधळ झाला खरा पण दिवसाचा हिशेब मांडायचा तर..

जमा..

१ ते १०. प्रेमची भेट.

११. जगदाळे म्हणजे प्रेमचेच वडील असण्याची शक्यता वाढली. जळगाव .. वडील.. कालच गेले परत.. इथवर धागा जुळतोय!

१२. माझ्याकडे प्रेमचा नंबर आहे आता. डायरेक्ट उचलेलच तो.

नकारात्मक..

१. भिंदि.. छे त्याचे कशाला नकटे नाक खुपसवावे इथे. भिंदि कटाप! असे पण मी भिंदिला का घाबरतेय? त्याला मीच सुलताना हे ठाऊक नाहीए. कालिंदी नि तिचा तो इंटरव्ह्यू .. मिलिंदा मॅनेज करेलच. म्हणजे भिंदिला घाबरायचे कारण नाही. यापुढे काकु काय त्याच्या संपर्कात येत नाही!

म्हणजे आजचा दिवस नफ्याचा! पुढचा प्लॅन बनवायला लागेल! रात्री विचार करेन. सकारात्मक अगदी. स्वामीजींची कृपा!

१५

# मीठू मीठू

# अर्थात

# पहिला प्रेम संवाद

घरी आले तोवर मनातले हिशेब करून झालेले होते. सारे काही सकारात्मक. स्वामींच्या म्हणण्याप्रमाणे. या विद्रोहीचा कशात विश्वास नाही म्हणे. आणि ते सीनियर जगदाळे .. बहुधा त्याच्यासाठीच शोधत बसलेत मुलगी! हे असेच असावे. बापाला आपल्या मुलाची ज्वालाग्राही मते ठाऊक असणार. म्हणूनच त्यांनी त्यादिवशी मुलाबद्दल काहीच सांगितले नसणार! किंवा भिंदि आणि तात्यांना ठाऊक असेल का? कोणास ठाऊक! आई म्हणाली,

"तात्या भेटले? "

"हुं"

"काय म्हणाले?"

"तात्या? कशाबद्दल?"

"जगदाळेंबद्दल. ते स्थळ आलेले त्याबद्दल?"

"मला? मला काहीच नाही बोलले."

इतक्यात तात्याच आले घरी. उत्साहात होते. म्हटले काय झाले असावे? भिंदि.. जगदाळे .. चांगला मूड.. म्हणजे काही गुड न्यूज.. गुड खरेच गुड असेल ना?

म्हणजे हे जगदाळे तो जगदाळेच असेल ना? तात्या आले पण बोलले काही नाहीत. एकतर कालिंदीच्या जुळया बहिणीचा धक्का असावा.. कालिंदी माझी बालमैत्रीण. तिची जुळी बहीण एकाएकी अवतरावी नि तिचा धर्मेंद्र नावाचा नवराही निघावा.. हे सारे प्रकरण काही मिनिटांत संपवून कालिंदी गेली असली तरी तात्या त्याने बुचकळयात पडले असणारच. त्याबद्दल त्यांना काय सांगावे? की ते विसरून जातील सारे? कुणास ठाऊक. तात्या ना भिंदिबद्दल बोलले काही ना आजच्या सगळया प्रकाराबद्दल. त्यांची हीच पद्धत आहे. सारे काही शेवटच्या क्षणी सांगतात ते. त्यादिवशी जगदाळे आले ते.. ते ही अगदी काही तास आधी सांगितलेले. रात्रीचे जेवण झाले. तात्या आईशी बोलत बसलेले. मी प्रेमशी झालेल्या बोलण्याची उजळणी करत पडलेली. त्यांच्या बोलण्यात काही महत्त्वाचे ऐकू येते का याकडे एक कान ठेवून. काहीच सुगावा लागू नये असे बोलणे त्यांचे. किंवा नसेलही काही झालेले.

झोप लागली मला. स्वप्न पाहणे माझा जन्मसिद्ध अधिकार आहे. एरव्ही मी अशी स्वप्ने पहायची.. त्यातल्या राजकुमाराला चेहराच नसायचा. आता त्याजागी प्रेम यायला लागला. अबलख वारू सोडून तो हल्ली हातगाडीवर किंवा बैलगाडीत यायला लागला. विद्रोही तो! घोड्यावर कसला येतोय? स्वप्नात रंगले मी त्या निद्रेत. सकाळी जाग आली तेव्हा तात्या आईला सांगत होते.. "उद्या संध्याकाळी जगदाळे आणि त्यांचा मुलगा येताहेत. त्यांना पसंत आहे मुलगी."

"तुमचे आपले काहीतरीच. मुलानी नाही पाहिली मुलगी नि मनीने नाही पाहिला मुलगा.. पसंती बापाची घेऊन काय करायचेय?"

"तसं नाही ग. पण एक स्टेप तर क्लियर झाली. पुढचे पुढे. पण हे जमले तर छान. पुढच्या महिन्यात बार उडवून टाकू!"

"वा! अशी न बघता कुणाच्या गळयात बांधायला जड नाही झाली मुलगी मला. करतो तरी काय मुलगा ते कळू देत.."

"चांगली नोकरी आहे, शिवाय तू.."

आता हा प्रेम की आणि कुणी हे कळण्याचा क्षण आलाय.. प्रेम पण काहीतरी नोकरी करतो म्हणे.. तात्याच बोललेले आधी. तितक्यात तात्यांचा फोन वाजला.. परत एकदा सस्पेन्स! तात्या नि आईचे बोलणे राहिलेच मग बाजूला नि तात्याही निघून गेले बाहेर. राहू देत. घोडामैदान जवळच आहे!

मी विचार केला.. प्रेमच्या मनात शिरायचेय तर ते लिहिण्यातूनच. काहीतरी जुगाड जमवायला पाहिजे. काहीतरी म्हणजे काय? काहीच विचार न करता मी प्रेमचा नंबर फिरवला. काय नि कसे बोलावे.. शेवटच्या क्षणी ठरवेन. फोन वाजतोय कसला.. दोनदा ऐकू आले, 'इस रूटकी सभी लाईने व्यस्त हैं.. कृपया थोडी देर बाद डायल करें!'

आणि मग प्रेमनी चक्क तो फोन उचलला देखील! तेव्हा ठाऊक नव्हते पण ही त्याच्या मोबाईलची कॉलर ट्यून होती! हे माहित झाले मला तोवर प्रेम नि मी कितीतरी पुढे निघून आलो होतो.. आणि ही असली कॉलर ट्यून हे ऐकून मी इतकी हसली की पोट दुखायला लागले माझे! तर प्रेमने फोन उचलला नि म्हणाला, "आज सकाळसकाळी आठवण काढलीत?"

आता त्याला काय सांगू की चोवीस तास मी त्याचीच आठवण काढत असते.. पण ते न बोलता मी तात्यांच्या नावाने बोलणे सुरू केले..

"नमस्कार!"

कुणी आपल्या प्रियकराशी नमस्कार म्हणून बोलण्याचा प्रेमी जिवांच्या इतिहासात पहिलाच प्रसंग असावा हा! प्रेमी जीव! एकतर्फी का असेना. छान वाटते बोलायला.

"मी रंगढंग प्रकाशनातून प्रीती घोरपडे बोलतेय. प्रेमानंद ना?"

"बोला. काय काम काढलेत?"

त्याच्या त्या कोरड्या शब्दांनी माझा धीर सुटला असता. पण ही फक्त सुरूवात आहे. प्रेमाची दिल्ली अजून दूर आहे!

"काय आहे की तुमच्यासारख्या लेखकाचे दुसरे पुस्तक आंबेडकर जयंतीस यावे असे वाटते आम्हाला. म्हणजे काय की एक औचित्य म्हणून. बघा पटते का?"

माझ्या बोलण्याने तो थोडा गप्प झाला. विचारात पडला असावा. एकाएकी म्हणाला, "खरेय तुमचे.."

"प्लीज ऐका ना.."

मी रंगढंग प्रकाशनाचे ढंग सोडून आपल्याच रंगात बोलली, "प्लीज ऐकाना.. तुम्ही ते शरणकुमारला मानसपुत्र बनवणार ना ही कल्पना अगदीच नामी आहे." इथे मी ब्रॅंड शरणकुमार म्हणणार होती पण विद्रोहकुमारास हे किती पटेल कुणास ठाऊक! त्यापेक्षा तो शब्द टाकणेच बरे!

"तुम्हाला ही वाटते ना तसेच?"

"हो ना. अर्थातच. तुमच्या कल्पनेचे कौतुक करावे तितके थोडेच. कुठवर आलेय लिखाण?"

"नाही हो. वेळच नाही. बाबा आलेले जळगावहून. त्यांच्याकडे लक्ष देता देता लिखाण मागे पडले. पण लवकरच करतो सुरू. आणि तुम्हाला कळवतो."

"नक्की ना?"

"म्हणजे काय.. असला आग्रह केला तर एक काय दहा लिहीन पुस्तके .."

हे बोलून त्याने जीभ चावली असावी, कारण थोडा वेळ शांतता पसरली. मग म्हणाला तो, "आजच करतो सुरू. झाले की करतो फोन!"

"ठीक आहे.. बदलाची ज्योत पेटवायची असेल तर रात्रीच्या वेळी आपले दिवे जाळावे लागतात!"

"वा! तुम्ही वाचलंत वाटतं.."

"अर्थात. मी तुमच्याशी डिटेल चर्चा केली नव्हती का?"

"हो.. ना."

हे त्याच्या प्रस्तावनेतले पहिलेच वाक्य .. जे वाचून झोप लागलेली मला! तेवढेच तर लक्षात होते माझ्या.

मी करतो फोन तुम्हाला.. म्हणून त्याने फोन ठेऊन दिला. दिवसाची सुरूवात तर छानच झाली. काही म्हणा, मुलगा चांगला आहे. आणि मला वाटते मेरा जादू चल रहा है! माझा आग्रह.. आणि त्या खातर हा लिहिणार दहा पुस्तके! वा! प्रगती पथावर प्रीती! बढे चलो! पण तो खरेच करेल फोन? नाहीतर मीच करेन आठवण त्याला. काही असो त्याच्याशी संपर्क तर होतोय. आणि मला आत्मविश्वास आहे.. फक्त तो उद्याचा जगदाळे कोण आहे माहित झाले तर! म्हणजे हाच असेल तर बघायलाच नको. आणि नसेल तर?

हा विचार आताच करून ठेवायला हवा! तात्या तर पुढच्या महिन्यात बार उडवायला निघालेत. एकतर हा प्रेमच असू देत नाहीतर इतका खराब असू देत की कुणी त्याचा विचारच

करायला नको! तरीही त्यातल्यात्यात चांगला असेल तर? माझा प्रश्न नाही. मी पार्वतीसारखे मनोमन वरलेय प्रेमला. आता इकडेतिकडे पाहणे नाही.

मला स्वामींची आठवण आली. म्हणजे हा येणारा मुलगा प्रेम नसेल तर चांगला नसू देत.. हा नकारात्मक विचार माझ्यासाठी सकारात्मक आहे! काय गंमत आहे नाही? नकारात्मक म्हणजे सकारात्मक! तात्यांना नक्कीच माहिती असणार. त्यांचे प्रेमशी बोलणे असे की वाटत नाही तोच असेल हा जगदाळे मुलगा. पण त्याला एवढा आग्रह करून तात्यांनी घरी का जेवू घातले?

आजचा दिवस असाच गेला. कालपर्यंत कामे होती. प्रेमला शोधण्याची मोहीम होती डोक्यावर. त्यासाठी प्लॅन बनवणे होते. आज उद्या संध्याकाळची फक्त वाट पाहणे आले! ते पुस्तक तात्यांच्या कपाटात सापडले .. म्हणजे तेच तुंबाऱ्याची गोष्ट. घेऊन वाचत बसेन म्हटले. घेतलेही हातात .. ज्या प्रेमच्या लेखणीतून झरलेले हे शब्द त्यांच्यावर हात फिरवला नि स्वप्नात रंगून गेली.. आणि पुस्तक वाचणे राहिले बाजूला मागच्या वेळेप्रमाणे. डोळे उघडे ठेवून झोपली मी.. स्वप्न पाहात. माझा विद्रोही वीर बैलगाडी चालवत येतोय.. हातात त्याच्या एक पेन आहे.. इतके मोठे की आभाळात पोहोचलेय ते. खाली तो लिहितोय.. लिहिता लिहिताच येतोय.. बैलगाडीतून उतरतो नि सिनेमातल्यासारखा माझ्याकडे धावत येतोय!.. हातात त्याच्या पुस्तके पण आहेत .. आणि मी तर तयारच आहे.. पाठून गाणे ऐकू येतेय .. 'मैं तेरा तू मेरी.. दुनिया जले तो जले!' तो माझ्या केसांत गजऱ्याऐवजी पुस्तक बांधतोय.. मी दचकून जागी झाली तर आई जेवायला बोलवत होती. किती वेळ अशी झोपली मी कुणास ठाऊक. मी झटकन उठली. ते पुस्तक ठेवले गुपचूप नि गेली जेवायला.

तात्या आलेले. म्हणाले, "दमली असणार बिचारी. काल खूपच मेहनत केलीय तिने."

तात्या हे खरेच म्हणताहेत की उपरोधाने कुणास ठाऊक. मी अर्धवट झोपेत असल्याचे दाखवत काही बोलली नाही. आई नि तात्या बोलत होते पण त्यात तो जगदाळेचा विषय नव्हताच. मी निमूटपणे जेवून उठली. उगाच आईची बोलणी नकोत ऐकायला म्हणून ओटा वगैरे साफ केला नि सरळ झोपायला निघून गेली. मगाचचे स्वप्न अर्धवट राहिले .. त्याचा पार्ट टू पाहीन म्हटले. पण झाले भलतेच. म्हणजे झोपच अशी लागली की स्वप्न पण नाही पडले. उठली तेव्हा डायरेक्ट सकाळ झालेली.

१६

# प्रेम वि. पूर्णा

# अर्थात

# उज्ज्वल परवासाठी!

आजचा दिवस महत्त्वाचा! संध्याकाळी कळेल, तो तोच आहे की तो तो नव्हेच ते! असेल ते असो.. सकारात्मक की नकारात्मक विचार करण्याची प्रक्रिया सध्या बंद केलेली बरी! जे जे होईल ते ते पहावे आणि काय!

पण सकाळी काकुचा फोन आला. म्हणाली, "कुठून तरी भिंदिला नंबर मिळाला माझा.."

"मग?"

"मग काय.. बोलली मी त्या चॅनेलला दिलेय रेकॉर्डिंग.."

"संपला विषय मग!"

"नाही. विषय संपतोय कुठे इथे.. इथेच तर सुरू होतोय.."

"म्हणजे?"

"तो विचारत होता.. जुळ्या बहिणीचे खरे नाव काय?"

"मग तू काय सांगितलेस?"

"काहीच नाही.. तू मालिनी ठेवलेलेस.. खोट्या बहिणीचे.. ते खोटे की खरे.. की अजून काही खरे नाव त्या खोट्या बहिणीचे?"

"खोट्या बहिणीचे खरे नाव मंदाकिनी! लक्षात ठेव खरे नाव मंदाकिनी .. नि खोटे नाव मालिनी नि तिचा नवरा.. धर्मेंद्र! आणि तू आणि ती यांचा आहे छत्तीसचा आकडा!"

"आता सांगून काय उपयोग? पण ऐक.. अगं भिंदि त्या चॅनेलच्या बाॅसेसना ओळखतो.. आता त्याने तिकडे जाऊन गोंधळ घातला तर? मिलिंदा उगाच गोत्यात न येवो.."

"काही नाही .. तू बोललीस मिलिंदाला?"

"नाही अजून. आताच तर भिंदिचा फोन आला.."

"मला पण वाईट वाटतेय.. उगाच ह्या प्रकरणाचा मिलिंदाला त्रास नको व्हायला .."

"तू चिंता नको करूस.. मी बोलते मिलिंदाशी. अजून पुढे प्रगती काय?"

"काय प्रगती? मी संध्याकाळी कदाचित प्रेमला बघेन.. नि तो मला बघेल.."

"म्हणजे? बघून घ्याल एकमेकांना?"

"तसं नाही गं.. "

मग मी तिला ते सारे प्रकरण उलगडून सांगितले.

'ऑल द बेस्ट' म्हणत तिने फोन ठेवला.

आता पुढे या भिंदीचे काय होणार?

अस्वस्थ होऊन मी मिलिंदाला फोन लावला. तो बिझी होता. थोडक्यात त्याला सांगितले तर तो म्हणाला, "डोन्ट वरी. माझ्यावर सोडून दे!"

उगाच डोक्यात किडा सोडून दिलाय भिंदिनी. कुठल्याही गोष्टीत असा खलनायक असायलाच हवा का? पण पुढची गोष्ट आताच सांगते.. दोन तीन दिवसांनी मिलिंदानी फोन केला मला. म्हणाला, "ते भिंगारदिवे प्रकरण मिटले.."

"म्हणजे?"

"म्हणजे दोन गोष्टी.. एक तर ती मुलाखत आम्ही खरंच दाखवतो आहोत.. तुझा प्रेम आता टीव्हीवर येईल. तुमचे ते मोबाईल रेकॉर्डिंग चांगले झालेय.. मन लावून केलस वाटते प्रेमचे होते म्हणून!"

इथे मी आपोआप लाजली..

"आणि दुसरे, आमचा बाॅस मोठा दिलदार आहे. पारशी बावा. फिरोज मंचरजी. तो ओळखतो भिंगारदिवेला. त्याला खरी गोष्ट सांगितली.."

"खरी म्हणजे ..?"

"म्हणजे हेच.. तू आणि प्रेम.. दोघांचे प्रेम.. आणि प्रेमासाठी वाट्टेल ते! त्यावर बावा खूश झाला. चोक्कस डिक्रा म्हणून हसला. एका अटीवर सगळे माफ करीन म्हणाला.."

"अट?"

"हुं.. अगं बावाला ते पारसी डेरीचे पेढे आवडतात.. म्हणाला एकदा सारे ठीक झाले की एक किलो त्याला द्यायचे.. बावा पावला त्याला नैवेद्य म्हणून!"

"एवढेच?"

"मी म्हणालेलो तुला, डोन्ट वरी.. मला माहितीय माझा बाॅस!"

"हुं.. तुझ्या नि कालिंदीच्या वेळचा अनुभव दिसतोय!"

"खरंय.. तुझी कृपा आणि काय.."

थोडक्यात हे भिंदि प्रकरण खरेच संपले इथे आणि माझा प्रेम एकदा टीव्हीवरही आला! स्वतःच्याच पुस्तकावर बोलत होता. फक्त त्याचे ते लग्नाबद्दलचे ज्वालाग्राही विचार ज्वालाग्राही चॅनेलने कापून टाकलेले! नशीब माझे! हे सारे नंतर झाले. आई तात्यांनी ते ऐकले असते तर?

ही सारी पुढची गोष्ट! खरी गोष्ट आज व्हायची ती होणार. आर या पार..

संध्याकाळी तो क्षण आला. मागच्या वेळेच्या अनुभवातून सारे काही आधीच सज्ज करून ठेवलेले. अगदी पोह्यांवर पिळायला पातळ सालांचे लिंबूही शोधून आणलेले आईने. थोडक्यात, तयारी जय्यत होती! आणि मी मरून साडीच नेसली होती परत!

थोड्याच वेळात भिंदि आला. त्याला आमच्या घरचे पोहे फारच आवडतात की काय? मग जगदाळे आले. पाठोपाठ मुलगा. तात्यांनी तोंड भरून स्वागत केले. दोघे आत आले! हे सारे मी आतल्या खिडकीतून पाहात होती. मुलगा मला नीट दिसत नव्हता पण अंगकाठी नि उंची प्रेमइतकीच. तो काही बोलला.. त्याचा आवाजही प्रेमसारखाच. उत्सुकतेने माझ्या छातीत धडधडू लागले. कहीं ये वोच तो नहीं? बाहेर बोलणे चालू होते. माझी ती स्वतःत हरवून जायची सवय महागात पडणार मला. कितीतरी डिटेल्स सुटत होते. कळले ते एकच.. त्या मुलाला एक जुळा भाऊ आहे! बाकी त्याचे नावही मी ऐकू नये?

पोहे घेऊन मी बाहेर आली, तर समोर प्रेम! त्याला पाहून तीन ताड उडायची बाकी होती. फक्त केसबिस कापून आलेला तो. मुलगी बघायला येणार तर अस्ताव्यस्त केस कसे चालतील? तो माझ्याकडे पाहून मंद हसला. कालच तर त्याच्याशी बोललेली मी. इतक्यात जगदाळे म्हणाले,

"बरे का पूर्णानंदा, ह्या घोरपडेसाहेबांना मदत करतात त्यांच्या प्रकाशनात. आपल्या प्रेमानंदाचे दुसरे पुस्तक छापणार आहेत हे!"

माझा चेहरा काळवंडला असावा. भिंदि म्हणाला, "मुली बरं नाही वाटत का तुला? त्या दिवशी जुळया बहिणी पाहिल्यास .. आज खरेखुरे जुळे भाऊ बघ!"

म्हणजे.. हा तो नव्हेच! वर माझा प्रेम याचाच जुळा भाऊ निघावा? आणि याने पसंत केले तर.. याच्याविरूद्धच लढाई ती ही याचीच वहिनी बनून! काय आहे स्वामींच्या मनात कुणास ठाऊक. आता एकच केले पाहिजे .. ध्यान देऊन काय काय बोलणे सुरू आहे हे ऐकायला हवे. पुढचा रस्ता यातच दिसेल मला. लक्ष देऊन मी ऐकू लागले नि काही मुद्द्यांची नोंद केली :

१. पूर्णानंद आणि प्रेमानंद दोघे जुळे भाऊ आहेत. पण दोघांच्या स्वभावात जमीन अस्मानाचा फरक आहे. दोघांच्या केसासारखा असावा! स्वभावातला फरक हा माझा निष्कर्ष!

२. पूर्णानंद जळगावातल्या ॲग्रो फर्ममध्ये नोकरीला आहे. प्रेमानंद मुंबईतच आहे नोकरीस पण एका ठिकाणी टिकण्याची गॅरंटी नाही त्याची.

३. प्रेमानंदास लग्नच करायचे नाही. इतक्यात असे नाही .. तर कधीच नाही. हे मी देखील ऐकले होते आधी. त्याच्याच तोंडून.

४. पूर्णानंद आणि प्रेम स्वभावाने वेगळे असले तरी एकमेकांचे लाडके आहेत. प्रेमच्या स्वभावात हे बसत नसले तरी!

अजूनही काही धागेदोरे हाती आले! असे म्हटले की काहीतरी पेपरातली बातमी वाचल्यासारखे वाटते. पण धागेदोरेच म्हणावेत! सगळयात महत्वाचे म्हणजे प्रेमला कुठल्याही गोष्टीस तयार करणे.. मुश्किलही नहीं.. नामुमकिन! म्हणजे माझे काम किती कठीण याचा अंदाज आला मला!

थोड्याच वेळात पोहे खाऊन नि चहा पिऊन निघून गेले सारे. आठवड्यात कळवतो म्हणून! दोन दिवस भिंदिकडे राहतील म्हणे नि मग परत जळगावी! हिंदीत 'दिमाग का दही की छास' होणे म्हणतात तसे झाले माझे. काय करणार आहे मी आता? याला नाही म्हणू तर कसे नि प्रेमला पटवू तर तेही कसे?

रात्री अगदी इमर्जन्सी म्हणून मी काकुकडे गेली. मिलिंदा तेव्हाच आलेला. सगळी गोष्ट ऐकून काकु म्हणाली, "करावे तसे पुढच्या जन्मी भरावे म्हणतात.. पण तुला याच जन्मी.. अगदी दोनचार दिवसात भरावे लागलेले दिसतेय.. मला आणतेय जुळी बहीण! घे एक खराखुरा जुळा!"

मी रडवेली झालेली पाहून मिलिंदा म्हणाला, "काही मार्ग काढू आपण. थोडा विचार करू देत."

"आणि जमल्यास तूही कर!" काकु म्हणाली.

हे चांगलेय.. हिच्या लग्नातले सारे डावपेच माझेच होते. आता बोलतेय कशी? पण माझे ग्रहमान खराब दिसतेय. म्हणून गप्प बसली.

रात्री परत मग प्रेप्रीप्रीबंस ची बैठक झाली. मिलिंदा होताच अध्यक्षस्थानी. त्याने सुरूवात केली, "असा पेचप्रसंग कधी न आला, न येईल आणि तो सोडवण्यातच आपले कौशल्य आहे. आणि हे आव्हान आपल्याला पेललेच पाहिजे. कसे त्याचा विचार करण्यास ही मीटिंग बोलवण्यात आली आहे. आपल्या सर्वांना ग्राऊंड रियालिटी ठाऊक आहे. त्यामुळे त्याची पुनरूक्ती न करता पुढे जाऊ.. कालिंदीताई.. नाही बाई.. तुमचे काय मत आहे?"

"माझे मत असे आहे की कठीण काम आहे हे.. काही सुचत नाही."

"सुचत नाही तेव्हा समिती काय करते?"

"आपल्या रिवाजानुसार कडक कॉफी पिते! आणि ती कॉफी जिच्यासाठी मीटिंग बोलावली तिने बनवायची असते!"

"हुं.. तुझ्या वेळी किती कॉफी बनवलीस काकु? तुला सांगू मिलिंदा.."

"चूप.. बोलू नकोस. सीक्रेट आहे सारे आणि चुपचाप कॉंफी बनव! नाहीतर आता तात्यांना करते फोन.."

कॉफीत काहीतरी जादू असावी. एक कप कॉफी आणि आयडिया ढेर साऱ्या!

मिलिंदा म्हणाला, "आता आपल्याला दोन गोष्टी हव्यात .. एक म्हणजे तो पूर्णानंद पूर्णपणे नकार देईल आणि दुसरा .. प्रेमला लायनीत आणावे कसे?"

"परफेक्ट!" काकु म्हणाली.

"आता पहिला भाग. पूर्णानंद.. त्याने नकार दिला तर एक मोठा प्रश्न सुटेल."

"पण त्याने तसे नाही केले तर?"

"तो चॉईस त्याला .. एक मिनिट .. तुला तो कसा वाटला प्रीती?"

"कसा म्हणजे .. मी नाही प्रेमला सोडायची .."

"हो ग बाळ.. उगी उगी.. तुला मिळेल हो तुझा प्रेम. पण सांग स्वभावाने कसा आहे तो?"

"चांगला वाटतो. मनमिळावू वगैरे विशेषणे वापरता यावीत .."

"आणि तो आता जळगावात आहे.. राईट?"

"आता.. नाही. दोन दिवस तो इथेच आहे!"

"इथे म्हणजे?"

"भिंदिच्या घरी!"

"भिंदि! बापरे!"

"काकु.. घाबरू नकोस .. मी तुझ्या पुढेच आहे!

पण तुला काय म्हणायचेय मिलिंदा?"

"हेच.. डायरेक्ट ॲप्रोच! टू पूर्णा! त्याला वस्तुस्थिती सांगून टाकायची.."

"म्हणजे? या प्रीतीचे बाहेर लफडे आहे म्हणून?"

"काकु.. काहीतरी बोलू नकोस.. लफडे काय? दिव्य प्रेम आहे ते!"

"ठीक.. काहीतरी भानगड नाहीतर प्रकरण आहे असे सांगू!"

"नाही! पूर्णाला सांगू की ही जी आहे ती तुझ्या भावावर मरतेय! तू तिला नकार दे. पुढचे पुढे. अर्धा प्रा◌ॅब्लेम तर सुटेल."

"गुड आयडिया. आणि कदाचित पूर्णा आपल्याला त्या प्रेमबद्दल माहिती देऊन मदतही करेल!"

"वा◌ॅव!"

"पण एक छोटासा पॉईंट..भिंदि नामक वाघाच्या गुहेत त्या पूर्णाला एकट्याने गाठायचे कसे?"

"हा प्रश्न जटिल खरा. पण काहीतरी करू. आता झोप येतेय."

"मला देखील .." जांभई आवरत काकु.

"मी हा प्रश्न झोपेत सोडवेन!"

"म्हणजे?"

"अगं हा झोपताना प्रश्न घेऊन झोपतो. सकाळी उत्तर सुचते त्याला .. म्हणे!"

"सुचते म्हणजे सुचतेच!"

रात्री घरी आली. एक ठरलेले.. पूर्णानंदाची मदत घेऊन कमीतकमी एक प्रश्न तर सोडवावा. दुसरा कठीण प्रश्न नंतर. शाळेत बाई सांगायच्या ना, पेपरातले जे प्रश्न नीट सुटतात ते आधी सोडवा. बाकीचे शेवटी! शाळेत शिकवकेले असे उपयोगी पडेल असे वाटले नव्हते! नशीब आई नि तात्यांनी काहीच विचारले नाही. आता उद्या महत्त्वाचा .. उज्जवल परवासाठी!

झोपली मी. स्वप्नात प्रेम.. आरशासमोर. समोर आरशात पूर्णा. दोघे तलवार घेऊन लढाई करताहेत. मी बाजूला उभी. हातात वरमाला घेऊन. पूर्णानंद ताकदवान दिसतोय .. लढाई प्रेम हरताना दिसायला लागला.. पाठून मिलिंदा आला.. आरशातल्या पूर्णाला गुदगुल्या करून हसवायला लागला .. प्रेमने मोका शोधून हल्ला चढवला.. आणि मी उठून बसली.. तेव्हा पहाटेचे पाच वाजलेले! म्हणजे खरे होणार तर स्वप्न!

१७

## पूर्णानंदाशी भेट

## अर्थात

## एकच लक्ष्य: प्रेमचे प्रेम!

उगवत्या दिवसाचा उगवता सूर्य कसल्या आयडिया घेऊन येईल? मी रात्रभर विचार करायचा प्रयत्न केलेला. पूर्णानंदास कसे गाठावे? भिंदिच्या नकळत? नि कदाचित त्या जगदाळे काकांच्याही नकळत. माझे डोके चालेना. पण मिलिंदाने काही तरी डोके लढवले असेल रात्रीतून तर.. असेल नाही .. असायलाच हवे.

सकाळी काकुला फोन लावला. ती म्हणाली, "भिऊ नकोस मुली मी तुझ्या पाठीशी आहे."

म्हटले, "नुसती पाठीशी राहून काय फायदा.. मिलिंदाला काही तरकीब सुचली की नाही?"

"अर्थातच .. तो माझा मिलिंदा आहे! तू ये. सांगते. हम करेंगे तुम्हारे आनेका इंतजार.. करो बहन हमपर तुम ऐतबार.. ये लवकर."

मी म्हटले, चला याच्या डोक्यात काही शक्कल निघाली म्हणजे काहीतरी होईलच चांगले.

काकुकडे पोचली तर मिलिंदा म्हणाला, "लवकरच मला त्या पूर्णानंदाचा पूर्ण नंबर मिळेल.. त्याला बोलावून घेऊ.. पूर्ण विश्वासात घेऊ.. पूर्ण काम होईल तुझे!"

"पण नंबर?"

"हुं.. पत्रकारास अशक्य ते काय. रात्रीत चार लोकांना लावले जळगावात कामाला. सगळे जगदाळे शोधले.. मग त्यात तू म्हणालीस तसा अॅग्रो मधे कामाला असणारा जगदाळे शोधला. जैन आणि जैन अॅग्रोत आहे हा पूर्णानंद. तिकडे ऑफिसात कुणी आले की त्याचा नंबर हातात! अर्ध्या तासात समज!"

हे असे इतके सरळ होईलसे मला स्वप्नातही वाटले नव्हते.

थोड्याच वेळात पूर्णानंदाला फोन गेला. मिलिंदाच बोलला त्याच्याशी, "हॅलो, मी ज्वालाग्राही सर्वदा चॅनेल मधून बोलतोय .. तुमच्या भावाच्या पुस्तकाबद्दल तुमचे चावे म्हणजे बाईट्स घ्यायचे होते.. हो.. तुम्ही लवकर येऊ शकाल तर बरे.. अहो चॅनेलची माणसे आम्ही, सगळीकडे लक्ष ठेऊन दक्ष असतो आम्ही.. येताय ना.. आल्यावर बोलू सविस्तर .. पाठवतो माझा पत्ता .. भेटू.."

मिलिंदाने त्याला मुलाखतीच्या निमित्ताने त्याच्या ऑफिसात बोलावून घेतले. मिलिंदा हुशार आहे. पण कालिंदीने त्याला पटवण्यासाठी केलेल्या युक्त्या त्याला कळल्या नव्हत्या तेव्हा! की कळून सवरून .. म्हणजे प्रेमला पण माझी ही सारी धडपड कळत असेल.. कदाचित .. कोण जाणे. असेल तर छानच!

आता थोड्याच वेळात एक प्रा◌ॅब्लेम सुटणार अशा आनंदात मिलिंदा नि मी त्याच्या ऑफिसात पोहोचलो .. पण माझे काम असे सहज झाले तर मला तपस्विनिचा दर्जा कसा मिळाला असता! पार्वतीला तप करायलाच हवे! आम्ही पोहोचलो आणि पाठोपाठ पूर्णानंद येताना दिसला..

एकटा नाही, तर बरोबर त्याच्या होता तोच.. कुंडलीतला शनि.. भिंदि! मिलिंदा त्याला एकटाच ये असे तरी कसे सांगणार होता?

आता काय? मी हळूच आतल्या खोलीत सटकली आणि किलकिल्या दरवाजातून बाहेर काय होते पाहू लागली.

"कॅमेरामन येईतोवर थांबू.."

"कॅमेरामन की वुमन?"

"मन.. वुमननी जाॅब सोडला! त्यांच्यात घरचे कामावर जाऊ देत नाहीत ना.. तुम्ही थांबा.. मी आलोच!"

मिलिंदा आत आला. तो ही गोंधळलेला. भिंदिला कटवावा कसा?

"मी फोन करू भिंदिला? तात्यांनी बोलावले म्हणून सांगते!"

"नको.. आधीच त्याच्याशी खोटे बोलून झालेय बऱ्यापैकी. अजून नको."

"नाहीतर साहित्य दिवे प्रकाशनातूनच फोन करू..?"

"तुझा आवाज ओळखेल तो.."

"मग?"

"आयडिया! मंचरजी!"

एवढे बोलून तो तडक बाहेर गेला. थोड्या वेळात परत आला तर त्याच्या बरोबर एक पारशी गृहस्थ. तोच बाॅस असावा त्याचा. फिरोज मंचरजी. बाहेर येता येता त्याने भिंगारदिव्याला हाक मारली, "अरे भिंगार्दिवा.. तू इकडे कसा साला?"

भिंगारदिवे उठून उभा राहिला.

"अरे चाल नी अंदर. साला केटला साल पछी मारा जानी दोस्त.. चाल चाय पिऊ.. गप्पा मारू."

भिंदि जायला निघाला तसा पूर्णापण निघाला. चहा प्यायला की काय? तसा मंचरजी म्हणाला,

"अरे यंग मॅन, तू बस नी अहियां. ए लोग तुझा इंटरव्ह्यू घेते तोपर्यंत, तुजा चाय इथेच पाटवते!"

इंटरव्ह्यू!

भिंदि जाताच मिलिंदा मागे फिरला. पूर्णानंदाला आत बोलावून घेतले त्याने. पूर्णा आत आला.. मला पाहताच म्हणाला, "तुम्ही?"

मिलिंदा त्याच्या कामासाठी निघून गेला. नि

मी त्याला सारे खरे खरे सांगितले. अगदी भिंदिला कसे फसवले प्रेमला भेटण्यासाठी हे सुद्धा आणि आता भिंदिला कटवण्यासाठीच पाठवून दिले हे ही! म्हणजे त्याला माझ्या प्रेमवरील प्रेमाचा अंदाज यावा. त्यावर तो आधी काहीच नाही बोलला. माझे सांगून झाल्यावर म्हणाला, "आता माझे ऐकून घ्या!"

त्याने सांगितलेले ऐकून मी अजूनच उडाले!

काही दिवसांपूर्वी त्याचे ते सीनियर जगदाळे आलेले, ते प्रेमसाठीच! त्यानंतर प्रेम बधत नाही पाहून पूर्णानंदाचा नंबर लावला त्यांनी.

"काही करा. प्रेमला समजावणे कठीण. लग्न म्हटले की तो दूर पळतो. आणि तुम्ही ते करू शकलात तर.. एकतर ते आश्चर्य असेल आणि दुसरे घरी सारे अगदी खुश होतील. तरीही घरी मी तुमच्या या प्रयत्नांबद्दल नाही काही सांगत. आणि मी नकार द्यायला शोधून काढेन काहीतरी कारण! ऑल द बेस्ट! काही मदत लागली तर सांगा. तसा अनुभव नाही मला काही पण तरीही. प्रेम चांगला आहे मनाचा पण जिद्दी आहे. कुणाचेच कधीही ऐकत नाही तो. तो फोन नंबर बदलतो, रहायच्या जागा बदलतो, नोकऱ्या बदलतो.. त्याला जगच बदलायचे म्हणून. त्याला आम्ही आलोत हेही ठाऊक नाहीए. म्हणून तर भिंगारदिवेंकडे राहिलो आहोत. परत एकदा बेस्ट ऑफ लक. त्याची खूप गरज आहे तुम्हाला. अजून एक.. बाकी काही असले तरी त्याला आवडते ती स्ट्रॉबेरी. महत्त्वाच्या वेळी ती वापरा! तिसऱ्यांदा ऑल द बेस्ट!"

तीनतीनदा हा बेस्ट लक म्हणतोय. आजवर एवढे टेन्शन नव्हते. एक प्रश्न सुटला तरी उत्तीर्ण व्हायला दुसरा सुटायलाच हवा. आजवरचा माझा आत्मविश्वास थोडा डळमळीत व्हायला लागला. तरीही मी उसन्या अवसानात म्हणाली, "तुम्ही म्हणालात ते ठेवते ध्यानात. बघते कसे जमते ते!"

पूर्णानंद निघून गेला. त्याच्याकडून मिळाले ते काय.. फक्त एक स्ट्रॉबेरीची हिंट! बाकी सब अब रामभरोसे! अब तेरा क्या होगा प्रीती?

मिलिंदा परत आला. म्हणाला, "माय बाॅस इज ग्रेट. त्याला पूर्णानंदाची पूर्ण स्टोरी सांगितली तर काम सोडून आनंदाने बाहेर आला."

मग मंचरजीला भेटली मी पण! दिलदार आहे माणूस. "शेवटला ते पेढे खाऊ घाल पोरी.. बायडी बोलते पेढे खाऊन डायबिटीस होतो. मी म्हणते साला माज्याकडे डायाबिटीस कशाला

बघते वळून.. लवकर गुड न्यूज दे.. साला ते प्रेम पागल असते काय.. इत्ती चांगली पोर्गी पाठी पडते नि.. एकदा घ्यून ये.. साला ब्रेन वाॅशच करते तेचा! गधेडा साला!"

एक मात्र झाले. सारे अनिश्चिततेचे ढग निघून गेले आता. आता फक्त एकच अनिश्चितता आणि एकच लक्ष्य.. प्रेम आणि प्रेमचे प्रेम! आता काय नि कसे करायचे ते मलाच बघायला हवे. इथे ती 'प्रेप्रीप्रीबंस' नाही येणार कामी. प्रीतीबाई, कंबर कसून लागा कामाला!

१८

# समोवार

# अर्थात

# भेट तुझी माझी!

आता कामाला लागावे म्हणजे काय करावे? साधा उपाय आहे.. प्रेमला फोन करणे. बोलण्यात गुंगवणे आणि त्याच्याशी भेट पदरात पाडून घेणे. त्याचे ते दुसरे पुस्तक हाच माझा पासपोर्ट! तो वापरून पुढच्या हालचाली करायला हव्यात.

सकाळी फोन लावला त्याला. घेतला ही त्याने. रंगढंग प्रकाशनाचे रंग डायरेक्ट पुसत म्हणाली, "प्रीती बोलतेय. खूप दिवसात बोलणे नाही झाले."

"ओह.. मला वाटते आपण दोन तीन दिवसांआधीच बोललोय.."

अरसिक! इथे मी क्षण न क्षण मोजते नि हा दोन तीन दिवस असे म्हणतो जणू दोन तीन मिनिटच असावेत. निर्दयी दिसतोय.

"हो ना. कुठवर आले लिखाण? तुम्हा लेखकांचे एक बरे असते, हवे ते घडवा.. नाहीतर बिघडवा! म्हणजे त्या नायक नायिकेस भेटण्याची घटिका कधी भरवताय तुम्ही?"

हा आपला माझा अंदाज होता. आणि खरेतर माझा स्वतःबद्दलचाच प्रश्न होता! पण त्याने प्रेम खूश झाला.

"तुमचा प्रश्न अचूक आहे हो.."

"एक मिनिट हां.. काय आहे तुम्ही मला तुम्ही वगैरे नका म्हणू.. शिक्षणाने नि पात्रतेने मी किती लहान आहे तुमच्याहून.."

"अहो पण, ओळख देख नसताना .."

"अहो.. देख तर आहे.. ओळखपण बऱ्यापैकी झालीय.. मला तूच म्हणाना.. नुसते प्रीती म्हणालात तरी चालेल .. म्हणाल ना.. प्लीज?"

त्या प्लीजने त्याचे हृदय थोडे वितळले असावे. म्हणाला, "तुम्ही म्हणता तर.. तू म्हणतो.. तुला प्रीती! एक आहे तुम्हाला .. तुला.. नाव शोभते हां.. तुझ्या वागण्यात नि बोलण्यात ही प्रीती जाणवते.."

माझा माझ्या कानांवर विश्वास बसेना. प्रेम असे काही डायरेक्ट बोलेल? की मी आपल्याच मनचे काही ..

पण प्रत्यक्षात त्याकडे दुर्लक्ष करत म्हणाली मी, "शरणकुमार नि साठे! शहरी प्रश्न! पुढे काय करायचे ठरवलेय तुम्ही?"

"हे बघ, हा प्रश्न तसा सोपा नाही प्रीती. मी पहिली दोन पाने लिहिलीत. तुला वाचून दाखवू?"

"फोनवर?"

"हां, तेही खरंच! कुठे तरी भेटायला हवे! आणि सॉरी, ते प्रीती नावाबद्दल बोललो ते रागावली नाहीस ना तू?"

याच्यावर नि रागावणार मी?

"नाही हो.. तुम्ही किती छान बोलता प्रेमानंद! जितके लिहिता सुंदर तितकेच बोलणेही! मला तर बाई हेवा वाटतो?"

"कुणाचा?"

"कुणाचा काय.. तुमचाच."

किती देवदत्त देणगी म्हणणार होते. पण कुणास ठाऊक या विद्रोहकुमारास देव आणि देवाच्या नावाचे ही वावडे असले तर?

"का?"

"का काय..? इतक्या हुशारीचे कौतुक वाटणारच ना कुणालाही. कसं काय जमतं हो तुम्हाला इतके छान लिहायला?"

तो कदाचित तिथे लाजला असावा.. इतक्यात मीच म्हणाली, "नकाच सांगू आता. आपण भेटू ना तेव्हा सांगा! अजून काय काय विचारेन मी तुम्हाला. खरे सांगू लेखक म्हणावा ना असा ओळखीत माझ्या तुमच्याशिवाय कोणीच नाही. आणि तुम्ही बोलता पण किती सुरेख! कधी भेटूयात?"

"ठरवून सांगतो. तुम्हाला इकडे कुठे यायला जमेल ना?"

"कोणाला? तुम्हाला .. ? की तुला? प्रीती नाव आहे माझे!"

"ओके. सॉरी! तुला जमेल ना इकडे जवळपास यायला .. प्रीती?"

मनात बोलली, तू बोलावलंस तर आताच येते.. तू म्हणशील तिथे!

साळसूदपणे मी म्हणाली, "अर्थात. तुझा जास्त वेळ नाही घेऊ. तुम्ही काय साहित्यिक! लेखकाचा क्षण न क्षण महत्त्वाचा."

"हे तुझे काहीतरीच. पण काय आहे नुकतीच नवीन नोकरी लागलीय.. सुटायला वेळ होतो. तू इकडे आलीस तर इथेच भेटू!"

"ओके. नक्की .. आज येते. सहा वाजता?"

एवढ्या पटकन त्याला वाटले नसेल मी विचारेन.

"आज.. पण तयारी करायला लागेल. मी लिहिलेय.."

"काय आहे आपण जनरल रूपरेषेची चर्चा करूयात. बाकी प्रकरण बाय प्रकरण नंतर .. नाहीतरी हे प्रकरण वाढवायचेच आहे मला!"

शेवटचे वाक्य त्याला ऐकू जाणार नाही असे हळूच बोलली मी!

"ठीक. तू म्हणतेस तसे. आज ये. इकडे जवळच छान हॉटेल समोवार आहे. चहा पिऊ नि गप्पा मारू."

"पण ते बसू देतात..?"

"अगं.. आमचा लेखकांचा अड्डा आहे तो. तिथे आम्हाला कितीही वेळ बसू देतात. माझे पहिले पुस्तक तिथेच आकाराला आले.."

"आणि आता दुसरेही!"

पुस्तक येईल तेव्हा येईल, आमचे प्रकरण मात्र आकाराला यायलाच पाहिजे! आगे बढो प्रीती!

दुसऱ्यांदा फोन केला. प्रगती चांगली होती माझी. तुम्ही वरून तू.. आणि प्रीतीबद्दल प्रेम.. आणि आता भेटण्याची तयारी! प्रगती आहे प्रीती! या वेगात दिल्ली आता दूर नाही! फक्त नेहमीप्रमाणे यात काही गोंधळ न होवो म्हणजे झाले.

दुपारी फोन आला तो पूर्णाचा. म्हणाला, "आज रात्री निघतोय. प्रेमला सांभाळून घ्या! मनाचा चांगलाय पण मुद्दाम कधी वाकड्यात शिरतो. आणि एक.. मी तर नकार देईनच गरज पडल्यास.. पण त्याआधी घरात तुमचा नकार कळलाच पाहिजे!"

त्याचे लॉजिक बिनतोड होते. उद्या त्याच घरात प्रेमानंदशी सोयरीक जोडायला जमले पाहिजे! मला भरून आले. माझ्या या प्रेमकथेसाठी कोण कोण किती विचार करतेय! कालिंदी नि मिलिंदा तर आहेतच.. त्याचा बॉस पण.. नि आता पूर्णानंद देखील! या सर्वांचे श्रम फळास येवोत नि आईवडलांना चांगला जावई लाभो! स्वामीजी माझ्यासाठी जास्त मागणे नाही! आणि विचार तर मी सकारात्मकच करतेय ना!

संध्याकाळचे वेध मला दुपारीच लागले. समोवार हॉटेल. तिथे सारे लेखक बसून विचार- मनन- चिंतन- मंथन करतात म्हणे! डांबिस आहे काकु. मिलिंदाला मी सांगितले माझ्या भेटीबद्दल तर मिलिंदाने माहिती दिली मला. तर काकु म्हणते, "तुझे ग तिथे काय काम?" डांबिस! माझ्या प्रेमची मी स्फूर्ती देवता बनेन. तो एकाहून एक पुस्तके लिहिल तेव्हा बोलती बंद होईल तिची! असा राग आला तिचा! पण नंतर वाटले, तिची ही सवयच. येता जाता टांग खेचत राहते. आणि तिने काय कमी मेहनत घेतलीय माझ्या साठी? दुपार अशी हुरहुर वाटण्यात गेली. पण संध्याकाळी काय बोलावे याचा मात्र विचार नाही केला मी. उत्स्फूर्ततेत एक मजा असते म्हणे.

समोवारच्या सभोवार दाट झाडी आहे. मोठी टेबलं. बाजूला गरज पडली तर रिफर करायला पुस्तके. पेन आणि पेन्सिल .. कागद आजूबाजूस पडलेले. हवे ते घ्या. कुणी कुणाला उठवत नाही जागेवरून. मी पोहोचली तर प्रेम आधीच येऊन बसलेला.

"वा! अगदी वेळ पाळतेस तू प्रीती. सहा म्हणजे सहा वाजता आलीस."

"हो. तात्या म्हणतात कुणालाही वेळ दिलेली पाळलीच पाहिजे!"

या पेक्षा थोडी रोमँटिक सुरूवात झाली असती तर बरे झाले असते. पण येताना माझ्या छातीत धडधडत होते. तोंड कोरडे पडलेले. तशी पहिल्यांदाच मी प्रेम बरोबर एकटीने आणि चोराच्या मनात चांदणे असल्याने घरी न सांगता आलेली. त्याच्या पुस्तकाबद्दल बोलायचेय त्याला. मला तर बोलावेच लागेल. काय बोलणार मी? फोनवर चेहऱ्यावरचे भाव दिसत नाहीत.

"बस ना!"

मी बसली. प्रेम तसाच होता. इतके दिवस झोप उडवणारा तो चेहरा मी डोळ्यांत साठवून ठेवत म्हणाली, "लवकरसे आलात?"

"हो. ऑफिस लवकर सुटले. परत तुला बोलावलेले इथे. ही जागा इतकी छान आहे सांगू.."

"खरंय.. बघता बरोबर मी प्रेमात पडलेय.."

"काय म्हणालीस?"

"अहो जागा इतकी सुंदर आहे ना.. तिच्या."

"काय घेणार?"

देशील जे हवे ते..? माझ्या मनात प्रश्न!

"तुम्ही म्हणाल ते.."

"चहा छान मिळतो येथे .."

"चालेल."

मी चहाची दीक्षा घेतलेली उडप्याकडे, ती अशी उपयोगी पडली!

"मग, सापडली ना जागा? म्हटले रस्ता चुकतेस की काय?"

"नाही हो.."

"एक सांगू, तुला वाटते तितका मोठा नाहीये मी.."

"हा विनय.."

"विनय नाही प्रीती.. अगं वयाने.. तू मला अहो जाहो नको करूस.. मला वाटते आपली मैत्री आता झालीय बरीच!"

प्रेमने धक्का दिला मला.

"नाही हो.. म्हणजे तोंडात येत नाही .."

"म्हण पाहू .. तूची बाराखडी.. तू.. तुला.. तुझे.. तुझ्याकडे.. तुझ्यासाठी.. "

"बस बस.. म्हणते.. पण तोंडात बसायला वेळ लागेल.. चालेल .. तुला?"

"आता कसं.. आता आपण एका पातळीवरून चर्चा करू शकतो."

"चर्चा?"

"पुस्तकावर.."

"हां.. इथे आलं की सारं विसरायला होतं नाही? तुझं पहिलं पुस्तक गाजतेय!"

"खरं सांगू.. त्याने काय होतंय्.. तुला वाटेल मी भाव खातो म्हणून, पण लोकांचा ॲटिट्यूड बदलेल तर त्याला काही अर्थ आहे.."

"तसे नसते रे. तू कितीही जीव तोडून लिहिलेस.. कुणी वाचले तरच काही बदल होईल की नाही सांग मला.. जेवढे जास्त वाचतील तेवढा परिणाम वाढेल.."

"कुणास ठाऊक. घे चहा घे.."

"एक विचारू.. इथे आईस्क्रीम मिळते?"

"चहाबरोबर? असेल .. का?"

"मला स्ट्रॉबेरी आइस्क्रीम खायची इच्छा झालीय!"

"इथे ना.. फक्त चहा कॉफी आणि सँडविच! पण तू म्हणशील तर जाताना खाऊ दुसरीकडे."

पूर्णाचा बाण पूर्णपणे उपयोगी दिसत होता.

"मला काय वाटते बरं का प्रेमानंद, शरणकुमार परिस्थितीस शरण न जाणारा आहे. साठे समजा.. किंवा दुसरी जी कुणी नायिका असेल तिला .."

"मी एक सांगू .. इतक्या वेळा इथे आलोय मी.. आज काही वेगळेच वाटतेय.. तुझी हरकत नसेल तर एक सांगू .."

"हुं.."

"आज पुस्तक सोडून कशावर तरी बोलले तर चालेल?"

माझ्या मनात फुटणाऱ्या लाडवांचा आवाज बाहेर ऐकू येतो की काय.. भीती वाटली मला. फक्त हे फुटणारे लाडू बुंदीचे, रव्याचे की आणखी कसले असतात?

"नाही तुला वाटेल की मी बोलावले पुस्तकाबद्दल बोलायला नि तेच बोलायचं नसेल तर.. तुला.."

"छे छे. माझी कसली हरकत असणारे? परत भेटूच त्या पुस्तकासाठी.. होय की नाही?"

स्वप्नवत वेळ चालला होता. प्रेमने कॉलेजच्या आठवणी सांगितल्या. जातिभेदाने समाज कसा पोखरून काढलाय आणि त्याला त्याच्याबद्दलची पोटतिडिक ही सांगितली. पुस्तकांनी

दुनिया बदलेल असल्या भाबड्या विचारांचा नव्हता तो. उलट जातिविरहीत समाज हवा म्हणणारा नायक त्याच्या गोष्टीत दिसतो.. ते त्याचे विशफुल थिंकिंग होते.

"तुला सांगू.. लोक मला चक्रम म्हणतात. मी ते मत बदलण्याच्या फंदात नाही पडत. उलट स्वतःवरच विनोद करतो मी. हा बुरखा उपयोगी पडतो प्रीती.. का कुणास ठाऊक कुणाशी मी बोलत नाही इतके .. तुझ्याशी बोलावेसे वाटते!"

मी स्वप्नात तर नाही ना? मी स्वतःलाच चिमटा काढला.. आणि ओरडली, "आई गं!"

"काय झाले गं?"

"काही नाही .. तू म्हणतोस त्याचा विचार करतेय .. आणि मलाही तुझे बोलणे ऐकत रहावेसे वाटते. किती छान बोलतोस तू! उद्या भेटशील परत?"

"भेटूयात ना.. चल आता आईस्क्रीम खाऊ.."

"नको.. आज माझे पोट असेच भरलेय.. उद्या साठी ठेवू बाकी!"

अर्धा रस्ता त्याच्या बाईकवरून सोडले त्याने मला. घरी आली आणि पाठोपाठ त्याचा फोन.. नीट पोहोचलीस ना विचारायला! एखादे स्वप्न पहावे अशी ती संध्याकाळ. पहिली वहिली. प्रेमबरोबरची. त्याच्या बोलण्याचा विचार करून मी थक्क होत होती. माझा विश्वासच बसत नव्हता असे काही होईल यावर!

आई म्हणाली, "कुठे गं गेली होतीस?"

"कालिंदीकडे.. नाही.. त्या मुक्ताकडे."

"तेच. कालिंदीकडे कशी जाशील.. तीच आलेली इथे!"

"ती? कशाला?"

"अगं ती नसेल.. तिची जुळी बहीण असेल.. हो की नाही गं मने?"

तात्या माझी साक्ष काढत म्हणाले.

मी काही न बोलता आत निघून गेली. त्यानंतर का कोण जाणे.. दोघे हळूच हसल्याचा भास झाला मला.

१९

## हवेत उडते मी

## अर्थात

## भेटी आणि गाठी!

आज फिर मिलने का इरादा है.. आज फिर जीने की तमन्ना है.. गाफीलपणे मी गुणगुणत असतानाच आई आली मागून.

"काय गं, आज पण जायचेय.. मुक्ताकडे?"

"हुं.. कदाचित!"

"असेच..?"

"नाही गं. तिला कसली मदत हवीय अभ्यासात.."

आई काहीच बोलली नाही. हे संध्याकाळी बाहेर जायचे प्रकरण सोडवायला हवे! हे म्हणायला नि कालिंदीचा फोन यायला एकच गाठ पडली. तिच्याशी बोलता बोलता एक आयडिया सुचली मला! आणि दुपारपर्यंत मी मिलिंदाच्या ऑफिसात संध्याकाळी पाच ते नऊ अशा पार्ट टाइम जाॅबला लागले! असा कसा हा जाॅब? हा प्रश्न आताही पडतो, तेव्हाही इतरांना पडला पण प्रेमातुराणां मला नाही पडला! आता मुक्ताकडे न जाता मी मिलिंदाच्या ऑफिसला जायला लागली!

तर त्या दिवशी परत प्रेमला भेटली मी. तिथेच. प्रेम आधीच येऊन बसलेला.

"आज आईस्क्रीम नक्की!"

"होना! नाहीतर उद्यासाठी ठेवूयात?"

मी उद्याच्या भेटीची सोय आताच करीत म्हणाली. तो ही म्हणाला, "चालेल. उद्या मला ही हाफ डे आहे!"

ही त्याची हिंट समजावी का मी? कोण जाणे.

"ही जागा फारच सुंदर आहे."

"हो ना. मी पहिले पुस्तक इथेच बसून लिहिले .."

"एकट्याने?"

मी बोलली नि दचकून त्याने पाहिले.. त्याबद्दल काही न बोलता म्हणाला, "इथे आलो की शांत वाटते. नवीन कल्पना सुचतात.. लिहायला बरे वाटते.. आणि आता तर इथे यायला अजून एक कारण ही मिळालेय.."

"कसले?"

"हे दुसरे.. पुस्तक .. लिहिन मी. मी इथे आलो ना तर तू बोललीस तसा प्रेमात पडलो.. या जागेच्या. तुला सांगू ही जागा, हे टेबल माझे फिक्स. पुस्तक आले ना तेव्हा हॉटेलवाल्यांनी चहा पाजला मला!"

का कोण जाणे प्रेम बोलताना अडखळताना वाटत होता. सांगायचे एक असावे .. तोंडून शब्द दुसरेच येत असावेत. काही असो. बोलत मात्र होता. घरी आला तेव्हा अगदी गप्प गप्प वाटलेला तो. आता मात्र बोलत होता. कदाचित मला वाटते तेच त्याला वाटते की काय?

"मग आज काय.. टॅक्सीने आलीस की बस ने?"

"मी? बस. टॅक्सी रोज परवडायला नको?"

"पण हे प्रकाशनाचे काम.. ऑफिसचे.."

"हे?"

"नाही म्हणजे तू तात्यांचे काम करतेस.."

हुं.. बुद्धू. तात्यांचे काम? हा कुठला जावईशोध? नाही पण तसे काम तात्यांचेच.. त्यांचाच जावई शोधायचे! पण मी काय पुस्तकासाठी आलीय असे वाटते नि पटते त्याला .. की वेड घेऊन पेडगावला?

"अरे, नाही रे.. खरे सांगू, मी तात्यांना सांगितलेच नाही .."

"का?"

"हं.. असंच.. सरप्राईज!"

"कसले?"

"तुझे पुस्तक!"

"हो का? मग आजतरी चर्चा केलीच पाहिजे!"

"मी तयार होती काल.. तूच म्हणालास! पण माझी हरकत नाही हां आजही तुझा मूड नसेल तर. उद्या आहे.. परवा आहे.."

मनात म्हटले, मनात आणलेस तर जन्मभर आहे.. करू चर्चा हव्या तितक्या.

"लेखनाचा कसा मूड आला पाहिजे हो की नाही?"

"खरंय तुझं. तू समजून घेतेस ना तेवढे कुणीच समजून घेत नाही मला!"

"होतं लेखकराव. होतं असं. सगळयांच्याच वेवलेन्थ जमतात असे नाही .. आणि ज्यांच्या जमतात त्यांना कधी सोडू नये! माझे नाही हां.. एका पुस्तकातले वाक्य. पण खरेय की नाही?"

हिंमत करून मी हे बोलली. प्रेमच्या चेहऱ्यावरचे भाव पाहात होती मी. एकाक्षणी वाटले, त्याला ही हेच म्हणायचे असावे.. पण बोलत मात्र नाही तो.

वेळ कसा भर्रकन निघून गेला. आजचे आइस्क्रीम उद्यावर ढकलून निघालो आम्ही. एक चहा, एक कॉफी नि भरपूर बोलणे! त्याच्या बाईकवर बसली मागे. आज वाटले कधी त्याच्या अंगावर हात घट्ट टाकून बसेन मी? पण वेळ जवळ येत चाललीय असे मनातून वाटत होते.

प्रेम आता चांगलाच खुलला होता. जवळजवळ दररोज आमची भेट होत होती. पुस्तकाचे काम म्हणावे तर त्यात प्रगती नव्हती. रोज गप्पा. विचारांची देवाणघेवाण! हा शेवटचा शब्द त्याचा. मोठा भारदस्त! पण काही असो. प्रेम मला दिवसेंदिवस अजूनच आवडायला लागला होता. घरी कुणी काही विचारत नव्हते कुठे जातेस म्हणून. ते का विचारत नाहीत याकडे माझे लक्ष नव्हते. माझे लक्ष सारे दुसऱ्या दिवशीच्या संध्याकाळवर! प्रेमचे विद्रोहीपण बेगडी नव्हते. कित्येक जण प्रसिद्धीपुरता वापरतात हा विषय तसे तर नव्हतेच. उलट प्रसिद्धीपासून दूर पळायचा तो. तो टीव्हीवरच्या मुलाखतीला आला तेही अनिच्छेने नि आमच्या कारवायांमुळे. आधी मी थोड्या चेष्टेने नि थोड्या कुचेष्टेने पहायची त्याचे लिखाण. पण माणूस अगदी शंभर टक्के खरा होता. बाहेर एक आणि आत एक असले काही नव्हते त्याच्यात आणि त्यामुळे तर तो अधिकच आवडत होता मला. त्याच्या वागण्यात ही बराच बदल दिसायला लागलेला. माझ्या इतकीच ओढ त्याला ही असावी असे वाटायचे मला. अजून तो स्ट्रॉबेरी आईस्क्रीमचा मुहूर्त आला नव्हता.

दरवेळी उद्यावर ढकलून दुसऱ्या दिवशीच्या भेटीची सोय करायची मी. आणि तो ही हसून मान डोलवायचा. अर्धा रस्ता बाईकने सोडून तो परत जायचा नि त्या धुंदीत मी चालत परत जायची.

अशातच एक दिवस त्याचा तो इंटरव्ह्यू टीव्हीवर आला. कालिंदीने फोन करून कळवले खास.

"लेखकाची मुलाखत .. त्यात काय पहायचे?" आई मला डिवचण्यासाठी की काय म्हणत टीव्हीसमोर बसली. तात्या पण मुद्दाम घरी थांबलेले. कुठे बसावे मला कळेना. माझ्या प्रेमपासून जास्त दूर ही नाही आणि कुणाच्या डोळयांवर येईल असे चेहऱ्यावर भावही आणायचे नाहीत. सर्वांना अभिनयाचे प्राथमिक शिक्षण द्यायला पाहिजे शाळेत..

प्रेम बोलला ते जीव तोडून. त्याची मुलाखत रेकॉर्ड केलेली मीच पण त्याच्याकडे पाहता पाहता ऐकायचे राहूनच गेलेले. बोलला छान तो. मुख्य म्हणजे मनापासून बोलतो तो.

"बरा बोलतो नाही.." आई बोलली.

"हुं.. ज्या कुणी मुलीच्या नशिबात असेल तिचे कठीण आहे! असली मुले बनवणे देवाने बंद केले त्यालाही कित्येक वर्षे उलटून गेली!"

मी तंद्रीत त्याला पाहात होते.. आणि आईचा प्रश्न आला..

"तुला बरा वाटतो का गं हा.. नाही म्हणजे तू त्याचे पुस्तक वाचलेलेस.."

"हं.. पुस्तक छान होते.."

"आणि हा?"

"काहीही काय विचारतेस कमलिनी.." तात्यांनी तिला टोचले. कमलिनी म्हणजे माझी आई.

एकूण कार्यक्रम मस्त झाला. भिंदिपण त्याच्या टकलासारखा चमकला थोडा वेळ. पण प्रेमची बात काही औरच! जाता जाता मी कालिंदीकडे गेली. आताच महाबळेश्वरहून आलेली ती. तिच्याकडून ताजी स्ट्रॉबेरी घेतली. आज माझ्या प्रेमचा खास दिवस.

समोवारला पोचली तर प्रेमभोवती मोठा घोळका लोकांचा. आजवर आम्हाला कुणी त्रास देत नव्हते आता हा स्टार झाला जणू! मी पोचली आणि लोक 'मॅडम आई..' 'मॅडमको जाने दो' म्हणून बाजूला झाले. मला लाजल्यासारखे झालेच. पण गेला महिनाभर आम्ही इथे येत होतो. लोकांना काहीतरी वाटणारच. तरीही समंजसपणे सारे बाजूला गेले आपापल्या जागी. प्रेम थोडा वैतागलेला दिसला. त्याला असली प्रसिद्धी नकोशीच होती. पण आता तो काय करणार होता?

तो काही बोलण्याआधीच मी बोलली,

"प्रथम मी काय बोलते ते ऐक.. मग वैताग!"

"बोल बाई.."

"एक, प्रसिद्धी हे अळवावरचे पाणी आहे.. तुझेच वाक्य आहे. आज आहे उद्या कुणी पाहणार नाही. त्यामुळे जे आज आहे त्याकडेही दुर्लक्ष कर. दोन, इंटरव्ह्यू मस्त झाला. तू काय बोलतोस यार. इंप्रेस्ड! तीन, या मुलाखतीने अजून काही लोक वाचतील पुस्तक तुझे .. त्यातल्या एका टक्क्याचे जरी मतपरिवर्तन झाले तर त्यादिवशीची आमची मेहनत फळाला आली. आणि चार .. काही न बोलता या स्ट्रॉबेरी खाऊयात!"

माझ्या बोलण्याने प्रेम अगदी शांत झाला असावा. त्याला काय वाटते हे त्याने न सांगता मला कळावे, त्याचे आश्चर्य वाटले असावे त्याला! पण गेले काही महिने ज्याचा दिनरात्र विचार असेल मनात, त्याच्या मनातले कळले मला तर त्यात काय मोठेसे?

स्ट्रॉबेरी म्हणताच डोळे चमकले त्याचे..

"कालिंदी गेली होती. आजच आली महाबळेश्वरहून. मला स्ट्रॉबेरी इतकी आवडते सांगू .."

"मला देखील! आपल्या आवडी जुळतात हां प्रीती!"

हाच तो क्षण.. सांगावे त्याला, मलाही तू आवडतोस.. आणि मला वाटते तुलाही मी! पण नाही बोलले. त्यासाठी एखादा हळुवार क्षणच हवा. आणि ते आपोआपच तोंडून यावेत शब्द! त्या क्षणाचे पावित्र्य आयुष्यभर ध्यानी रहावे!

स्ट्रॉबेरी पोटभर खाल्ली आम्ही. प्रेम जरा गंभीर दिसला आज. दुसऱ्या दिवशी भेटण्याचे ठरवून निघालो आम्ही, आजवर स्ट्रॉबेरी आईस्क्रीम उद्यावर ढकलत आलेलो .. बाईकवरून निघालो.. तर रस्त्यात दुरून कोण दिसावेत? भिंदि आणि तात्या! नशीब त्यांनी पाहिले नाही! बाईकवरून उतरताना प्रेम म्हणाला, "उद्या आईस्क्रीम.. तुला काही सांगायचंय मला.. आईस्क्रीम खाता खाता!"

मी निघाले विचार करत, खरंच तात्यांनी पाहिलं नसेल ना? आणि उद्या प्रेम काय सांगणार आहे?

२०

# घडणारे ना टळते

# अर्थात

# प्रेमचा धक्का!

घरी आली मी. तात्या घरी आधीच पोहोचलेले. काहीच बोलले नाहीत म्हणून जीव भांड्यात पडला. आता फक्त उद्याची चिंता! प्रेम काय सांगणार आहे? मुन्नाभाईच्या त्या सिनेमासारखे म्हणाली मी स्वतःलाच, काय सांगणार तू ते ठाऊक आहे मला.. पण कसे सांगणारेस तेच पहायचेय मला!

आज रात्री झोप नाही यायची मला. रात्रीची झोप उडवणाऱ्या माझ्या प्रेमा.. किती रे छळशील तू.. जिवलगा?

रात्रभर जागीच होती मी. पहाटे डोळा लागला. स्वप्न पहायची खोड माझी .. ते मी जागेपणीच पाहून घेतलेले. उठली तोवर उशीर झालेला. घरी शांतता होती. तात्या निघून गेलेले. आई कामात. कालिंदीला फोन केला, कालच्या स्ट्रॉबेरीबद्दल थ्यांक्स बोलायला. आणि माझ्या त्या चॅनेलवरच्या कागदोपत्री जाॅब साठी ही! किती मदत केलेली तिने नि मिलिंदाने. आज हे सारे सुफल संपूर्ण होणार. एकदा का प्रेमने तो सिनेमात म्हणतात तसा इजहार केला की पुढे सारे सोपेय. काल तात्याच म्हणालेत, मुलगा चांगलाच आहे! त्यामुळे सारे काही सोपे नि सुरळीत! इतक्या लवकर हे सारे घडून यावे यावर विश्वासच बसत नव्हता माझा. आज फक्त मरून ड्रेस.. मरून पर्स .. मरून चप्पल!

संध्याकाळी आम्ही भेटलो तिथेच. प्रेम नेहमीपेक्षा शांत होता. टेन्शन तर असणारच ना! त्याच्या बाईकवर बसून निघालो आम्ही. स्नोमॅन्स.. आईस्क्रीमचे मोठे दुकान.. समुद्र किनारी तेही. किती छान जागा शोधून काढलीय याने. मी मनात अजूनही लाजत होते..

"चल. मी इथे आजवर कधीच नाही आलेलो.."

"का?"

"कारण ही जागा मला फार आवडते.. एकट्याने इथे काय खायचे आईस्क्रीम? आज तू आहेस म्हणून .. आधी आईस्क्रीम खाऊ.. डोके थंड करून मग बोलू!"

त्याच्या त्या डोके थंड करण्याच्या भाषेने मनात पाल चुकचुकली माझ्या. काय आहे याच्या मनात? पूर्णानंद बोललेला त्याची आठवण झाली. याच्याकडून कसली करावी अपेक्षा. थंडगार आईस्क्रीम खाता खाता म्हटले सकारात्मक विचार करावा! पुढचे पुढे!

स्ट्रॉबेरी आईस्क्रीम समोर होते दोघांच्या.

"लवकर खा.. थंड होईल!"

मी अगदी जोक मारण्याचा प्रयत्न केला! प्रेम हळूच हसला!

समुद्रकिनाऱ्यावरच्या वाळूत बसलो आम्ही. प्रेम म्हणाला, "मी सांगतो ते नीट ऐक. आणि शेवटी बोल काय ते."

मी ऐकायला लागली. मनाची तयारी गेल्या पाच दहा मिनिटात करून ठेवलेली मी. पूर्णाने इशारा दिलेलाच आहे. त्याहून जास्त होणार काय?

"प्रीती.. खरे सांगतो. तुझ्या घरी जेवायला आलो ना त्या क्षणी आयुष्य बदलले माझे. लव्ह ॲट फर्स्ट साईट फक्त ऐकून माहित होते. पण ते प्रत्यक्षात झाले. जेवणाकडे कसले, माझे लक्षच

तुझ्याकडे होते. त्यामुळे मी बोललोही नाही विशेष. घरी आलो तर तुझाच विचार. मोठ्या कष्टाने मी त्यातून बाहेर पडलो तर तुझ्या तात्यांनी तुझ्याशी गाठ घालून दिली. तुला नंबरही चुकीचा दिला मुद्दाम.. टाळत राहिलो तुला. वाळूत शहामृगाने तोंड लपवून ठेवावे तशी वस्तुस्थिती नाकारात राहिलो. दूर जायचा प्रयत्न करत राहिलो. कठीण होते ते फार. त्यानंतर मुलाखतीच्या निमित्ताने तूच बोलावून घेतलेस.. मनाने परत उचल खाल्ली.. मला या गुंत्यातून सुटायचे होतेही आणि खरेतर नव्हते ही. दिनरात्र तुझाच विचार. आतातर गेले काही दिवस मी हवेत तरंगतोय तुझ्यामुळे. आता जमिनीवर यावेच लागेल मला. हे असे काही होईल माझे असे मला कधीच नाही वाटले. पण जे वाटते ते मनापासून वाटतेय. आता पुढे काय? माझा लग्नसंस्थेवर विश्वास नाही. आणि त्याहून महत्त्वाचे, माझा स्वभाव असा. कुठे काही चुकीचे दिसले की लागलो भांडायला. मी नोकरीत टिकत नाही. पुढे तुझे कसे होईल? म्हणून आज आईस्क्रीम खाऊन घेतले तुझ्याबरोबर. उद्या पासून आपले भेटणे बंद करायला हवे. आणि तुझे मत मला ठाऊक आहे प्रीती. पूर्णाचा कालच फोन आलेला. सारे सांगितले त्याने मला. उगाच स्वतःला फसवत किती दिवस तुलाही फसवत राहू? त्यामुळे.."

हे सारे मला अपेक्षित होतेही आणि नव्हतेही.

म्हणजे त्यालाही पहिल्या दिवसापासून मी आवडत होती.. हे त्याच्या आजच्या सांगण्याहून जास्त अनपेक्षित होते. त्याची अवस्था माझ्यासारखीच हेही अनपेक्षित होते. आता त्याची यापुढची तयारी हीच खरी लढाई. तरीही डोळ्यांत पाणी आलेच माझ्या.

"प्रीती, मला तू फार आवडतेस, म्हणूनच वाटते, माझ्या सारख्याच्या बरोबर तुझे कसे होईल? प्लीज समजून घे. आयुष्यातला हा सर्वात सुंदर महिना मी हृदयाशी जपून ठेवेन.. तू सदा सुखी रहावीस.. चल निघू आपण."

तो उभा राहिला. मी स्वतःला लगेच सावरले. हे असे घडणार याची कल्पना होतीच मला. तर त्यात एवढे वाईट वाटावे असे काय होते? एकच.. त्याला मुळातच मी आवडत नसते तर..

आता पुढे काय? सिनेमातली हिरॉईन अशा वेळी बेडवर आडवी झोकून देऊन रडते. मी तसे नाही केले. आजवरचा हिशेब मांडला मी. तो कोण कुठला इथून सुरूवात करत त्याच्याशी सूत जमेपर्यंत मजल मारलीय मी. आता यापुढे काय नि कसे करायचे हेच बाकी आहे! घरी न जाता काकुच्या घरी पोचली मी. मिलिंदा घरी आलेला. दोघांना शक्य तितकी माहिती दिली आणि मिलिंदाने प्रेप्रीप्रीबंस ची इमर्जन्सी मीटिंग बोलावली!

मिलिंदाने प्रास्तविक केले, "आपली प्रिय प्रीती आणि तिला प्रिय प्रेम यांच्या प्रीतीबंधनात आजवरचे बंध म्हणजे अडथळे आपण दूर करण्यात यशस्वी झालो आहोत. आता समितीपुढे पुढचे नि कदाचित शेवटचे आव्हान आहे. नुकताच आपल्या वैज्ञानिकांनी चंद्रावर यान उतरवण्याचा प्रयत्न केला. तशीच ही परिस्थिती आहे. चंद्राच्या कक्षेत आपले हे प्रीतीयान पोहोचले आहे. आता फक्त यानाचे परफेक्ट लॅंडिंग बाकी आहे. त्याचाच विचार करण्यासाठी ही बैठक बोलावण्यात आलेली आहे.. कालिंदीबाई तुमचे काय म्हणणे आहे?"

"कॉफी!"

"म्हणजे?"

"तेच. काही सुचत नाही. प्रीतीताई उठा आणि कॉफी बनवायला घ्या कडक."

"मला वाटते या समितीच्या कुठल्याही बैठकीआधीच कॉफी बनवली पाहिजे. अशी केस परत न येवो! मिया बीबी राजी.. काजी भी राजी.. तरीपण.. क्या करेगा दर्जी! कसे शिवावे त्याने लग्नाचे कपडे?"

कॉफी पिऊन बैठक परत बसली. डोके खाजवूनही उत्तर मिळेना. प्रेमा.. कुठल्या मटेरियलचा बनलायस रे तू?

मिलिंदा परत डोके खाजवत बसला, कॉफी तरी कितीदा पिणार? आणि एकाएकी ओरडलाच तो.."सापडला उपाय .. कैलास जीवन"

"म्हणजे?"

"मंचरजी! प्रत्येक दुखण्यावर एकच इलाज. हर दर्द की एकही दवा.. मंचरजी! म्हणजे काही करून त्या प्रेमनामक ठोकळ्याला मंचरजीसमोर उभा करायला हवा."

"ठोकळा काय रे म्हणतोस त्याला.."

"मग काय ढोकळा म्हणू? माझा बाॅस त्याला म्हणजे कोणत्याही ठोकळ्याला समजावू शकतो. यस्स.. मंचरजी इज द सोल्यूशन! फक्त त्याला तिथवर आणायचा कसा हे पाहिले पाहिजे!"

"म्हणजे आता त्यासाठी डोकेफोड करायची?"

"हुं.. ही अशी केस दुर्मिळ. या केसचा अनुभव आपल्याला पुढे उपयोगी पडेल. तेव्हा चला. कामाला लागा! म्हणजे मला झोपू द्या. उद्या उठेन तेव्हा काहीतरी तिकडमबाजी सुचेलच. आणि तसे वेळेचे बंधन नाही .. प्रेम आपल्या खिशात असेल.. आज नहीं तो कल!"

माझ्या रडवेल्या चेहऱ्याकडे पाहात म्हणाला, "तशी घाईच आहे म्हणा आपल्याला.. झोपेत सोडवतो हा प्रश्न!"

मागच्या वेळेस पण त्याने रात्रीतून उपाय शोधलेला. त्याला आता झोपू देणेच योग्य होते.

घरी आली. आता लढाईतला शेवटचा भाग बाकी. मंचरजी अगदी दिलदार आणि उमदा आहे. भल्याभल्यांना वठणीवर आणतो तो म्हणे आपल्या बोलण्याने. आता हे ही महत्कार्य करेल तोच! मन में है विश्वास! सकारात्मक अगदी. रात्रभर विचार करत राहिली मी. आजवर इथवर मजल मारलीय ती सकारात्मक विचारांतूनच. आता पुढे ही मारेन. 'चोच दिली त्याने तो चारा ही देईल ..' नाही हे उदाहरण ठीक नाही. किती कठीण आहे सारे लिहिणे नाही? माझा प्रेम कसा झरझर लिहितो! आणि एकदा प्रेमच्या मनातला अडथळा दूर झाला की पुढे काय? मला काय नि किती बदलावे लागेल? मी अशी स्वामीभक्त आणि हा पूर्णपणे नास्तिक! याच्या जाॅबचा ठिकाणा नाही म्हणे, म्हणजे त्याच्यासाठी मला काहीना काही हातपाय हलवणे आले.. त्याला लिहायला मदत करायला मला वाचावेच लागेल सारा आळस सोडून. करेन मी सारे. पण हे सारे तो तयार झाला असे समजून .. म्हणजे समझो हो ही गया! अर्थातच हे होणार! बी पॉझिटीव्ह प्रीती!

२१

## जय मंचरजी

## अर्थात

## प्रेमला धक्का!

पुढे दोन तीन का कितीतरी दिवस असेच गेले. असेच म्हणजे कसे विचारू नका. एकेक दिवस खायला उठायचा. संध्याकाळी उगाच बाहेर पडायलाच हवे. नाहीतर त्या जाॅबचे काय झाले विचारेल आई. मिलिंदा मेसेज पाठवायचा, 'समस्या हल करनेकी हमारी हर संभव कोशिशें जारी हैं. कृपया सहयोग करें.' एकतर त्याचा बाॅस बाहेर गेलेला म्हणे. तो येईतोवर काहीच करणे शक्य नाही. मग काही विरह गीते ऐकत पडून राहायची मी. संध्याकाळी कालिंदीकडे जाऊन वेळ घालवायचा. हे किती दिवस चालणार? न जाने क्यूं होता है ये जिंदगी के साथ.. अचानक ये मन.. लेकरके उसकी याद.. छोटी छोटीसी बात.. त्याच्या बरोबरचे ते क्षण आठवत होते.. उगाच म्हणत .. तुझ बिन जिया उदास रे.. आ जा!

एके दिवशी सकाळी उठली नि मिलिंदाचा फोन आला. आधल्या रात्रीत उत्तर सापडले असणार त्याला. नक्कीच. म्हणाला, "दहा वाजेपर्यंत ये. माझ्या ऑफिसात! बाकी आल्यावर बोलू."

बाकी बोलू..? नक्की उत्तर आहे की नुसतेच बोलू? सद्य परिस्थितीत करण्यासारखे अजून काय होते?

मी पोहोचली तर मिलिंदा डायरेक्ट त्याच्या बाॅसकडे घेऊन गेला. मंचरजी म्हणाले, "डिक्रा, तू चिंता नको करू. आपनलोक कायतरी करू. चाय पी. मग बोलू आपन."

चहा येईतोवर ते आपले काम करत राहिले. मिलिंदा पण बिझी होता. नक्की काय करणार हे दोघे कुणास ठाऊक. थोडे मोकळे झाले तसे मंचरजी माझ्याकडे वळून म्हणाले, "ह्ये बग प्रीती.. तेचं काय हाये.."

हे बोलेतोवर आत त्याचा प्यून आला. कुणीतरी बाहेर आलेय सांगत..

"सर, मी बाहेर थांबू.. माझ्यामुळे तुमचे काम.."

"अरे, नाय डिक्री .. तू एक कर.. आतल्या रूममंदी बस. अन बोलवत नाय तोवर भायेर यू नको. तुला आत सगलं दिसल बी सी सी टीव्हीत. अन आयकू पन यील. पन भायेर यू नको."

"ओके सर.."

"ध्यानमंदी ठेव. आत बसून ऱ्हा. डोन्ट कम आऊट..नायतर दिसला तुजा प्रेम नि धावली भायेर! मी बोलवेल तो परेंत आतमंदीच बस"

"यस सर.."

बाहेर कोण आले असावेत? प्रेम तर होताच.. नि सोबत.. भिंगारदिवे! मला कळेना काय होतेय ते. प्रेम ठीक, पण भिंदिसुद्धा? मिलिंदाचा मोठाच प्लॅन दिसतोय काहीतरी.

बाहेरून आवाज येत होता. "अरे भिंगार्दिवा.. ये. मस्त वाटले साला तुला बघून"

"काय फिरोज.. तू बोलावणार नि मी येणार नाही? आठवतात कॉलेजचे दिवस .."

"साला ते कसे विसरणार.. बरे का यंग मॅन.. व्हाॅट्स युवर नेम.. प्रेमानंद .. यस्स.. यू आर देवानंद्स ब्रदर! जस्ट अ जोक हां. साला मी काय म्हणते, लाईफ हैना तर हसत ऱ्हायला पाह्यजे. साला डोन्ट बी सीरियस! सीरियस म्हणजे काय रे भिंगार्दिवा.. "

"गंभीर!"

"हां. अरे कॉलेजला होता तवा बी मदत करायचा हा मराठीसाठी. त्यामुळे थोडा थोडा यायचा. आन आता बायडी शिकवते घरला. यंग मॅन.. व्हाॅट विल्यू हॅव.. चाय, कॉफी?"

मंचरजींनी बेल वाजवली. प्यून आत आला.. तीन कॉफी म्हणून ऑर्डर देत म्हणाले,

"तर सांगत काय होता.. माजी बायडी मराठी आहे. साला या भिंगार्दिव्याला ठाऊक. कॉलेजक्वीन. तिला पटवायला ह्या सगळ्यानी केटली मेहनत घेतली. तर तुला गंमत सांगते.. आम्ही साला रोज झगडा करते, पण ते मराठीत!"

इतक्यात भिंदि उठला, "मी येतो फिरोज दहा मिनिटांत .. तू बोल."

"अरे चाय कॉफी तो पी.. साला तूने तो पी ही नहीं!"

"नाही, मी येतो जरा, ऑफिसला फोन करून"

भिंदि बाहेर गेला आणि मंचरजी सुरू परत..

"बोल यंग मॅन.. आय वाॅज इंप्रेस्ड हां साला. तू वार्ता चांगली करते. टॉप. मीच बोलला भिंगार्दिव्याला, घ्यून ये त्याला. लाईक टू मीट यंग टॅलंट.. आमच्या टायमाची याद येते. काय साला दिवस होते.. वंडर्फूल.. वायफ काय करते तुझी? अरे साला, एक बात माज्या ध्यानात आली, तुम्ही लोक आले न मीच साला बोलतोय. तुला तर मी बोलू दिलाच नाही .."

"वाईफ नाही सर.. नाॅट मॅरीड"

"यट.. नाॅट यट बोलना. कर साला. मॅरीड झाला की साला सगळ्या गोष्टी साठी ब्लेम करायला वायफला आपन न आपनला ती मिळते. सच्चु. अरे हा चॅनलचा काम मंजी डोक्याला ताप. घरी गेला ना की शारदा बोलते, फिरोज, रेस्ट घे थोडा. साला तिथे आपला थकवा पळून जाते. अरे हां, तुज्या बुकातली हिरॉईन बी शारदाच है ना? साला शारदा नावाच्या पोरी हिरॉईन असतात का नाही.. बरे यंग मॅन.. वाईफ नाय पन गर्लफ्रेंड कुटाय तुझी.."

"सर.. नाही .."

"नाऊ.. डोन्ट टेल मी.. तुझ्यासारख्या यंग हॅंडसम डॅशिंग बाॅयला गर्लफ्रेंड नाय. साला आजकालच्या पोरींना काय समजते की नाय काही. इत्ता चांगला पोरगा साला असाच सिंगल .."

"सर काय तुम्ही.."

"एक विचारू काय.. म्हणजे गर्लफ्रेंड नाही म्हणून .. माज्या बायडीच्या रिलेशनमंदी हाय एक मुलगी.. मराठीच तुज्यासारखी"

"नाही सर.. म्हणजे मला लग्नच नाही करायचेय म्हणून!"

"ओ हो! साला! हां तो भिंगार्दिवा बोलला मला, तुला सोशल रिफाॅर्मर बनायचे. बन बन साला. पन एक सांगते, कितीबी भांडन झाला ना तर साला वाईफ ती वाईफच असते. दुसरा कोन तेची जागा नाय घेऊ शकत. अरे आमच्या टायमाला होता एक ब्रह्मचारी. साला चालीस वरीसचा झाला तवा वाटला त्याला कोन तरी पार्टनर पाह्यजे. तवा वेल निघून जाते ना. साला नंतर बसला रडत. ते साला त्याचे नशीब, हा भिंगार्दिवा न मी, दोघांनी शोदली पोरगी तेच्यासाठी. लगन कर तू.. काय रे.. तुला विचारतो.. सगल्यात मोठा रिफाॅर्मर कोन जाला?"

"आंबेडकर, फुले.."

"त्यांनला तर होत्या ना बायड्या. अँड इफ आय अॅम ना ॅट राँग, त्या बायड्यापन त्यांच्यासारख्याच काम करायच्या. मला काय वाटते ना या बायड्या आपली ताकत अन हिंमत.. तुला काय वाटते..?"

"मला? तसे पटते सर.. पण"

"अरे, साला पन बिन करू नको.. साला अजून तुजा उमरच काय? सांगतो तू तर भेटवू मुलगीला?"

"नाही सर.. म्हणजे तशी एक आहे.. पण मीच म्हटले उगाच .."

"काय.. बोलते तू.."

"तशी गर्लफ्रेंड नाही सर.. पण मी असा.. माझी नोकरी टिकत नाही .. पण लग्न म्हणजे उगाच बंधन.."

"ओ.. देअर यू आर साला. करेक्ट. पण तू साला सुरी वापरते ना.. नि मॅच बा ॅक्स. नीट नाय वापरली तर डेंजर. तसा हाय लगनाचा. बंधन तर हायना. तुला बी न तिलाबी. बायडीला सांभाळले की ती तुला सांभाळेल. साला लवकर बोलून टाक तिला. काँपिटिशन खूप साला. दुसरा कुनी पळवून नेईल."

"नाही सर. कुणी नाही. पण तुम्ही म्हणता ते खरे आहे. लग्नाने कामात मदतच होईल .."

"पटलं ना तुला .. तर लवकर बोल तिला.. कॉलेजचा एक सिली जोक आटवला.. लवकर म्हणजे लव.. कर! समजला की नाय?"

"काय सर तुम्ही.. "

"अरे बोलला ना मी.. अभी तो मैं जवान हूं.. साला दुनिया बदल पण रडत नाय.. हासत. आनि हासायचा तर बायडी हवीच.. आनि रडायचा तर हवीच हवी.. "

"होय सर. खरंय तुमचे.."

"अरे ज्या कामाला बोलावला त्येच्य विसरला साला.."

"कसले काम सर?"

"अरे तुझे ते बुक, पुसतक.. ज्याचा इंटरव्ह्यू जाला, ते वाचायचे हाय.. टीव्हीवर नवा प्रोग्राम. साला चॅनलवर कसला स्टँडर्डचा प्रोग्राम पायजे.. तुझा बुक साला हिट! भिंगार्दिवा बोलला मला. दोगं मिळून वाचायचा साला. एक तुजा आवाज नि दुसरा फिमेल व्हाॅईस. नाही म्हनू नको हां. साला क्वालिटी प्रोग्राम देत नाय म्हनून लोक बघत नाय.. आन आपन लोगानला ब्लेम करते, टीआरपी नाय म्हनून. करशील ना?"

"सर तुम्हाला कसं नाही म्हणू."

"नाय म्हनूच नको ना! तुज्या ओळखीत हाय का कुनी अशी वाचनारी..?"

"नाही सर.. कुठून असणार .."

"साला काय तू.. गर्लफ्रेंड नाय.. मुलगी पन ओळखीची नाय.. पन खरं सांग साला, खरंच कुणी नाय की या ओल्ड मॅनला सांगत नाय तू. तसा अभी तो मैं जवान हूं समजला ना.. एवढा हँडसम विदाऊट गर्लफ्रेंड.. पटत नाय. आजकाल पोरींना अक्कल कमी हाय साला. ठीक.. एक मुलीला बोलावून ठेवलेय.. दोघे मिळून थोडी प्रॅक्टिस कर. मंग रेकॉर्ड करू."

"यस सर. तुम्हाला भेटून खूप बरे वाटले सर. आजकाल मोठी माणसं फक्त उपदेश करतात. नो वन अंडरस्टँड्स अस."

"अरे साला, तेचा काय हाय, आमच्या वखताला म्हंजी माझ्या वख्ताला माजा डॅडी लवकर गेला. सांगायला कुनी नाय. पन आमचा एक टीचर होता.. भडकमकर सर.. फाईन सोल. एकेका पोराला घेऊन समजून सांगायचा. त्याचा सपोर्ट होता.. आज मी पण तेच करते.. तरूण पोरा

लोक साला थोडे कन्फ्यूज असनारच. तेनला समजून सांगायला पायजे की नाय.. ते जाव दे.. तू रिहर्सलला जा. मी सांगते मिलिंदाला."

मंचरजींनी मिलिंदाला आत बोलावून घेतले, म्हणाले, "ती पोरी आली की नाय?"

"आली सर.."

"काय नाव तिचे.."

"प्रीती सर. तिला काम हवे होते. बरी वाटतेय. एकदा ट्रायल घेऊन टाकू!"

"ठीक. जा तू. रेकॉर्डिंग रूम मध्ये बसव या यंग मॅनला. तिला बी बोलव."

मी आतून प्रेमच्या चेहऱ्यावरचे भाव पाहात होती. मंचरजींची मात्रा लागू पडेलसे दिसत होते.. प्रेमला घेऊन मिलिंदा निघून गेला. मला मचरजींनी बोलावले बाहेर ..

"पोरी, आता पुढे तू बग.. पण धुतलाय त्याचा ब्रेन.. ते ब्रेनला काय बोलते तुज्या मराठीत?"

"मेंदू सर.."

"हां तर मेंदू धुतलाय. आजच काम तमाम कर"

"यस सर"

"नुसता यस सर नाय.. पेंडा पाटव एक किलो..

"यस सर.."

"पारसी डेरीचा.."

"यस सर."

इतक्यात माझ्या मोबाईलवर प्रेमचा मेसेज आला, 'मिसिंग यू.. आपण भेटू शकतो का?'

एकूण बाण जागी बसलेला दिसतच होता.. फक्त आता हलवून खुंटा बळकट करणे बाकी होते!

बाजूला रेकॉर्डिंग स्टुडिओ होता. प्रेम येऊन बसलेला. मी त्याला मेसेज पाठवला, जणू मला माहिती नाही तो तिथे आहे अशा प्रकारे .. अर्थातच. 'बिझी आहे सध्या. नंतर फोन करते!'

मी आत गेली. साळसूदपणे समोर बघत पुढे गेली जणू त्याला पाहिलेच नसावे. मी पुढे जाताच त्याची हाक आली, "प्रीती, तू?"

मी वळून मागे पाहिले .. तोच तो झोप उडवणारा चेहरा!

"प्रेम तू? तू पाठवलेलास मेसेज आताच! काय दुनिया किती छोटी आहे नाही?"

"तुला पाहून किती बरे वाटतेय सांगू.. "

मिलिंदा आलाच तितक्यात. म्हणाला, "तुम्ही एकमेकांना ओळखता?"

"हो.. शी इज माय फ्रेंड.. गुड फ्रेंड.. बेस्ट वन.. अँड इन फॅक्ट नाऊ फियान्सी!"

"वाॅव! काँग्रॅट्स!"

मिलिंदाने हळूच डोळा मारला मला.

मिलिंदाच म्हणाला, "काहीतरी बिघडलेय स्टुडिओत. बाजूलाच कॅन्टिन आहे. तिकडे बसा. बोलावतो नंतर!"

आम्ही बाजूच्याच कॅटीनमध्ये बसलो जाऊन.

"मी बोलत नाही तुझ्याशी.."

रागावून मी बोलली. आपल्या माणसावरच रागावता येते ना हक्काने! हा माझा पहिला राग!

"सॉरी, प्रीती. सॉरी. कान पकडून. तुला दोन आईस्क्रीम घे पण राग विरघळून जाऊ देत.."

"हं.. पण अशी कशी उपरती झाली साधुमहाराजांना?"

"काय सांगू .. गेले काही दिवस तुझ्या शिवाय कसे काढले मलाच ठाऊक.. आणि आता इकडे ते बा ॅस आहेत त्यांनी मोठे लेक्चर दिले .. त्याने मार्ग सोपा झाला. व्हेरी नाईस अँड काईंड मॅन. नाहीतर मला वाटते उद्या किंवा परवा पर्यंत मी पांढरे निशाण फडकवलेच असते.. आमची रसद तोडली तर किती वेळ तग धरणार मी?"

"रसद?"

"प्राणवायू! तू."

"चल. खोटे सांगतोयस.."

मग खूप वेळ आम्ही बोलत बसलेलो. स्टुडिओ काही रिपेयर झालाच नाही. तसा होणारच नव्हता तो. न बिघडलेल्या गोष्टी कुणी कशा करणार रिपेअर, हो की नाही?

मी त्याला त्याच स्नोमॅन मध्ये तेच स्ट्रॉबेरी आईस्क्रीम खाऊ घालण्याची शिक्षा केली! आणि त्याच समुद्रकिनाऱ्यावर बसून प्रेमाच्या आणाभाका घेतल्या आम्ही!

२२

## असे झालेच कसे?

## अर्थात

## भिंदिची करामत!

प्रेमचा निरोप घेत मी निघाली. नवीन पर्व सुरू होतेय आता आयुष्यात. त्यावर विश्वासच बसत नव्हता. यावेळी मात्र मी स्वतःला नाही काढला चिमटा.  कितीही विचार केला तरी काय झाले, कसे झाले ते पचवणे कठीण होते! म्हणजे अगदी मनासारखे झाले तरी पण मनात शंका! स्वामीजी म्हणतात ते खरेय, मनाला शांती म्हणून मिळू देत नाही माणूस! आधी हवे ते मिळत नाही म्हणून आणि आता हवे ते मिळाले .. ते कसे काय मिळाले म्हणून! आज जे घडले, त्याच साठी केला होता अट्टाहास. आता मिळाले तर त्याबद्दल शंका! भिंदि आला, प्रेमला घेऊन आणि मध्येच स्वतःच गुल काय झाला.. हे गौडबंगाल काय असावे? भिंदि मंचरजींचा दोस्त असणे हे खरे, पण प्रेमला त्यानेच आणून सोडावे? त्याला हे सारे ठाऊक असावे .. म्हणजे ती मुलाखत नि बनावट टीव्ही पत्रकार देखील? प्रेमशी जुळलेल्या धाग्याबद्दल हवेत तरंगत होती मी! माझा विश्वासच नव्हता बसत झाल्या गोष्टीवर. आणि माझे मन असले विचार करत होते.. हे झाले खरे.. पण कसे!

जे झाले ते मला स्वस्थ बसू देईना. मिलिंदाला विचारावे तिथेच तर ते शक्य नव्हते. असते तरी प्रेमच्या वेळेतला वाटा ह्या गोष्टीत मी घालवलाच नसता! तेव्हा आता रिकाम्या मला हा चाळा सुचला तर नवल नव्हतेच! त्यामुळे हवेतच उडत निघाली मी. आणि तरंगत घरी येण्याआधी

कालिंदीकडे गेली मी संध्याकाळी तीही शेवरीच्या बोंडासारखी! तरंगत! मिलिंदाला थ्यांक्स पण बोलायचे होते आणि काही विचारायचेही होते.

काकु म्हणाली, "अभिनंदन. मिलिंदाने सांगितले सारे."

"हो ना. तुमची कृपा. मिलिंदा कुठेय?"

"तो इतक्यात कसला येतोय .."

"तुला माहितीय काय काय, कसे कसे आणि का झाले ते?"

"मला? नाही गं बाई..म्हणजे काय काय तुमच्यात झाले हे मला कसे असणार ठाऊक.. क्या.. क्यू.. कैसे.. गैरोंको मालूम हो ऐसे कैसे? आणि मी माहिती करून घेणे सभ्यतेला धरून होईल का गं.. आणि कसे म्हणशील तर.. तू ते कसे कसे केलेस ते ही ठाऊक तुलाच.. आणि का झाले विचारशील तर तुझाच हट्ट!"

"वा! काय उत्तर आहे! उगाच नाही तुला परीक्षेत चांगले मार्क्स मिळायचे! प्रश्न काय नि उत्तर काय! ऐकणाऱ्याला वाटेल हेच बरे उत्तर! हुशार आहेस पोरी! पण मी तुला अशीच सोडेन असे वाटतेय का तुला?"

"नाही .. पकडून ठेवशील! या प्री च्या मगरमिठीतून कोणी वाचू शकलाय कधी? आता प्रेमची पाळी आलीय.. बिच्चारा.. कसा ते मला विच्चारा!"

"गप गं.. ऐक ना.. अगं तिकडे प्रेमला घेऊन कोण आला असेल..? भिंदि!"

"हो का? भिंदि तर कालच येऊन गेला घरी आमच्या!"

"कशाला?"

"कशास काय पुसतेस.. मालिनीला भेटायला!"

"काय सांगतेस. मग?"

"मग काय. सत्य सांगावे लागलेच .. नाही!"

"म्हणजे?"

"ज्याला आधीच ठाऊक आहे सारे.. त्यास अजून  काय सत्य सांगावे?"

"म्हणजे?"

हे ऐकून माझा 'आ' वासला जाणे साहजिकच होते. तसा मी तो वासला!

"तो आ वासलेला बंद कर आधी. माशा खूप झाल्यात!एखादी रस्ता चुकून शिरेल आत!"

"मिटते .. पण काय झालेय ते सांगतेस का?"

"काय झालेय? अगं त्या भिंदिने सगळा माग काढून ठेवला होता आपला."

"काय सांगतेस?"

"अगं ती बुरखेवाली सुलताना.. तूच होतीस हेही ठाऊक त्याला आणि तुझ्या प्रेमसाठी चालणाऱ्या चकरा ही."

"कुठून आणि कसे?"

"ते माहिती नाही मला. पण कुठल्यातरी स्टेजला सारे कळले होते त्याला."

"मग?"

"मग काय.. फक्त प्रेम कितपत मानेल याचीच शंका होती. म्हणाला, नगास नग म्हणून त्याच्या जुळ्या भावासही आणले त्याने!"

"म्हणजे पूर्णानंद!"

"आणि एकदा तुम्हाला तुमच्या समोवार मध्ये ही पाहिले आणि वाटले .. मामला जमतोयसे दिसतेय!"

"हुं.. आणि त्याच्याबरोबर तात्याही होते तेव्हा!"

"त्याबद्दल नाही काही बोलला तो. पण परवा आला तर मिलिंदाला विचारलेच त्याने, म्हणाला, मला सारे ठाऊक आहे.. गेल्या काही दिवसांत भेटले नाहीत दोघे हे ही. फक्त कारण ठाऊक नाही! ते कारण सांगितले नि मिलिंदा म्हणाला, मंचरजीना ओळखता तुम्ही .. फक्त प्रेमला त्यांच्या तोंडी दिले की काम फत्ते! तिथल्या तिथे त्याने फोन लावला. मंचरजी म्हणे तुझे काम ते माझे काम! फार पूर्वी मंचरजीसाठी पण अशीच फिल्डिंग लावली होती म्हणे भिंदिनी! आणि भिंदिने स्वतःहून प्रेमला आणायची जबाबदारी घेतली!"

"सांगतेस काय? चेहऱ्यावरून अगदी रूक्ष वाटतो पण आहे मोठा आतल्या गाठीचा!"

"आतली गाठ? पण ती उघडून बसला तो समोर! म्हणाला, प्रेम आहे तसा चांगला .. लक्षात घे.. 'तसा' चांगला!"

"चूप.. उगाच अकलेचे तारे नकोस तोडू.."

"तर हा भिंदि म्हणजे अंतरी ना ना कळा वाटतो.."

"आणि वेश असा बावळा! अगदी फिट त्याला."

"तर भिंदि ने मंचरजीच्या वेळी असलेच काही केले..

वाटत नाही असा असेल तो.."

"हो ना.. दिसते तसे नसते गं.. आणि तुझा प्रेमच बघ.. दिसायला असा पण असले काही करेल असे वाटते का?"

"असले म्हणजे?"

"म्हणजे तुझ्या नादी लागेल वगैरे वगैरे .."

"काकु.. मी रागावलीय आता.. !"

"ते स्वातंत्र्य आहे तुला बरे! वो कहते हैं हमारे वो नहीं है ऐसे.."

"चूप .. मी निघाली. पण मिलिंदाला थ्यांक्स सांग. आणि तुला पण.. तुम्ही आहात म्हणून माझी प्रेमनय्या पार लागली!"

"छान! आभारप्रदर्शन समारंभ उद्या भरवूया. सादर आमंत्रण. आपल्या 'ह्यां'ना आणायला विसरू नका बरोबर.."

"अय्या.. लाज वाटते मला.."

"लाज.. करताना प्रेमवर प्रेम कुठे गेली होती लाज तुझी घोरपडे सुतीणी?"

"आता काकु तू शोभतेस खरी.. काकूबाई!"

घरी यायला निघाली. आजचा दिवस ग्रेट निघाला. इतक्या दिवसांची तपस्या फळाला आली. स्वामीजींची कृपा! सारे सकारात्मक विचारांचे फळ!

२३

# सुरूवातीचा शेवट

# अर्थात

# घोड्याची गंगेत अंघोळ!

'गुड मॉर्निंग!

स्वप्ने पहायला शिका. स्वप्नांसाठी झोप आवश्यक.. तेव्हा परत झोपी जा.. नवीन स्वप्ने पहा.. सुप्रभात!'

या मोबायल्याची कमाल पहा. त्याने जगच नाही तर दिवसाचे प्रहरदेखील आणलेत जवळ. सकाळसकाळी मी उठली..

रीतसर आळस झटकून. आळोखेपिळोखे दिली मी. समोरच्या मोबाईलात टुणss आवाज आला. हा माझा खास अलार्म म्हणावा.. त्यात आलेला तो गुड मॉर्निंगवाला मेसज! नुसता गुड मॉर्निंग नाही तर ज्ञान वाटप ही त्यात.

परत झोपी जा म्हणे! मला काय, मी झोपते! झटकलेला आळस मी परत गोळा केला. गेलेली झोप परत डोळ्यांत जमा केली. पापण्या घट्ट मिटून ती परत उडून जाऊ नये म्हणून पडून राहिली.. स्वप्ने पहायची आता माझ्यावर जबाबदारी होती. त्यासाठी झोपणे जरूरी होते.

शुभ प्रभातीचा तो संदेश.. संदेश नव्हे तर आदेश होता. प्रेमआदेश! त्या संदेशाने तर रात्रीच्या प्रहरास सकाळी ढकललेले. माझा प्रेम आहेच तसा विनोदी! सुप्रभाती निद्राधीन होण्याचा संदेश. आणि तो मी टाळणार तरी कशी? झोपली झाले. स्वप्न पाहायची तर झोपायला तर हवे.

मीच नाही.. या प्रीतीचे प्रेम.. आणि या प्रीतीचा प्रेम देखील .. हेच तर सांगतोय! म्हणजे मी त्याच्याच बद्दल सांगतेय हे. सांगू म्हटले की काय काय सांगू कळत नाही. प्रीतीचा प्रेम! किती छान वाटते ऐकायला! प्रीतीचे प्रेम आणि प्रीतीचे प्रेम.. दोघेही एकच!

झोपली मी. स्वप्न पडते कसले?

तर तेच! प्रेम आणि प्रीती. स्वप्नात खुद्द बिस्मिल्लाखान सनई वादन करताहेत नि मी सलज्ज का काय म्हणतात त्या वदनाने माळ घालतेय. मध्ये आंतरपाट तसाच! आणि माझ्या प्रेमचा चेहरा पण दिसला नाही नीट. स्वप्नाची फ्रेम बिघडली वाटते. तरी पडले स्वप्न ते चांगलेच झाले. स्वप्नात तरी प्रीती प्रेमची झाली. उगाच शंका काढू नका. नीट नाही दिसला चेहरा म्हणून काय झाले.. आतंरपाट तसाच होता.. म्हणून काय झाले.. तो प्रेमच होता. दुसरा कुणी कसा असेल? इतक्या तपस्येनंतर? आणि मी बरी प्रेमला असेच सोडून देईन?

हे सगळे आताचे! इतक्या साऱ्या गडबड घोटाळयातून शेवटी घोडे न्हाले गंगेत. पण त्या आधी अजून धक्का बसायचा बाकीच होता. धक्का म्हणजे तसा भिंदिसारखा. भिंदिला सगळे ठाऊक होते म्हणे! तरीही त्याने कधी दाखवले नाही. आणि खलनायक तर तो नव्हताच कधी, उलट मदत त्यानेच केली मला! आणि प्रेमला ही! खरी गंमत तात्यांची आणि आईची. तात्यांना तो पहिल्या

दिवशीच पसंत होता! म्हणजे घरी जेवायला आला तेव्हापासूनच! आईही म्हणालेली, मुलगा चांगला आहे! फक्त प्रेमची खात्री नव्हती कोणालाच! प्रेम ही तेव्हाच पडलेला प्रेमात, आणि मी? त्यामुळेच तर एवढे रामायण घडले! आणि आता भिंदिने तात्यांना समोवार मध्ये त्यादिवशी आणलेले, आमची जोडी दाखवायला. माझे सारे जाॅब नि कसल्या कसल्या थापा.. सारे त्यांना ठाऊक होते! म्हणजे गंमत अशी झाली ना, की सगळयांनाच सगळे ठाऊक पण एकमेकांना ते ठाऊक आहे की नाही हेच नव्हते ठाऊक! ठाऊक नाही मला हे वाक्य व्याकरणदृष्ट्या योग्य आहे की नाही.. पण माझा प्रेमातला चोरटेपणा मात्र आई तात्या नि भिंदि तिघांनाही ठाऊक होता! आणि तो बहुधा सर्वांनीच मान्य केला असावा.. तात्या न रागावता म्हणाले ही, "मने, नावाची मांजरच तू. डोळे मिटून पितेस दूध. तुला वाटणारच कोणी पाहात नाहीए. पण दिसत मात्र होते सर्वांनाच. पण सर्वांना दिसते हे तुला दिसत असेल तर ना!"

कुठून सुरू झाली माझी कथा नि कशी इथवर येऊन पोहोचली! प्रेम नि माझ्या जोडीमुळे सगळेच खुश झाले. त्याच्या घरची एक चिंता मिटली. तात्या नि आईला तर तो आवडला होताच. थोडक्यात गंगेत सचैल स्नान झाले घोड्याचे! आता फक्त लग्नाची तारीख वार ठरायचे बाकी आहे. या विद्रोहकुमाराच्या कलाने होईल सारे. त्यामुळे मुहूर्त वगैरेची भानगड नाही. नसता फाफट पसारा ही नको म्हणाला तो.. नको तर नाहीच! सारेच घाबरतात त्याच्या विक्षिप्तपणाला! पण तो खरेतर विक्षिप्त नाहीच. न पटणाऱ्या गोष्टी नाही करत तो इतकेच.. आणि करूही देत नाही. मला पटलेय ते. थोड्याफार विचित्र वागण्याशिवाय कुणी लक्ष देत नाहीत आणि आपले म्हणणे खरे करता येत नाही. बदल घडवायचा असेल तर वाईटपणा घ्यायलाच हवा. यालाच कुणी आपले घोडे दामटणे म्हणत असेल तर.. पण आता याच घोड्याने केलेय गंगेत स्नान!

प्रेम आता दुसरे पुस्तक लिहायला घेतोय. म्हणजे आधीचे ते दिवस सरले मागे. पुस्तकाच्या नावाखाली भेटायचे. आता भेटतो आम्ही. प्रेमाच्या तर मारतोच गप्पा पण पुस्तकाबद्दलही करतो चर्चा. मी पण सुधरलीय. म्हणजे वाचते तो लिहितो ते.. न झोपता. पण त्याचे पहिले वहिले.. तुंबाऱ्याची गोष्ट वाले पुस्तक आम्ही दोघांनी मिळून टीव्हीवर वाचन करेपर्यंत वाचले नव्हते! पण मी म्हणाली ना.. कमलदलात अडकलेला भुंगा, त्यासारखे झालेय माझे! ज्या पुस्तकांपासून मी दूर होती त्यांच्यातच अडकलीय आता मी! आणि तेही जाणूनबुजून! आणि आनंदाने!

लवकरच आम्ही विवाहबंधनात अडकू.. ती प्रेप्रीप्रीबंस कधीच बरखास्त झालीय. मंचरजींना आम्ही जोडीने एक किलोभर पारसी डेअरीचे पेढे देऊन आलो. पाया पडलो त्यांच्या तर डोळयांत पाणी आले त्यांच्याही. आमची जोडी जुळावी म्हणून कित्येकांनी काय काय केले.. सर्वांचे चीज झाले..

आता पुढे काय? आणि ते सुखाने नांदू लागले यावर

ही प्रेमकथा प्रीतीची समाप्त होतेय.. खरे तर नव्याने सुरू होतेय! दिसते मजला सुखस्वप्न नवे.. आणि काय!

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. डॉ. नितीन मोरे यांचे हे विसावे पुस्तक.**

डॉ. नितीन मोरे हे ज्येष्ठ लेखक, आपली यशस्वी श्वसनरोगतज्ञ म्हणून लोकसेवा पार पाडत असतानाच कथा, नाटके, लघुनिबंधही लिहीतात. त्यांच्या खुसखुशीत विनोदी साहित्याचे व नाटकांचे चाहते आता जगभर पसरले आहेत. अनेक व्यावसायिक प्रकाशक त्यांना मानधन देऊन त्यांची पुस्तके प्रकाशित करायला तयार अहेत. पण डॉ. नितीनजी आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१५ पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (८ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२० पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), रत्नाकर महाजन (४ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, १० पुस्तके), विनीता देशपांडे (५ पुस्तके), उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (७), डॉ. वृषाली जोशी(१०) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।